पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक पाचवा व सहावा । मराठी पाक्षिक । मूल्य : रु. ५० । दिनांक : १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर

## आरक्षण



माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत । माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील । माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ।
डॉ. सुखदेव थोरात । उत्तम कांबळे । डॉ. भारत पाटणकर । श्रावण देवरे


मेट्रो चाय
ताजगी के रंग
मेट्रो चाय के संग
ताजगी के रंग
मेट्रो चाय के संग
METRO
PREMIUM GOLD TEA
Taste of assam
METRO TEA
www.teacoffeeassociation.com
Supported by TCA India
WNK INDUSTRIES PVT. LTD.
TEACOFFEE ASSOCIATION
For enquiries kindly mail us at : info@metrotea.in

**संपादक**

चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**

सतीश डोंगरे, सचिन ओहाळ

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :**

११, तळमजला, बी. ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग,
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.),
मुंबई – ४०० ०१६

**मुद्रक**

विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा. लि.
३२, एमआयडीसी, सातपूर, नाशिक – ०७

**संपर्क**

८८८८५४१८२२
९५८८४५११५१

Email :
thepeoplespost2014@gmail.com
Website :
www.peoplespost.in
Facebook :
@thepeoplespost



(या अंकातील लेखांचे हक्क सुरक्षित)



**जाहिरात विभाग**

संपर्क : ९८२१४४५४०९/८८०५१५१४५२

**वर्गणीदारांसाठी संपर्क**

सचिन : ७३५००९१५६९

**अंकासाठी संपर्क**

८८८८५४१८२२ (Whatsapp)

**वर्गणी : वार्षिक ५०० रुपये**

**(वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट)**

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १
अंक ५ व ६ वा, किंमत : रु. ५० । ता. १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१८

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी


## संपादकीय...


आरक्षणाची गरज कोणाला? - डॉ. सुखदेव थोरात ०९
सामाजिक न्यायासाठी राखीव जागा - उत्तम कांबळे १४
आरक्षण एकमेव रक्षणकर्ता नाही - पी. बी. सावंत १९
मनुवाद आणि मनिवादाला ठेचून काढा - बी. जी. कोळसे-पाटील २४
क्रांती आणि प्रतिक्रांती : कारण आरक्षण! - प्रा. श्रावण देवरे २९
शूद्र मराठा-कुणब्यांना आरक्षण हवेच - डॉ. भारत पाटणकर ४०
इतरांच्या आरक्षणात मराठ्यांना घुसवू नका - छगन भुजबळ ४६
मुस्लिमांसाठी राखीव जागांचे मृगजळ - डॉ. अलीम वकील ५१
महिला आरक्षण : संकल्पना आणि वास्तव - प्रा. डॉ. भारती पाटील ५९
आरक्षण नसल्याने मराठा समाजाची हानी - प्रवीण गायकवाड ६२
धनगर आरक्षणाचे राजकारण होतेय - अण्णासाहेब डांगे ६५
मूळ ओबीसींना आरक्षणाचा लाभ नाहीच - वाहरू सोनवणे ६७
व्यक्तिविशेष - डॉ. यशवंत मनोहर ७०
पुस्तक परिचय - डॉ. गौतम कांबळे ७२
आजकालचे प्रश्न - मी टू-फोर-एट-टेन-फोरटीन ७४
मजबूरी का नाम भक्ती ७५
सावधान! नवा अवतार येतोय ७६
आम्ही आदिवासी बाया - प्रभू राजगडकर ७७
कोण काय बोलतं... ७८



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी विकास प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग, सातपूर, नाशिक येथे छापून फ्लॅट नं. ४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१ ००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. ❋ संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत, प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. RNI.Reg.No. MAHMAR49026


IS 14543:2004
CM/L - 7500096312
fssai
Lic. No. 10016022005592
20TH MARCH®
RESPECT EVERY DROP
PACKAGED DRINKING WATER
Product Range
Bottle
250ml, 500ml, 1Ltr. & 2 Ltr.
Jar - 20 Ltr.
प्यास भी बुझाए ।
और इतिहास भी बताए ।।
अनेक आजारांची निर्मिती अशुध्द व दुषीत पाणी पिण्यामुळे होते. निरोगी शरीरासाठी पिण्याचे शुध्द पाणी मिळणे, ही आपली जीवनावश्यक गरज आहे. जर पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत असेल, तर ते पाणी शुध्द व आरोग्यदायी असायलाच हवे.
20TH MARCH
OUR BRAND AMBASSADOR
MALAVATH POORNA
Customer Care 76 20 03 1927
E : info@20thmarchventures.com | W : www.20thmarchventures.com

संपादकीय...

# चला, चला, चला तुम्ही पंक्तीला चला...

प्रश्न आपणच आपल्याला असा विचारला की, सरकारमध्ये तयार होत असलेल्या साऱ्याच्या साऱ्या नोकऱ्या कोणा एका जातीसाठीच राखीव ठेवल्या तर बेकारीचा सगळ्याचा सगळा प्रश्न निदान त्या जातीपुरता तरी सुटेल काय?

अर्थात उत्तर नाही असंच येईल; कारण नोकऱ्या गोगलगायीच्या गतीनं तयार होत आहेत आणि बेकारी विमानाच्या गतीनं वाढते आहे. हे असं का होतं आहे तर नव्या भांडवलशाहीनं आपला नफा वाढवण्यासाठी आणि यंत्राच्या, संगणकाच्या मदतीनं जगावर राज्य करण्यासाठी नोकऱ्यांमध्ये दिसणारा माणूस डिलीट करण्याचा प्रयत्न चालवला आहे. असं एक तंत्रज्ञान आणलं आहे की, बेकारांपासून साऱ्यांनाच त्याची गरज बनवली गेली आहे. इतकी गरज की, माणूस त्याशिवाय जगूच शकत नाहीय. त्याच्या मदतीनं जगता जगता या तंत्रज्ञानानं आपला घास कसा हिसकावून घेतला हेही कळत नाहीय आणि समजा कळलं तरी माणूस या व्यवस्थेविरुद्ध बंड करू शकत नाहीय. हे नवं तंत्रज्ञान त्याचं जीवन सुसह्य करतं. गतिमान करतं. त्याचा वेळ आणि कष्ट वाचवतं. त्याला ग्लोबलही बनवतं. स्वाभाविकच या तंत्रज्ञानानं जन्माला घातलेल्या व्यवस्थेला कोणीही सामान्य आणि शहाणा माणूस विरोध करणं शक्य नाही आणि करूही नये. त्याचबरोबर एक बाजू अशीही शिल्लक राहते की, माणसाचा रोजगार तंत्रज्ञानानं काढून घेतल्यानं माणूस बेरोजगारही होतो आहे. त्याला रोजगार मिळावा म्हणून तंत्रज्ञान फेकून द्या असंही म्हणता येणार नाही. ज्ञान-तंत्रज्ञान आणि माणूस यांच्यात एकाच वेळी संघर्ष आणि मैत्री चालू राहणार आहे. उदा. एटीएमचं



बूथच घेऊ. एक एटीएमचं बूथ म्हणजे बँकेची एक शाखा पूर्वी माणसांना नोकऱ्या देऊन चालवली जायची. दहा-पंधरा लोक एका शाखेत असायचे. कल्पना करूया की, नाशिकमध्ये अशा मानवचलित दोन हजार शाखा होत्या आणि आता त्यातल्या पंधराशे शाखांचं ऑल टाईम मनी म्हणजे एटीएमच्या शाखेत रूपांतर झालं आहे. पंधराशे शाखांतल्या प्रत्येकी दहा जणांची म्हणजे एकूण पंधरा हजार जणांची नोकरी गेली. नव्या शाखा माणसाशिवाय म्हणजे सीसीटीव्ही कॅमेरा या एका नव्या यंत्राद्वारे ऑपरेट केल्या जातात. आता नाशिकसारखी पाचशे शहरं असतील म्हणजे पंधरा हजार गुणिले पाचशे. किती लोकांच्या नोकऱ्या गेल्या असतील आणि ज्या कधीच तयार होणार नाहीत आणि असलेल्या टिकत नाहीत. कारण नव्या भांडवलशाहीनं कायमस्वरूपी नोकरीचं कंत्राटी नोकरीत रूपांतर केलंय. त्याचाच एक भाग म्हणजे घरात ऑफिस, ऑनलाईन ऑफिस, पार्टटाइम ऑफिस अशा कल्पना रूढ झाल्या आहेत. दुसरा पर्यायच नसल्यानं समाजानं त्या मान्यही केल्या आहेत.

पहिल्या प्रश्नाचं उत्तर असं की, कोणत्याही एका जातीचा नोकरीचा प्रश्न राखीव जागा सोडवणार नाहीत.

आता शिक्षणाचं असंच झालंय. गुणवत्तापूर्ण, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व आलंय. आता कुणाला भाषा विषय घ्या आणि पदवीधर व्हा, असं सांगता येत नाही. तत्त्वज्ञान घ्या आणि शिक्षणात करिअर करा, असंही सांगता येत नाही. तर्कशास्त्रापासून भाषाशास्त्रापर्यंत अनेक विषय बंद पडले किंवा कायमचे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. स्पर्धेत तग धरण्यासाठीचं शिक्षण फक्त प्रायव्हेटमध्ये मिळणार. गव्हर्मेंटमध्ये फीमाफी आणि भोजन मिळणार. बहुतेक समाजाचा ओढा प्रायव्हेटकडे आहे. डोनेशनच्या बॅगा घेऊन विद्यार्थी त्यांच्या दारात उभे आहेत आणि तेथे आरक्षण नाही. बड्या भांडवलदारांनी शिक्षणक्षेत्रात प्रवेश करून ते मुठीत गच्च पकडलंय. पैसा मोजा आणि ज्ञान मिळवा असा हा एक नवा प्रयोग आहे. नॉलेज इंडस्ट्री म्हणतात त्याला. या इंडस्ट्रीजमध्ये गुणवत्ता आणि डोनेशनच्या जोरावर प्रवेश घ्यायचा असतो. आरक्षण हा शब्द उच्चारायचा नाही. आपलं काहीच चालत नाही किंवा चालवायचं नाही म्हणून की काय सरकारही प्रायव्हेटच्या दारात उभं राहतं आणि आमची गरिबाची चार पोरं तिथं घ्या, अशी भीक मागतं. तुमच्या शहाण्यांत आमची दोन बिनशहाणी मिसळा असं सांगतं. पण भांडवलशाही गिणत नाही सरकारला. आता गव्हर्मेंटचं काहीच चालत नाही. बसमार्ग, विमानमार्ग, जहाजं, दवाखाने, महामार्ग, रेल्वे, समुद्राच्या तळाचा गॅस, धरणं, शिक्षण अशी क्षेत्रं की, जेथे रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हायचा ती सारीच्या सारी प्रायव्हेटच्या हातात गेली. तिथं आरक्षण नाही. काही खात्यात सरकार नोकरभरती करतं. स्पर्धा परीक्षा घेतं. एका जागेसाठी तीन तीन हजार पोरं अर्ज करतात. एखादा यशस्वी होतो आणि बाकीच्यांचा भरणा बेकारांची फौज वाढवण्यात होतो. सगळ्याच जातींमधील तरुण पिढी नैरश्येच्या गर्तेत गेली. काही जण आत्महत्या करायला लागले. काही जण गुन्हेगारीकडे वळले. कुणालाच कळत नाहीय की अशा आत्महत्या का वाढल्या? गुन्हेगारी का वाढली? बेकारी का वाढली? खेडी ओस का पडायला लागली? उच्चविद्याविभूषित मजुरांच्या बाजारात का आले? बिगर लग्नाचं राहणाऱ्यांचं प्रमाण का वाढलं? तरुण पोरं बाबांच्या आणि मूलतत्त्ववाद्यांच्या नादाला का लागली? जगण्या-मरण्याचे प्रश्न बाजूला पडले किंवा पाडले गेले. राखीव जागावाल्यांनीही नोकरी आणि शिक्षण यापुरता विचार केला. प्रत्यक्षात राखीव जागा म्हणजे सामाजिक न्याय आणि जातिअंत करण्याचं एक हत्यार आहे. ते कधी वापरणार? सर्वांसमोरच जगण्याची एक मोठी भ्रांत पडली आहे. यातून मार्ग कसा काढायचा याचं एक झटपट उत्तर राजकारण्यांच्या डोक्यातून बाहेर पडलं किंवा जाणीवपूर्वक त्यांनी ते जन्माला



घातलं. या देशातील व्यक्ती उत्कर्षाचा मार्ग फक्त आणि फक्त आरक्षणातून जातो हे ते उत्तर. ज्या समाजाला आरक्षण आहे त्यांनी जणू काही सोन्याची कौलं घातली आहेत आणि तेथील सारेच्या सारे जणू गाडीत बसून साहेब झाले आहेत. समाजविकासाचा पद्धतशीर मार्ग शासनानं कधीच शोधला नाही. फक्त चिकटपट्ट्या वापरल्या. ज्या जोरदार उन्हाळ्यात आणि चुकून आलेल्या पावसातही गळून पडतात. मग दुसरी चिकटपट्टी, मग तिसरी...! मनगटाला काम देणार नाही, पण मोफत धान्य देऊ. आधुनिक, अव्वल ज्ञान देणार नाही, पण खिचडी देऊ. विकासाचे झरे तयार करणार नाही, पण आरक्षणाचा विचार करू. आरक्षण म्हणजे जणू काही सुपरमॅन आहे, असं समजून त्याकडे पाहिलं जाऊ लागलं. एक भ्रम तयार करण्यात येतोय. एक नवी अफूची गोळी चौकाचौकात मोफत ठेवली जातेय. एकीकडे नोकऱ्यांच तयार करायच्या नाहीत. एकीकडे शाळाच चालवायच्या नाहीत. एकीकडे सरकार अंगीकृत उद्योगधंदे चालवायचे नाहीत. एकीकडे विमानाचं काम सरकारी उद्योगाऐवजी अंबानीला द्यायचं आणि दुसरीकडे राखीव जागांच्या नादात जाती-जातींना खेळवत ठेवायचं. त्यांच्यात झुंजीही लावायच्या आणि स्वतःच न्यायाधीशही व्हायचं, असा हा एकूण मामला आहे. जगण्याच्या विवंचनेत असहाय्य झालेल्या माणसाला भ्रम आणि वास्तव कळू नये, अशी ही नवी व्यवस्था आहे. बेकारी का वाढतेय असं विचारलं की, रामाचा विषय काढायचा. रामाचा विषय काढला की, गायींकडं वळायचं. गायींचा विषय काढला की, पाकिस्तानकडे वळायचं आणि पाकिस्तानचा विषय काढला की, हिंदुत्वाची व्याख्या करायची. हिंदुत्वाची व्याख्या खाऊन किती जणांची पोटे भरली हे कोणी सांगत नाही. माणूस भ्रमिष्ठ कसा करायचा आणि तो भ्रमिष्ठ झाला की, मानसोपचारतज्ज्ञांच्या टंचाईवर चर्चा करायची असं हे एक षड्यंत्र आहे. ते समाजात आणि त्याच्या मनात अस्वस्थता तयार करते. अस्वस्थ माणूस हा सत्ताधाऱ्यांची प्राथमिक गरज असतो. सबब राखीव जागांचं कारण काय, त्याचे उद्देश काय हे समजून घ्यायला कुणालाच वेळ नाही. आता असाच एक प्रश्न तयार होईल की, सगळ्या म्हणजे उपलब्ध जागा जातनिहाय वाटून टाका. सरकार त्यासाठीही आयोग नेमेल. कातडी वाचवण्यासाठी काही तरी करेल. आरक्षणाला शेळीच्या शेपटासारखं स्वरूप आलंय. लज्जेखातर ढुंगण झाकता येत नाही आणि ढुंगणावरची माशीही उडवता येत नाही.

'मागेल त्याला आरक्षण' या भूमिकेपर्यंत सरकार गेलंय. 'मागेल त्याला नोकरी' हे काही त्याला जमत नाही आणि जमण्याची शक्यताही नाही. पेरणीसाठी जागा देऊ एवढंच सरकार सांगतं. पण ही जागा खडकाळ, दगडाळू, मुरमाड, भेगांची की वांझ आहे हे मात्र ते सांगत नाही. गावाकडं पाटलांची लग्न मोठ्या डौलात होतात. पूर्वी तर ती पाच-पाच दिवस चालायची. पंचक्रोशीतल्या लोकांना पंक्तीसाठी निमंत्रण जायचं. दवंडी पिटली जायची. काही काही ठगे पाटील असे असायचे की, स्वतःची प्रतिष्ठा वाढावी म्हणून ते लांबलांब पंक्ती बसवायचे. काही वेळा असं व्हायचं की, पंक्तीतल्या शेवटच्या समूहापर्यंत अन्न पोहोचायचंच नाही. मध्येच संपायचं. शुक्राचार्यांच्या झारीत अडकल्याप्रमाणे व्हायचं. शेवटचे लोक अन्नाची वाट बघत बसायचे. थाळ्या खालवर करायचे. घरातून भरून आणलेल्या तांब्यातील पाणी प्यायचे. अन्नाची वाट बघत बसायचे. बराच वेळ बसायचे, कंटाळायचे. वाढपी तोंडं दाखवायचे नाहीत. कुणी म्हणायचं जेवण संपलंय. कुणी म्हणायचं नवं शिजतंय. कुणी म्हणायचं अंदाज चुकला, गर्दी वाढलीय. काय काय तर्क लढवले जायचे? मग कधी तर काळ्याभोर मिशीवर पीळ देत, एकटांगी धोतर नेसून पंक्तीत फिरायचा. पंक्तीवर नजर टाकायचा. पंक्तीतले लोक नम्रपणे विचारायचे, 'पाटीलसाहेब लय येळ झाली या पंक्तीत बसून. थाळीत अन्न काय पडत नाय नव्हं... अजून किती येळ लागंल?'

पाटील शांतपणे ऐकायचा. एक शिवी हासडून म्हणायचा, आरं रांडच्यांनू मोठ्या मानानं पंक्तीत बोलावलं की नाही तुम्हाला? का बाहेर ठेवलं तुम्हाला? काय पण इचारताय रांडच्यांनू...

पाटील पुटपुटतच पुढं निघायचा. तो कधी परतणार आणि अन्न मिळणार की नाही याची गॅरंटी वॉरंटी न देताच पुढंच जायचा.

मराठीत एक लोकगीत आहे. 'लग्नाला चला तुम्ही चला' म्हणत कारभारी साऱ्या साऱ्यांना लग्नाला बोलावतो. ''एक होतं गहू, त्याच्या पोळ्या केल्या नऊ... कुठं कुठं ठेवू आणि किती किती खाऊ'' असं विचारतो. एका गव्हात नऊ पोळ्या कशा होत असतील हे त्या कारभाऱ्याला आणि मायबाप सरकारलाच ठाऊक. तरीही तेच गाणं चालू आहे. छकूबाई चला, साळूबाई चला, नाना, काका, मामा चला, दादा, बाबा, आबा चला, चला चला चला तुम्ही पंक्तीला चला...

***



Haldiram's
NAGPUR
TASTE OF TRADITION
Sweets & Namkeen
zubaan ka
zaika badal de
Soan Papdi
ALL IN ONE
NAVRATAN MIX
ALOO BHUJIA
Rasgulla
Gulab Jamun
visit our website at www.haldirams.com



डॉ. सुखदेव थोरात




# आरक्षणाची गरज कोणाला?

**जाट, पटेल, मराठा आणि इतर उपजातींना सहन कराव्या लागलेल्या भेदभावाची पातळी समजून घेण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण करण्याचीही गरज आहे. राखीव जागांची मागणी या पुराव्यांवर आधारित असली पाहिजे. फक्त आकलनाच्या आधारावर असता कामा नये. जोपर्यंत असा पुरावा तयार होत नाही तोपर्यंत या जातींमधील गरिबांसाठी सर्वसामान्य धोरणे राबवणे हा चांगला पर्याय आहे. ज्या अस्पृश्य जातींवर जातिभेदाचा आणि अस्पृश्यतेचा परिणाम गंभीर आहे त्यांच्यासाठी आरक्षणाचे धोरण राबवले पाहिजे.**

अलीकडच्या काळात विविध जातींकडून वाढत्या प्रमाणात आरक्षणाची मागणी केली जात आहे. अनुसूचित जातींसाठी सुरू झालेल्या आरक्षणाची व्याप्ती अनुसूचित जमातींपर्यंत आणि नंतर इतर मागास प्रवर्गांपर्यंत वाढवण्यात आली. आता इतर मागास प्रवर्गांहूनही वरच्या स्तरावर असलेल्या जाट, पटेल, मराठा या जातीही आरक्षणाची मागणी करत आहेत. काहींनी आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्यांसाठी आरक्षण ठेवण्याची सूचना केली आहे. आरक्षणाची नवीन गटांकडून होणाऱ्या मागण्या या नेहमीच त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थानाविषयीच्या पुरेशा माहितीशिवायच केल्या जातात.

अशा प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने तपशीलवार पुराव्याची मागणी केली आहे. माहितीच्या अभावाखेरीज राखीव जागांच्या मागण्या या मर्यादित सैद्धांतिक युक्तिवादासहसुद्धा केल्या जातात. या संदर्भात आरक्षणाच्या धोरणाच्या मुद्द्यावर स्पष्टता आणण्याची गरज आहे. मुख्य प्रश्न असा आहे की, आरक्षणासाठी कोण पात्र आहे? भेदभावांचा त्रास झालेल्या समाजांसाठी राखीव जागा किंवा तत्सम धोरणे का आवश्यक आहेत? अनुसूचित जाती किंवा कृष्णवर्णीय यांसारख्या भेदभाव केल्या गेलेल्या गटांच्या समस्या सोडवण्यासाठी, गरिबांसाठी वापरली जाणारी सर्वसामान्य धोरणे पुरेशी नाहीत का? विविध गटांमधून केल्या जाणाऱ्या आरक्षणाच्या मागणीवरच्या या

चर्चेत स्पष्टता आणण्यासाठी या सैद्धांतिक मुद्यावर चर्चा होण्याची गरज आहे.

### दुहेरी धोरणे

अस्पृश्य किंवा कृष्णवर्णीय यांसारख्या भेदभाव करण्यात आलेल्या समाजांच्या समस्येला तोंड द्यावे लागणाऱ्या देशांनी दुहेरी धोरणाचा वापर केला आहे. पहिले धोरण गरिबाभिमुख आणि आर्थिक विकासाचे असते आणि दुसरे धोरण फक्त भेदभाव झालेल्या गटासाठी आरक्षण ठेवण्याजोगे समान संधीचे असते. गरिबाभिमुख धोरण गरिबी कमी करण्यासाठी सर्व गरिबांसाठी वापरले जाते. हे धोरण भेदभाव करण्यात आलेल्या आणि भेदभाव न करण्यात आलेल्या अशा दोन्ही गटांसाठी वापरले जाते. गरिबाभिमुख धोरणांना भेदभाव झालेल्यांच्या बाबतीत राबवल्या जाणाऱ्या समान संधीच्या धोरणांचीही (राखीव जागांच्या धोरणासारख्या) जोड दिली जाते. आरक्षणासारखी समान संधीची धोरणे खास असतात आणि ती फक्त आपली जात, वंश किंवा धर्म यांमुळे भेदभाव केल्या जाणाऱ्या समाजांपुरतीच वापरली जातात. गरिबाभिमुख धोरणांना पूरक किंवा जोड म्हणून समान संधीच्या धोरणांचा वापर करण्यामागे विशिष्ट कारण असते. गरिबाभिमुख धोरणे भेदभाव करण्यात आलेल्या आणि भेदभाव न करण्यात आलेल्या अशा दोन्ही समाजांमधील गरिबांना सहाय्य करतात. गरिबांमध्ये जमिनीचे वाटप करणे, उद्योग-व्यवसायाला प्रोत्साहन देणे किंवा शिक्षणाला उत्तेजन देणे ही गरिबाभिमुख धोरणांची उदाहरणे आहेत. या धोरणांमुळे भेदभाव करण्यात आलेल्या आणि न करण्यात आलेल्या व्यक्तींना शेती आणि व्यवसाय करण्यास पात्र बनवले जाते. ज्यांना शिक्षण मिळते त्यांना नोकऱ्या मिळण्यासाठी त्यांची रोजगारक्षमता वाढते. मात्र तरीही भेदभाव झालेल्या आणि भेदभाव न झालेल्या समाजांच्या गरिबाभिमुख कार्यक्रमांच्या लाभार्थींमध्ये फरक असतो. भेदभाव झालेल्या गटांचा विचार करता, त्यांना जमिनीचा, उद्योग-व्यवसायाचा आणि शिक्षणाचा लाभ मिळत असला तरी त्यांच्या बाबतीत जमीन, उद्योग-व्यवसाय किंवा शिक्षण देणे एवढीच गोष्ट पुरेशी ठरत नाही. त्यांना भेदभावापासून संरक्षण देणाऱ्या उपाययोजनांची गरज असते. यामागचे कारण असे असते की, शेतकरी आणि व्यावसायिक म्हणून त्यांना भेदभावाला तोंड द्यावेच लागते. रोजगार किंवा नोकरी मिळवतानाही त्यांना या भेदभावाचा सामना करावाच लागतो. भेदभाव करण्यात आलेल्या व्यक्तीकडे शिक्षण असू शकते. परंतु तरीही भेदभावामुळे त्याला रोजगार किंवा नोकरी मिळणे शक्य होत नाही. दुसरीकडे भेदभाव केला जात नसलेल्या समाजांमधील गरीब व्यक्तींना रोजगाराच्या बाबतीत भेदभावाला तोंड द्यावे लागणार नाही. मात्र त्यांच्या जातीच्या किंवा वंशाच्या लोकांकडून त्याला किंवा तिला हितकारक, अनुकूल वागणूक दिली जाईल. या ठिकाणी भेदभाव झालेल्या गटातील व्यक्तीला भेदभाव न करता नोकरीत, शिक्षणात, शेतीत किंवा व्यवसायात न्याय्य प्रवेश किंवा प्रवेश उपलब्ध होण्यासाठी धोरणाची गरज असते. यासाठीच अनेक देशांनी भेदभाव झालेल्या समाजांसाठी गरिबाभिमुख धोरणांना पूरक म्हणून समान संधीच्या धोरणांचा उपयोग केला आहे. यामागे त्यांना नोकऱ्यांमध्ये किंवा रोजगारात, शिक्षणात आणि इतर क्षेत्रांत योग्य, न्याय्य वाटा देणे हा हेतू असतो.

> **अमेरिकेत समान रोजगार संधी कायदा आहे. नॉदर्न आयर्लंडमध्ये न्याय्य रोजगार संधी कायदा आणि भारतात अस्पृश्यता निवारण कायदा १९५५ आणि ॲट्रॉसिटी कायदा १९८९ हे कायदे आहेत.**

भेदभाव झालेल्या गटांच्या समस्या सोडवण्यासाठी तीन संचांमधील धोरणांचा वापर करण्यात आला आहे. पहिल्या संचात भेदभावाविरुद्धच्या कायद्यांच्या स्वरूपात भेदभावाविरुद्ध दिल्या जाणाऱ्या कायदेशीर संरक्षणाचा समावेश होतो. भेदभाव करण्यात आलेल्या गटातील कोणतीही व्यक्ती भेदभावाच्या प्रसंगासंदर्भात न्यायालयात दाद मागू शकते. अशा प्रकारे भेदभावविरोधी कायदा भेदभावाविरोधात संरक्षण पुरवतो. दुसरे धोरण हे रोजगार, शिक्षणासाठी, विधिमंडळांमधील, सार्वजनिक जागी दिला जाणारा प्रवेश या ठिकाणी 'न्याय्य वाट्याची' हमी देण्यासाठी असतो. या धोरणांना विविध नावांनी ओळखले जाते. नॉर्दर्न आयर्लंडमध्ये समान संधी धोरणे आणि अमेरिकेत आणि यूकेमध्ये सकारात्मक कृती धोरणे, जपानमध्ये खास उपाययोजना किंवा भारतात, नेपाळमध्ये आणि पाकिस्तानात आरक्षण धोरणे अशी त्यांची नावे आहेत. न्याय्य वाटा हा त्या समुदायांच्या लोकसंख्येतील वाट्याच्या किंवा प्रमाणाच्या संदर्भात मोजला जातो. सर्वसामान्यपणे भेदभाव करण्यात आलेल्या गटाचा लोकसंख्येतील वाटा हेच भेदभाव झालेल्या गटाच्या न्याय्य सहभागाचे मापन किंवा मोजमाप म्हणून धरले जाते. यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित हिस्सा किंवा कोटा देणे (भारताप्रमाणे) किंवा इतर प्रकरणांमध्ये वांशिक अगर धार्मिक अल्पसंख्याक लोकसंख्येचा शेष (बॅलन्स) याद्वारे हा हिस्सा मोजणे अशा विविध पद्धती वापरल्या जातात. याशिवाय काही प्रकरणांमध्ये निश्चित हिस्सा देणे किंवा किंवा लक्ष्य गाठणे

कायदेशीररीत्या बंधनकारक ठरवले जाते. काही प्रकरणांमध्ये त्यासाठी मने वळवून स्वेच्छेने हे पार पाडले जाते. दोन्ही बाबतीत उद्दिष्टये किंवा लक्ष्य गाठण्याच्या बाबतीत देखरेख ठेवण्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारची अंमलबजावणी यंत्रणा उभारण्यात येते. अमेरिकेतील फेडरल कॉन्ट्रॅक्ट कम्प्लायन्स कार्यालय आणि नॉर्दर्न आयर्लंडमधील फेअर एम्प्लॉयमेंट एजन्सी किंवा भारतातील अनुसूचित जाती-जमातींसाठीचा आयोग ही याची काही उदाहरणे आहेत.

तिसरे धोरण भेदभाव केल्या गेलेल्या गटांना नुकसानभरपाई देण्याचे आहे. प्रदीर्घ काळापर्यंत (कनिष्ठ) जातींना किंवा वांशिक गटांना मालमत्तेचे हक्क जाणीवपूर्वक नाकारल्याबद्दल भरपाई मिळवून देणे, अशी 'नुकसानभरपाई'ची व्याख्या केली जाते. विविध प्रकारच्या सकारात्मक कृतींचा, आरक्षणाच्या धोरणांचा उपयोग हा सर्वसामान्यपणे 'वर्तमानकालीन' भेदभावाच्या विरोधातील संरक्षक उपाययोजना म्हणून केला जातो हे लक्षात घेणे गरजेचे आहे. भूतकाळात प्रदीर्घ काळ सहन कराव्या लागलेल्या बहिष्कृतीच्या त्रासावर किंवा भेदभावाच्या परिणामांवर मात करण्याच्या बाबतीत या धोरणांना मर्यादा असतात. राखीव जागांप्रमाणे समान संधी कायदा आणि विविध प्रकारचे सकारात्मक कृती कार्यक्रम यांचा हेतू वर्तमानकाळात कायदेशीर संरक्षण पुरवणे आणि सध्या न्याय्य वाटा मिळेल याची हमी देणे हा असतो. परंतु भूतकाळात करण्यात आलेल्या चुकीच्या गोष्टींची भरपाई करण्याच्या बाबतीत ते अपुरे ठरतात. शतकानुशतके मालमत्तेचा हक्क नाकारल्यामुळे निर्माण झालेली मालमत्तेच्या मालकीतील असमानता ते दूर करू शकत नाहीत. म्हणून भरपाईची साधने नेमकेपणाने भूतकाळात मालमत्तेचा आणि इतर हक्क नाकारण्याबद्दल केली जाणारी परतफेड म्हणून वापरली जातात. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान त्यांच्या मालमत्तेचा विनाश केल्याबद्दल जपानी लोकांना १९८० च्या शतकात उशिरा देण्यात आलेली भरपाई हे याचे उदाहरण आहे. अशाच प्रकारची आर्थिक भरपाई अमेरिकेतील स्थानिक इंडियनांना किंवा अमेरिकन आदिवासींना आणि जर्मनीतील ज्यूंना युद्धादरम्यान जबरदस्तीने परिश्रम करवून घेतल्याबद्दल देण्यात आली. नाझीवादाचे बळी ठरलेल्यांना ऑस्ट्रियन संसदेनेही अशाच प्रकारे भरपाई दिली होती. अमेरिकेत कृष्णवर्णीयांच्या गुलामगिरीमुळे झालेल्या उत्पन्नातील नुकसानीपोटी अनेक भरपाई देण्यात आल्या. गोऱ्या लोकांकडूनही कृष्णवर्णीयांना नुकसानीची भरपाई दिली जावी यासाठी दावे करण्यात आले.

## उतरंडीचे किंवा श्रेणीबद्ध जातिभेद आणि विषमता

या पार्श्वभूमीवर विविध गटांच्या आरक्षणाच्या मागणीच्या मुद्यावर आपण चर्चा करूया. काही जातींना आरक्षण देण्याच्या प्रकरणाची आपण आधीच चर्चा केली आहे. आता आपण जातिभेदाच्या आणि जाती-विषमतेच्या स्वरूपाची चर्चा करूया. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या युक्तिवादाप्रमाणे, जातिव्यवस्था केवळ विषमतेच्या तत्त्वावरच आधारित नाही तर ती उतरंडीच्या विषमतेच्या तत्त्वावरही आधारित आहे. उतरंडीची विषमता ही गरीब असलेले आणि गरीब नसलेले किंवा 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गांमधील साध्या विषमतेहून भिन्न असते. ही एक व्यवस्था असते आणि तिच्यात एका जातीला दुसऱ्या जातीच्या वर ठेवण्यात आलेले असते. उतरंडीची विषमता जातींमध्ये उतरंडीच्या पद्धतीने, श्रेणीबद्ध विषम पद्धतीने आर्थिक, शैक्षणिक आणि नागरी हक्क देण्यावर आधारित असते. आपण ब्राह्मण वर्गापासून म्हणजे उच्च जातीपासून सुरुवात करतो आणि तिथून इतर मागास जातींपर्यंत जातो आणि अखेरीस अस्पृश्यांपर्यंत पोहोचतो. या प्रत्येक उतरंडीवर आर्थिक आणि सामाजिक हक्क श्रेणीबद्धतेने कमी कमी होत जातात आणि अस्पृश्यांना या जातिव्यवस्थेत सर्वांत तळाशी ठेवण्यात आले आहे. ब्राह्मणांना त्यांच्या खाली असलेल्या सर्व जातींपेक्षा अधिक हक्क असतात. क्षत्रिय त्यापुढचीच उतरंड आहे आणि त्यांना ब्राह्मणांहून कमी; परंतु त्यांच्या खालच्या उतरंडीवर असलेल्या इतर तीन जातींहून



अधिक हक्क असतात. वैश्यांना ब्राह्मणांपेक्षा आणि क्षत्रियांपेक्षा कमी हक्क असतात. परंतु त्यांना शूद्रांहून किंवा अस्पृश्यांहून अधिक हक्क असतात. अस्पृश्यांना मालमत्तेचा, शिक्षणाचा हक्क नसतो आणि नागरी हक्कही नसतात. त्यांच्यावर फक्त त्यांच्या वरच्या उतरंडींवरच्या चारही जातींची सेवा करणे बंधनकारक असते. याचा असाही अर्थ होतो की, ब्राह्मण वगळता प्रत्येक जातीला काही हक्क गमावण्याचा तोटा सहन करावा लागतो. त्यांना अस्पृश्यांएवढ्या भेदभावाला तोंड द्यावे लागत नाही. आपण जसजसे उतरंडीच्या वरच्या बाजूला जाऊ तसतसा भेदभाव कमी कमी होत जातो. खालच्या उतरंडीवरच्या प्रत्येक जातीला वरच्या उतरंडीवरच्या जातीच्या तुलनेत अधिक भेदभाव सहन करावा लागतो.

## आरक्षण; जर तीव्र भेदभाव असेल तर!

वर चर्चा केलेल्या सिद्धांतांवरून मिळालेला धडा असे दर्शवतो की, आरक्षणाचा किंवा तत्सम धोरणांचा वापर हा फक्त गंभीर किंवा तीव्र भेदभाव केल्या गेलेल्या समुदायांसाठी किंवा समाजासाठी केला जातो. जातिव्यवस्थेचा विचार करता ब्राह्मण वगळता सर्व जातींना काही प्रमाणात भेदभावाचा सामना करावा लागतो. परंतु आधी उल्लेख केल्याप्रमाणे सर्वच जातींच्या बाबतीत समान प्रमाणात भेदभाव केला जात नाही किंवा त्यांना समान प्रमाणात हक्कही नाकारले जात नाहीत. त्यांना भिन्न प्रमाणातील भेदभावाला तोंड द्यावे लागते. इथे प्रश्न असा आहे की, किती प्रमाणातील किंवा पातळीवरच्या भेदभावासाठी आरक्षणाच्या धोरणाच्या माध्यमातून संरक्षक उपाययोजना योजण्याची गरज आहे? स्पष्ट दिसणारा निकष असा आहे की, जर भेदभाव गंभीर किंवा तीव्र स्वरूपाचा असेल, म्हणजे भेदभावामुळे भेदभाव करण्यात आलेल्या गटाला पूर्णपणे शेतजमीन, उद्योग-व्यवसाय, शिक्षण आणि नागरी हक्क यांच्यापासून वंचित ठेवण्यात आले असेल तर अशा वेळी या गोष्टी न्याय्यपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी संरक्षक उपाययोजनांची गरज असेल. भेदभाव एवढ्या तीव्र स्वरूपाचा असेल की, विशिष्ट जातीला उत्पन्न मिळणाऱ्या मालमत्ता बिलकूल देण्यात आलेल्या नाहीत, म्हणून संरक्षक उपाययोजना गरजेच्या असतील. भेदभावाचा (किंवा आर्थिक हक्क नाकारण्याचा) परिणाम एवढा उच्च असेल की तो शेतजमीन, उद्योग-व्यवसाय, शिक्षण आणि नागरी हक्क यांसारख्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या बाबींचा अभाव असल्यामुळे प्रगतीचे दरवाजे पूर्णपणे बंद करून टाकत असेल तर संरक्षक उपाययोजनांची गरज असेल. म्हणून जाट, पटेल, मराठा यांसारख्या कोणत्याही जातीच्या आरक्षणाच्या दाव्याचा विचार करताना या जातींना किंवा समुदायांना तीव्र भेदभावाला तोंड द्यावे लागले आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे. शेतजमीन, उद्योग-व्यवसाय, शिक्षण आणि नागरी हक्क यांसारख्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या गोष्टींवरच्या मालकीचा अभाव असेल तर भेदभाव तीव्र किंवा गंभीर स्वरूपाचा आहे. दुर्दैवाने आपल्याकडे जात भेदभावाची आणि जाट, पटेल किंवा मराठा यांना सहन कराव्या लागणाऱ्या भेदभावाची उपजातीनिहाय माहिती उपलब्ध नाही. आपल्याकडे शेतजमिनीची, उद्योग-व्यवसायाची मालकी आणि शिक्षण याविषयीचीही चांगली माहिती नाही. मराठा, पटेल आणि जाट यांसारख्या उच्चतर जातींनी त्यांना तीव्र भेदभावाला तोंड द्यावे लागत असेल आणि त्या भेदभावामुळे त्यांच्यामध्ये उत्पन्न मिळवून देणाऱ्या शेतजमीन, उद्योग-व्यवसाय यांची मालकी आणि शिक्षण याविषयीचा अभाव निर्माण झाला असेल तर ती वस्तुस्थिती प्रस्थापित करण्याची गरज आहे. सुदैवाने आपल्याकडे जात जनगणनेच्या माध्यमातून जातीनिहाय माहिती उपलब्ध आहे; परंतु ती अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. शेतजमिनीची मालकी, उद्योग-व्यवसायावरची मालकी, संपत्ती, सार्वजनिक रोजगार आणि शिक्षणाची पातळी समजून घेण्यासाठी या माहितीचा वापर करून घेतला पाहिजे. जाट, पटेल, मराठा आणि इतर उपजातींना सहन कराव्या लागणाऱ्या भेदभावाची पातळी समजून घेण्यासाठी स्वतंत्र सर्वेक्षण करण्याचीही गरज आहे. त्यांच्यातील गरिबांवर लक्ष केंद्रित केले गेल्यामुळे गरिबी कमी होण्यासही मदत होईल. भेदभाव होणाऱ्या जाती म्हणून आपल्याकडे ज्या जातींविषयीची माहिती उपलब्ध आहे त्या फक्त अस्पृश्य जातीच आहेत. जातिभेदाचा आणि अस्पृश्यतेचा त्यांच्यावर झालेला परिणाम गंभीर किंवा तीव्र आहे. त्यामुळे त्यांच्याकडे मालमत्तेचा (शेतजमीन, उद्योग-व्यवसाय), शिक्षण, रोजगार यांचा अभाव आहे. तसेच त्यांना नागरी हक्क मिळालेले नाहीत. म्हणून त्यांच्यासाठी आरक्षणाच्या धोरणाचा वापर करण्यात आला आहे. इतर मागास प्रवर्गालाही आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर आणि काही प्रमाणात सोसाव्या लागणाऱ्या भेदभावाच्या पुराव्याच्या आधारावरच राखीव जागा देण्यात आल्या होत्या.


> **राखीव जागांची मागणी ही पुराव्यावर आधारित असलीच पाहिजे आणि फक्त आकलनाच्या आधारावर असता कामा नये. जोपर्यंत अशा प्रकारचा पुरावा तयार होत नाही तोपर्यंत या जातींमधील गरिबांसाठी सर्वसामान्य धोरणे राबवणे हा चांगला पर्याय आहे.**

***


Building House for your Dream's
Neelkanth Developers
Greetings!!!
ARTIS



– उत्तम कांबळे



# सामाजिक न्यायासाठीच राखीव जागा

सर्वप्रथम हे समजून घ्यायला हवं की, मानवजातीसाठी सर्वप्रथम सर्वश्रेष्ठ असतो तो सामाजिक न्याय. निसर्गातून बाहेर पडलेल्या माणसानं आपल्या श्रमाच्या, ज्ञानाच्या जोरावर हे जग जसं सुरूप केलं आहे तसंच वेगवेगळ्या विषमता जन्माला घालून हे जग कुरूपही केलं आहे. ही कुरूपता माणसाच्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आदी गोष्टींवर मर्यादा आणते. ती रंगभेद, वर्णभेद, प्रदेशभेद, भाषाभेद आदी नाना प्रकारे भेद करून समाजातल्या एका मोठ्या समूहाला एका अर्थानं गुलाम बनवते. गुलामीचं रूपही बदलत नेते. कधी तो मानसिकदृष्ट्या, कधी आर्थिकदृष्ट्या, कधी शैक्षणिक तर कधी समाजातील त्याच्या स्थानाच्या माध्यमातून गुलाम बनवला जातो. या सर्व प्रकारच्या गुलामीतून त्याला मुक्त करून त्याला गमावून बसलेल्या त्याच्या आत्मसन्मानापर्यंत घेऊन जाणं, हा आत्मसन्मान झळाळू देणं म्हणजे सामाजिक न्याय. गुलामीतून केवळ मुक्त झाल्यानंतर सामाजिक न्याय मिळत नाही, तर आत्मसन्मानाच्या मुळापर्यंत अनेक थांबे येतात. प्रत्येक थांब्यावर कोणतं ना कोणतं विषमतेचं अवरण गळून पडावं लागतं किंवा पाडावं लागतं. एक दीर्घ प्रक्रिया असते. त्यासाठी मने बदलावी लागतात. मनांनी जन्माला घातलेली व्यवस्था बदलावी लागते. एक निकोप, उजेडमान व्यवस्था बनवावी लागते. हे सारं 'पी हळद आणि हो गोरी'सारखं झटपट तर कधीच नसतं. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, घटनात्मक क्रांत्या घडवाव्या लागतात. छोटी-मोठी बंडे करावी लागतात. त्यांचा अर्थ समजून घ्यावा लागतो. विधायक, राजकीय उलथापालथ्यांना पाठिंबा द्यावा लागतो. सामाजिक न्याय म्हणजे असं एक ठिकाण, म्हणजे तेथे सारी माणसं नुसतीच भेदाभेदांतून मुक्त असत नाहीत तर आत्मसन्मानाच्या मार्गावर जाण्यासाठी स्वतःचा आतून-बाहेरून विकास घडवतात. त्यासाठीचं वातावरण तयार केलं जातं. मानसिक, सामाजिक, वैधानिक पाठिंबा दिला जातो. मी माणूसच आहे या त्याच्या आत्महुंकाराला फुलवलं जातं.



भारत असा देश होता आणि आहे की जेथे सामाजिक न्यायाचा सतत दुष्काळ आहे. बहुसंख्य समाज जो अस्पृश्य, दलित, सर्वहारा ठरवला तो सातत्यानं या दुष्काळात होरपळला गेला. होरपळून होरपळून काळा झाला. त्याच्या शरीरावर नवी तेजोमय त्वचा उगवणंच बंद झालं. आता या समाजाला या माणूसघाण दुष्काळातून बाहेर कसा काढायचा, हा प्रश्न अनेक जाणत्या माणसांच्या मनात तयार झाला. त्यापैकी महात्मा फुले एक, राजर्षी शाहू महाराज एक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक. आता आपण यांना आंबेडकरी परंपरा म्हणतो. शाहू महाराजांनी सर्वप्रथम आपल्या छोट्याशा संस्थानात दलितांसाठी राखीव जागा ठेवल्या. आता इथं एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जागा नुसत्या राखीव ठेवून चालत नाहीत तर तिथंपर्यंत म्हणजे या जागांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व प्रकारची पात्रता तयार करावी लागते किंवा तसं कायदेशीर आणि सामाजिक वातावरण तयार करावं लागतं. महाराजांनी त्यासाठी कायदे तयार केले. पैसा खर्च केला आणि विशेष म्हणजे ज्या सनातन समाजात हा प्रयोग करायचा होता तिथं सामाजिक परिवर्तनही घडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसपाटलाच्या, कारकुनाच्या जागा त्यांनी नुसत्याच राखीव ठेवल्या नाहीत, तर त्यासाठी होणाऱ्या परीक्षांमध्ये अस्पृश्य टिकून रहावेत यासाठी शिक्षण मोफत केलं. ते सक्तीचं केलं. आधुनिक शिक्षण आणलं. वसतिगृहांची सोय केली. या सर्व गोष्टींतून राखीव जागांवर पोहोचण्यासाठी एक पात्रता तयार झाली. ती घेऊन हा समाज राखीव जागांवर पोहोचला. तो जेथे पोहोचला तेथे जातव्यवस्था छळू नये यासाठी प्रयत्न केले. नुसतीच नोकरी देऊन चालत नाही तर तिथं स्वाभिमानानं, आनंदानं काम करता आलं पाहिजे यासाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेबांसारख्या उच्च व्यक्तीला बडोदा संस्थानात मोठ्या हुद्द्याची नोकरी मिळाली. शिक्षणासाठी कर्जही मिळालं होतं; पण प्रत्यक्ष त्यांना नोकरी करता आली नाही. कारण त्यांच्या विद्वत्तेवर, आत्मसन्मानावर जातींनं हल्ला केला. ना त्यांना राहण्यास घर मिळालं ना नोकरीच्या ठिकाणी माणूस म्हणून वातावरण! तर राखीव जागांचा अंतिम उद्देश म्हणजे सामाजिक न्याय असतं हे सर्वप्रथम लक्षात ठेवायला हवं.


आता आणखी एक सनातन प्रश्न! समाजातील माणसाची प्रतिष्ठा कशावर मोजली जाते? आणि तीही भारतीय समाजात– कोणता माणूस प्रतिष्ठावान असतो? श्रीमंत, ज्ञानी, नोकरीवाला, पुढारी, पैसेवाला, उद्योगपती की आणखी कोणता? याचं उत्तर असं की, यापैकी कोणीही नाही. तसं असतं तर इंदिरा गांधींना मंदिरात जाताना केसाची बट कापावी लागली नसती. उपपंतप्रधानपदावर असताना जगजीवन राम यांनी अनावरण केलेला पुतळा भ्रष्ट झाला म्हणून शुद्ध केला गेला नसता. विद्यमान राष्ट्रपतींनाही जातीचा चटका बसला नसता. महिलांना मंदिरप्रवेश नाही असे बोर्ड दिसले नसते. आणि बाबासाहेबांच्या अंगावर बडोद्यातील शिपायानं दुरून फाईल फेकली नसती. याचा अर्थ माणसाची प्रतिष्ठा ठरवणारं आणखी कोणतं मोजमाप आहे आणि ते म्हणजे जात. माणसाकडे कोणतीही पात्रता नसली पण तो वरच्या जातीतला कोणीही असला तरी तो श्रेष्ठ असतो. श्रेष्ठ होण्यासाठी त्याला पात्रता सिद्ध करावी लागत नाही; कारण तो जन्मजातच श्रेष्ठ असतो म्हणजे पात्रच असतो. खालच्या जातींचं तसं नाही. त्यांनी सर्व पात्रता पूर्ण केल्या, अगदी टाटाच्या रांगेत बसला. पंतप्रधान झाला तरी त्याचा सामाजिक दर्जा नीचच असतो. काही झालं तरी तो प्रतिष्ठेची पायरी चढू शकत नाही किंवा त्याला चढू दिलं जात नाही. स्वाभाविकच त्याला सामाजिक न्याय मिळत नाही आणि तो न मिळाल्यानं तो माणूस ही संज्ञा प्राप्त करू शकत नाहीय. आता या वर्षानुवर्षे हरवलेल्या,

हरवल्या गेलेल्या, अस्पृश्य ठरल्या गेलेल्या, विटाळाचं-द्वेषाचं कारण ठरल्या गेलेल्या माणसाला सामाजिक न्याय कसा द्यायचा? त्यासाठी अनेक मार्ग आहेत. पैकी एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे राखीव जागा. मला वाटतं राखीव जागा गरिबाला की सर्वहारा आणि सामाजिक न्याय गमावलेल्यांना, याचं उत्तर मला वाटतं इथं मिळेल. घटनाकारांच्या आणि फुले-शाहूंच्या मनात हीच कल्पना होती. दारिद्र्य ही तशी किरकोळ गोष्ट असते. माणूस त्याच्यावर मात करू शकतो; पण सामाजिक दर्जाचं, सामाजिक न्यायाचं तसं नाहीय. त्यासाठी माणूस, मन, समाज बदलण्यासाठी कार्यक्रम घ्यावे लागतात. इथला माणूस जातीत जन्माला येतो, जातीत वाढतो आणि जातीच्या खांद्यावरून शेवटच्या प्रवासाला निघून जातो. दारिद्र्याचं म्हणजे वर्गाचं तसं नाहीय. पेट्रोलपंपावर नोकरी करणारा अंबानीचा पोरगा देशातला श्रीमंत माणूस होऊ शकतो आणि शेवटच्या प्रवासात एसी शववाहिकेतून स्मशानात जाऊ शकतो. फुल्यांनी सांगितल्याप्रमाणं जात इतकी बळकट आणि माणसाला पशुवत जीवन देणारी आहे की, मेल्यानंतरही सारी माणसं एकाच स्वर्गात म्हणजे एकाच ठिकाणी जात नाहीत. कोणी स्वर्गवासी, कोणी वैकुंठवासी, कोणी ख्रिस्तवासी, कोणी लिंगवासी तर कोणी बुद्धवासी आणि पैगंबरवासी होतो. आता अशा परिस्थितीत राखीव जागांसाठी जी पात्रता आहे ती समाजात सर्वहारा असणाराच माणूस निवडण्याची. माणसाला श्रीमंत करणं आणि केवळ नोकऱ्या देणं हा मर्यादित उद्देश राखीव जागांमागे नाहीय. आर्थिक प्रगती करण्यासाठी राज्य आणि केंद्राकडे अनेक उपक्रम आहेत. अर्थात हे धोरण नीट राबवले जात नाही आणि नीट राबवा असा आग्रह कोणी करत नाहीत हा भाग वेगळा. गरीब-श्रीमंत, दलित सवर्ण आणि स्त्री-पुरुष असा भेदाभेद न करता राज्यघटनेने जगण्याचा हक्क दिला आहे. त्याचं रूपांतर सन्मानानं जगण्याच्या हक्कात रूपांतर व्हावं हेही कोणी बोलत नाही. भीक मागून पोट भरणं, चोऱ्या करून पोट भरणं याला जगण्याचा हक्क म्हणत नाहीत. जगणं सन्मानाचं हवं. सर्वांच्याच वाट्याला ते यावं असं चक्र नाही; कारण परिस्थिती विषम असते. त्यामुळे राखीव जागांचा एक प्रमुख उद्देश असाही आहे की, सामाजिक प्रतिष्ठा नाकारणारी विषमता संपवणं आणि ती संपेपर्यंत म्हणजे जातिअंतापर्यंत या तरतुदी कायम ठेवणं. जातीय विषमता नसती तर कदाचित राखीव जागांची तरतूदही आली नसती. जात हे वास्तव आहे. ते माणूसपण नाकारतं. घोषित-अघोषित गुलाम तयार करतं म्हणून या वास्तवावर घाला घालण्यासाठी राखीव जागा आहेत. त्या किती काळ असाव्यात याचं उत्तर आपोआपच समजायला हवं. केवळ नोकरी, केवळ शिक्षण, केवळ बढती, केवळ आर्थिक विकास आणि केवळ दारिद्र्य निर्मूलन एवढा उद्देश राखीव जागांसाठी नाहीय. याही पलीकडं काही वेगळं गाठायचं आहे आणि ते म्हणजे जातिअंत! जातिअंत झाल्यावरच वर्गअंत होऊ शकतो; कारण आपल्याकडचे वर्गही कम्युनिस्टांना पटले नाहीत. वर्ग जातीतूनच होतात हे डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेलं तत्त्व आजही कायम आहे.

आता राजकीय आरक्षणाचा प्रश्न. बहुतेक वेळा राखीव जागांचे विरोधक हे दोन प्रकारचं आरक्षण एकत्र मिसळतात. केवळ राखीव जागा बंद करण्यासाठी त्यांना मुद्दा हवा असतो. शैक्षणिक आणि राजकीय जागांची मिसळ ते करतात. काही जण अज्ञानापोटी तर काही जण जाणीवपूर्वक हे करत असतात. राजकीय जागांमध्ये किंवा राजकारणामध्ये डॉ. बाबासाहेबांना फार मोठे तथ्य वाटत नव्हतं. पहिल्यांदा समाजक्रांती, सामाजिक सुधारणा मग स्वातंत्र्य वगैरे गोष्टी असं त्यांचं ठाम मत होतं. ते हे शेवटपर्यंत मांडत राहिले. यामुळे काहींनी त्यांना स्वातंत्र्यविरोधक ही पदवी दिली; पण बाबासाहेबांनी पर्वा केली नाही. स्वातंत्र्यानंतरही आपण गुलामच राहणार असू तर गुलाम टिकवणारं स्वातंत्र्य आम्हाला नकोय. स्वातंत्र्यात आमचा वाटा काय राहील आणि त्याबरोबरच आमचा माणूस म्हणून दर्जा काय राहील? हा त्यांचा प्रश्न होता. राजकीय आरक्षण सुरुवातीला दहा वर्षांसाठी आणि नंतर किती काळ असावं याबाबत संसदेनं चर्चा करून ते ठरवावे असं सांगत बाबासाहेबांनी हा विषय संसदेच्या विवेकावर सोडून दिला. संसद ठराव करते आणि राजकीय आरक्षणाची मुदत वाढवून देते. अशा प्रकारे या विषयाची मूळ राखीव जागांशी सांगड घालणं. लाभार्थ्यांना सरकारी जावई म्हणणे गैर आहे; पण विरोधक हे सारे करत राहतात. लोकसभेच्या सभापतीदेखील असा गैरसमज किंवा समज करून बसतात. राजकारणातील राखीव जागांचा संबंध सत्तावाटपाशी आहे, तर दुसऱ्या आरक्षणाचा संबंध सामाजिक न्यायाशी म्हणजे जातिअंताशी आहे. जातिअंत कधी होणार हे कायदा नव्हे तर समाज ठरवतो. ज्यांना राखीव जागामुक्त समाज किंवा हिंदुस्थान (भारत आमचा) हवा असंल त्यांनी वादविवादाचे, युक्तिवादाचे खेळ खेळण्याऐवजी जातिअंत कसा होणार आणि कोण करणार हे सांगण्याचं धैर्य दाखवले पाहिजे. त्याऐवजी जातीय संघर्ष पेटवणं, जातवाद वाढवणं यांसारखे सत्तेच्या खेळात उपयोगी पडणारे धंदे बंद करावेत. राखीव जागा जाती गच्च करत नाहीत, तर त्या सैल करतात. राखीव जागांमुळे होणारे लाभ घेऊन शेवटी जातिअंताकडेच जायचे असते. जाती गच्च करण्याकडे नव्हे. सुरुवातीला जाती गच्च जरी दिसत असल्या तरी राखीव जागा ही एक शिडी आहे. मुक्कामाचं ठिकाण आल्यावर कोणी शहाणा माणूस ती खांद्यावर घेऊन फिरणार नाही हेही तेवढंच सत्य आहे. पाण्यातली नाव सोन्याची जरी असली तरी

तिचं काम पैलतीरावर प्रवासी सोडणे एवढंच असतं. किनाऱ्यावरचा रस्ता चांगला आहे. टोलमधून उभा केला आहे म्हणून कोणतीही नाव पाण्याबाहेर चालवण्याचा विचार कोणी करत नाही किंवा प्रवासी तो खांद्यावर घेऊन फिरत नाही. राखीव जागांचं तसंच आहे. ज्या दिवशी सामाजिक न्याय उगवेल त्या दिवशी राखीव जागा मावळायला हव्यात. प्रश्न एवढाच आहे की, ही जबाबदारी कुणाची आहे? तर ती स्वतःला श्रेष्ठ आणि देवाचे अवतार समजून इतरांना दानव ठरवणाऱ्या समुद्राची जबाबदारी आहे. ती पार न पाडता राखीव जागांचा चुकीचा अर्थ लावणे गैर आहे.

राखीव जागाच उद्धाराचं एकमेव साधन आहे असं तोच समाज म्हणू शकतो जेथे सामाजिक, राष्ट्रीय, नैसर्गिक मालमत्तेचं, संपत्तीचं वाटप विषम होत असतं. ही विषमता संपवण्याऐवजी वाढवण्याचं काम सरकार करत असतं. कारण संपत्ती एककेंद्री करणाऱ्यांशी त्यांचे साटेलोटे तयार झालेले असते. जसे की, अंबानी रात्रीत वीस-वीस टी.व्ही., चॅनल खरेदी करू शकतो. दीडशे खासदार खरेदी करू शकतो किंवा निवडूनही आणू शकतो. राफेलचं काम घेऊ शकतो. सर्व नैसर्गिक संपत्ती जी प्रत्येक भारतीयाची आहे तीही खरेदी करू शकतो आणि कुटुंबातल्या पाच-सहा सदस्यांसाठी दीडशे मजली घरही बांधू शकतो. देशाची सारी संपत्ती ज्यांच्या हातात आहे असे दीडशे कोटी लोकसंख्येत आठ-दहा लोकच आहेत आणि देशाची सत्ता जेथे एकवटली आहे आणि तीही सत्तर वर्षांपासून अशी फक्त दीड-दोनशे कुटुंबं आहेत. याचा अर्थ या सर्वांनी सारी सत्ता आणि संपत्ती राखीव ठेवली आहे. या राखीव प्रकरणाविरुद्ध कोणी आवाज उठवत नाहीय. आपण गरीब का राहतो आणि आपण सत्ताहीन का होतो याची कारणं राखीव जागांत नव्हे तर सत्ता आणि संपत्तीच्या विषम वाटपात आहेत. राखीव जागा लागू झाल्यावरही समतेचं तत्त्व अमलात आलेलं नाही हेही ध्यानात घ्यायला हवं. ऐंशी टक्के मागास समाजासाठी पन्नास टक्के जागा राखीव आहेत आणि वीस टक्के वरच्या वर्गा-वर्णासाठी पन्नास टक्के जागा राखीव आहेत. नोकऱ्या, बढत्या या व्यक्तिगत जशा आहेत तशा त्या देशाची मालमत्ताही आहेत. त्यांचं वाटप आपण विषम पद्धतीनं करतोय आणि राखीव जागांना विरोधही करतोय. महिलांच्या पन्नास टक्के आरक्षणाला कोणी विरोध करत नाही; कारण सर्वच श्रेणीतल्या महिला लाभार्थी असतात. विरोध होतो तो सामाजिक न्याय नाकारल्या गेलेल्यांच्या राखीव जागांना. अर्थात सर्वांत मोठा सामाजिक न्याय महिलांना नाकारला गेला आहे. शूद्रापेक्षा शूद्र ती ठरवली गेलीय. तिच्यासाठीच्या राखीव जागांचं कोणीही शहाणा माणूस समर्थनच करेल. राखीव जागांचा निकष जात की वर्ग, गरीब की श्रीमंत? त्यामागं नेमकं काय गृहीत धरण्यात आलं होतं हे पुन्हा पुन्हा समजून घेण्याची गरज आहे. मला नेहमीच एक उदाहरण सांगण्यात येतं आणि ते असं उच्चजातीय तरुण नीच जातीय माणसाकडे शिपाई आहे. तर नीच जातीचा हा साहेब खूप मोठा पदवीधारक, पदधारक आणि संपत्तीधारक आहे. हे दोघेही एखाद्या धार्मिक कार्यक्रमाला जातात तेव्हा तिथं असणारी सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक प्रतिष्ठा फक्त उच्च जातीच्या शिपायाला मिळते साहेबाला नव्हे; कारण तो नीच जातीचा आहे. हा शिपाईही आपल्याला लाभलेली प्रतिष्ठा ओंजळ भरून साहेबाला देत नाही आणि व्यवस्थाही देत नाही. आता प्रश्न आहे तो सुरुवात कोठून करायची? वर्गापासून, वर्णापासून, दारिद्र्यापासून की अभावग्रस्त सत्तेपासून? एक मोठा गंभीर प्रश्न तयार केला जातोय. तो द्वेषावर आणि वर्गावर उभा केला जातोय. सामाजिक न्याय, बंधुता आदींशी तो सुसंगत नाहीय. राखीव जागांच्या लाभार्थ्यांनाही ठरवायला हवं की सामाजिक न्यायाकडं जाण्यासाठी एक मार्ग म्हणजे राखीव जागा. हा मार्ग महत्त्वाचा आणि हक्काचा असला तरी सामाजिक विषमतेविरुद्ध प्रबोधन, आंदोलन, बंड करत विषमतेच्या गळ्याला नख लावण्याची तयारीही करायला हवी. अर्थात, ही लांब पल्ल्याची लढाई आहे.



***

With Best Compliment

# MONTECARLO LIMITED



# आरक्षण एकमेव रक्षणकर्ता नाही




पी. बी. सावंत
माजी न्यायमूर्ती


**आरक्षणाच्या मुद्यावरून विविध राज्यांत सुरू असलेल्या आंदोलनांनी देश ढवळून निघाला आहे. मागास प्रवर्ग कोणता आणि मागासलेपण कसे ठरवायचे, या विषयावर चर्चा सुरू आहेत. घटनेतील तरतुदींचा अर्थ लावून बाजू मांडली जात आहे. परंतु या तरतुदी आणि वस्तुस्थिती या दोहोंचा मेळ साधून आपल्याला पुढे जायचे आहे. आरक्षण कुणासाठी आहे, याऐवजी ते कशासाठी आहे, हा प्रश्न महत्त्वाचा असून, पूर्वग्रहदूषित नजरेने न पाहता त्याचा विचार करायला हवा. तसेच, सर्वच समाजघटकांनी राष्ट्रहित अंतिम मानायला हवे.**

अलीकडच्या काळात काही ठळक जातिसमूहांकडून आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलने होत असल्याचे आपण पाहतो आहोत. हरियाणातील जाट, गुजरातमधील पाटीदार, महाराष्ट्रातील मराठा समूहांचा यात समावेश आहे. या सर्व समुदायांमध्ये एक समान धागा आहे. तो म्हणजे, जातिव्यवस्थेत आपल्या जातीचे स्थान उच्च आहे असे हे सर्वच समुदाय मानतात; परंतु चरितार्थाची साधने अपुरी असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या ते असुरक्षित आहेत. पुरेसे उत्पन्नही नाही आणि सामाजिक प्रतिष्ठेमुळे काही मागणेही अपमानास्पद वाटते अशा विचित्र कोंडीत हे समुदाय सापडले आहेत. विशेष म्हणजे, हे तीनही समुदाय समाजातील वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन्ही समाजांच्या तिरस्काराचे धनी ठरले आहेत.

मराठ्यांचे उदाहरण घ्यायचे झाल्यास महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात हा समुदाय आंदोलने करीत आहे. प्रचंड संख्येने रस्त्यावर उतरलेल्या या गर्दीत सर्वच वर्गातील स्त्री-पुरुषांचा तसेच बुद्धिजीवींपासून कष्टकऱ्यांपर्यंत सर्वांचा समावेश आहे. कोणत्याही राज्यात एकाच जातीची सर्वाधिक लोकसंख्या असलेला हा समुदाय असून, महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ३२ टक्के संख्या मराठा समाजाची आहे. ही प्रचंड लोकसंख्या एकाच वेळी या समाजाची ताकदही आहे आणि दुसरीकडे कमकुवतपणाही ठरला आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासूनच सर्व पातळ्यांवरील लोकशाही संस्थांमध्ये या समाजाला मोठे प्रतिनिधित्व मिळाले. परंतु पारंपरिकदृष्ट्या असलेला आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा जमेस धरता बिगरसरकारी संस्था, प्रतिष्ठेच्या संस्था, तसेच स्पर्धात्मक आणि नियोजनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या संस्थांसह पारंपरिकरीत्या उच्च जातींचे वर्चस्व असलेल्या व्यवसायांमध्ये त्यांना तुलनेने योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले नाही.

उलटपक्षी या समाजातील बहुतांश










लोक अंगमेहनतीच्या व्यवसायांमध्ये आणि सेवांमध्ये असल्याचे दिसून येते. गिरणी कामगार, कारखान्यातील कामगार, हमाल आणि माथाडी कामगार, घरकाम करणाऱ्या कामगारांसह सर्व प्रकारचे असंघटित कामगार, शेजमजूर आणि गेल्या काही वर्षांपासून हजारोंच्या संख्येने आत्महत्या करीत असलेले अल्पभूधारक शेतकरी, चतुर्थश्रेणी कार्यालयीन कर्मचारी, पोलिस दलातील कॉन्स्टेबल आणि लष्करी जवानांमध्ये या समाजातील लोकांचा समावेश मोठ्या संख्येने आहे. मराठा समाजातील अनेक कुटुंबे झोपडपट्टीत राहणारी, अशिक्षित तसेच दारिद्र्यरेषेखालीही आढळतात. असे असतानासुद्धा त्यांना 'सामाजिकदृष्ट्या मागासलेले मानले जात नाही. जाट आणि पाटीदार समाजाची स्थिती याहून फारशी वेगळी नाही. या पार्श्वभूमीवर या समाजांच्या आरक्षणाच्या मागणीची चिकित्सा करावी लागेल'.

आरक्षण केवळ 'सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या' मागासलेल्या समुदायांसाठी असून, आर्थिक मागासलेपणासारख्या अन्य कोणत्याही निकषांवर ते देण्याची तरतूद नाही. या मुद्याभोवती या तीन समाजांच्या आरक्षणाचा वाद केंद्रित झाल्याचे दिसते. 'सामाजिकदृष्ट्या मागास' कोणाला म्हणायचे आणि एकूण जागांच्या किती टक्के आरक्षण द्यायचे, हाही वादाचा मुद्दा उपस्थित झाला आहे. पहिल्या मुद्याचा विचार करायचा झाल्यास, जो आर्थिकदृष्ट्या मागास आहे, तोच सामाजिकदृष्ट्याही मागास आहे. अर्थात, मंडल आयोगाने सामाजिक मागासलेपण ठरविण्यासाठी काही निकष नव्याने सांगितले आहेत. हे निकष लावायचे ठरविले तरी या समुदायांना सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग नाकारता येत नाही. अर्थात, या प्रवर्गाचे लेबल या समुदायांनी नाकारले आहे.

घटनेतील कलम १५ (४) हे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी असलेल्या आरक्षणाच्या तरतुदी सांगणारे असून, अशा संस्थांमध्ये 'अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या' मागास घटकांनाच केवळ शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण मिळावे, असे म्हटले आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणारे कलम १६ (४) मात्र या आरक्षणाचा विस्तार या प्रवर्गाच्या पलीकडे करते आणि नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नसलेल्या कोणत्याही मागास प्रवर्गापर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचवावा असे सांगते. एखाद्या जातीचा समावेश मागास प्रवर्गात करताना घटनेतील या तरतुदींचाही बारकाईने विचार करायला हवा. या तरतुदीनुसार सरकारी नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नसलेला 'आर्थिकदृष्ट्या मागास समाज'च फक्त आरक्षणास पात्र ठरतो. अर्थात, अनेक न्यायालयीन निवाड्यांमधून असे दिसून येते की, त्यांनी कलम १६ (४) मधील 'मागास प्रवर्गा'ची व्याख्या कलम १५ (४) मध्ये दिलेल्या मागास प्रवर्गापुरती मर्यादित केली आहे. कलम १६ (४) ची स्पष्ट परिभाषा करताना असे करणे उचित ठरत नाही. त्यामुळे कलम १६ (४) चा सर्वंकष अर्थ लावताना आपल्याला त्यात आर्थिक आणि सामाजिक अशा सर्वच प्रकारच्या मागास प्रवर्गाचा समावेश करावा लागेल. अशाप्रकारे अर्थ लावला गेल्यास मराठा, जाट आणि पाटीदार हे समुदाय सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळण्यास पात्र ठरतील. अर्थात सध्या त्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नाही असे स्पष्ट झाले तरच! असे आरक्षण देण्यासाठी घटनेत दुरुस्ती करण्याची गरज भासणार नाही. राज्य सरकार एखाद्या विधेयकाद्वारे वा आदेशाद्वारे आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी स्वतंत्र प्रवर्ग निर्माण करू शकेल आणि योग्य कोटाही ठरवू शकेल. अर्थातच, असा प्रवर्ग निर्माण करताना ज्या समुदायांचा समावेश इतर मागास प्रवर्गात करण्यात आला आहे, त्यांना या प्रवर्गापासून दूर ठेवले जाईल, अशी काळजी घेणे आवश्यक आहे.

अर्थात, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आरक्षण देताना कलम १५ (४) अन्वये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग असा स्पष्ट उल्लेख असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गांना या बाबतीत आरक्षण देता येणार नाही. अशा समाजघटकांना नव्याने आरक्षण द्यावयाचे झाल्यास कलम

१५ (४) मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक ठरेल आणि अशा समाजघटकांचा स्वतंत्र संवर्ग त्यात समाविष्ट करावा लागेल. या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, सर्वच अभ्यासक्रमांसाठी इच्छुक असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सामावून घेण्याइतक्या जागा संबंधित राज्य सरकारे का निर्माण करीत नाहीत? असे करणे शक्यही आहे आणि ते केल्यास कोणत्याही संवर्गाला शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आरक्षणाची मुळात गरजच उरणार नाही. शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणासाठी सध्या जी आंदोलने पाहायला मिळतात ती वस्तुतः शिक्षणाच्या वाढत्या खर्चामुळे उद्‌भवलेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच वसतिगृहे, पुस्तके आदी सुविधा निःशुल्क उपलब्ध होतात. अशाच सुविधा आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिल्या गेल्यास अशी आंदोलने होणारच नाहीत. आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण आणि अन्य सुविधा नि:शुल्क देणे सर्व राज्य सरकारांना शक्य आहे. त्यासाठी करही वसूल करता येऊ शकतात. मनुष्यबळ तयार करण्यासाठी केलेली गुंतवणूक प्रगतीच्या दिशेने नेते हे विसरता कामा नये. आता महत्त्वाचा प्रश्न उरतो तो शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये कोणत्या टक्केवारीने आरक्षण द्यायचे याचा. या ठिकाणी एक लक्षात घेतले पाहिजे की, एखाद्या विशिष्ट जातीला किंवा समुदायाला किती कोटा द्यायचा, हे कायद्याने निश्चित करता येत नाही. तसा प्रयत्न राजकीय गरज म्हणून केल्यास कायद्याच्या कसोटीपुढे तो टिकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, एकंदर राखीव जागांचे प्रमाण ४९ टक्के एवढे निश्चित करण्यात आलेले आहे आणि ते करताना आरक्षण हे समतेच्या तत्त्वाला अपवाद मानण्यात आले आहे. या गोष्टीकडे नव्याने पाहणे गरजेचे आहे. अपवाद हा नियमापेक्षा लहान असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या स्थितीचा विचार करता, आरक्षण हा समानतेच्या तत्त्वाला अपवाद ठरू शकतो का? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शतकानुशतके या देशात सामाजिक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग (मराठा, जाट आणि पाटीदार आदींचा समावेश न करता) या प्रवर्गामधील लोकांची संख्या २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ६२.२ टक्के इतकी आहे. अनुसूचित जातींची लोकसंख्या १६.६ टक्के, अनुसूचित जमातींची लोकसंख्या ८.६ टक्के तर इतर मागासवर्गाची (ओबीसी) लोकसंख्या ४१ टक्के इतकी आहे. ही आकडेवारी प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळी आहे. दासगुप्ता यांच्या नेतृत्वाखालील संसदीय समितीच्या मते, ७७ टक्के लोकसंख्येचे उत्पन्न दिवसाकाठी २० रुपयांपेक्षाही कमी आहे. मागासलेपणाचा अभ्यास करणाऱ्या या समितीच्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष असे सांगतात की, देशातील कमीत कमी ८५ टक्के लोक मागासलेले आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास मागासलेपण हा या देशातील नियम आहे आणि पुढारलेपण हा अपवाद आहे. असमान बहुसंख्याक लोक समान अल्पसंख्याकांसमवेत येथे राहतात. असमान लोकांना समानतेने वागविणे हा समान लोकांना असमानतेने वागविण्याइतकाच अन्याय ठरेल. म्हणजेच, या देशातील प्रचंड संख्येने (८५ टक्के) असलेल्या लोकसंख्येवर मुळात अन्याय होतच आहे. या दृष्टिकोनातून पाहिल्यास एखाद्या विशिष्ट घटनेत पुढारलेल्या समाजातील एखाद्याला चांगले गुण मिळूनसुद्धा त्याची संधी कमी गुण मिळविणाऱ्या मागास समाजातील उमेदवारास मिळणे हा आरक्षणामुळे झालेला अन्याय वाटत असला तरी त्यांना अन्याय मानता येत नाही आणि समानतेच्या तत्त्वाला अपवादही मानता येत नाही. याहून महत्त्वाची बाब म्हणजे, मागास समाजातील उमेदवाराला मिळालेले कमी गुण हे वस्तुतः कमी मानता येत नाहीत. कारण तो आणि पुढारलेल्या समाजातील उमेदवार ज्या परिस्थितीत राहतात



आणि अभ्यास करतात त्याचाही विचार करावा लागतो. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निवाड्यानुसार अशा परिस्थितीत मागास समाजातील उमेदवाराने मिळविलेले ४० टक्के गुण हे पुढारलेल्या समाजातील उमेदवाराने मिळविलेल्या ७० टक्के गुणांच्या बरोबर मानायला हवेत. अशा प्रकारे संतुलित केलेले उच्च प्रवर्गातील उमेदवाराचे जास्त गुण हे वस्तुतः जास्त ठरत नाहीत. आरक्षणाचा हेतू मागास प्रवर्गांना पुढारलेल्या समुदायांच्या बरोबरीला आणणे आणि विविध समाजघटकांमध्ये समानता प्रस्थापित करून राष्ट्राची एकता आणि अखंडत्व अबाधित राखणे हा आहे. समाजात प्रभावीरीत्या समानता आणण्याचे ते साधन असल्यामुळे आरक्षण हे समानतेच्या नियमाला साह्यभूत ठरते; अपवाद नव्हे. त्यामुळेच सध्या अस्तित्वात असलेले ४९ टक्के आरक्षण तत्त्वत: आणि व्यावहारिकदृष्ट्याही पूर्ण न्याय देणारे ठरत नाही.

मागास प्रवर्गातून येणारे उमेदवार बुद्धिमान, कार्यक्षम आणि हुशार नसतात या गृहितकावर हा गैरसमज आधारलेला आहे. हे गृहितक मुळातच या देशातील बहुसंख्य समाजाचा अनादर करणारे आहे. वस्तुतः चमक दाखविण्याची संधीच न मिळाल्याने मागास प्रवर्ग अविकसित, अर्धविकसित राहिले आहेत; बुद्धी, क्षमता नसल्यामुळे नव्हे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वत:चेच उदाहरण घ्या ही बाब सिद्ध करणारे आहे. 'एरा सेझियन' या संस्थेने यासंदर्भात तमिळनाडूत केलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष दि. ८ ऑक्टोबर १९९० च्या 'द हिंदू'मध्ये प्रसिद्ध झाले होते. या अहवालात खुला प्रवर्ग, मागास प्रवर्ग, अतिमागास प्रवर्ग आणि अनुसूचित जाती यांना व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश देण्यासाठीच्या कट ऑफ पातळीची माहिती देण्यात आली होती. इंद्रा सावनी विरुद्ध भारत सरकार या दाव्यातील माझ्या निकालपत्राच्या ११ अ या परिच्छेदात हे निष्कर्ष पुन्हा एकदा उद्धृत करण्यात आले आहेत. जागेच्या अभावी या ठिकाणी कट ऑफ पातळीचे कोष्टक देणे शक्य नाही. नमुन्यादाखल आपण मद्रास विद्यापीठाच्या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीचे (एमबीबीएस) कट ऑफ पातळीचे कोष्टक पाहू शकतो. कट ऑफ गुणांची पातळी खुल्या प्रवर्गासाठी ९५.२२ टक्के, मागास प्रवर्गासाठी ९३.१८ टक्के, अतिमागास प्रवर्गासाठी ८९.६२ टक्के आणि अनुसूचित जातींसाठी ८३.९८ टक्के असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले होते. मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसंदर्भात केल्या जाणाऱ्या प्रचारातील फोलपणा या कोष्टकातून कळून येतो. मागास प्रवर्गातील विद्यार्थी ज्या प्रतिकूल, भौतिक आणि सामाजिक परिस्थितीत राहतात आणि अभ्यास करतात, ती विचारात घेता गुणवत्तेच्या बाबतीत त्यांच्यात कमतरता तर नाहीच; उलट खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ते अधिक गुणवंत आहेत, असेच म्हणावे लागते.

**आरक्षणामुळे शिक्षणाचा आणि प्रशासनाचा स्तर खालावला आहे, असा जो विचार अनेक जण करतात तो चुकीचा आहे.**

आपण नेहमी एक गोष्ट विसरतो, ती म्हणजे या देशाने आजवर जी काही प्रगती केली आहे, त्यात पुढारलेल्या प्रवर्गातील अवघ्या १५ टक्के लोकांचेच योगदान आहे. उर्वरित ८५ टक्के लोकांना पुढारलेल्या समाजांप्रमाणे सुविधा आणि सुसंधी मिळाल्या असत्या तर या देशाने आपल्याकडील उपलब्ध संसाधने आणि मनुष्यबळाच्या जोरावर जगात प्रगत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांच्या बरोबरीने प्रगती साधली असती. आरक्षणे ही मागास प्रवर्गातील लोकांना प्रगत प्रवर्गात प्रवेश मिळविण्यासाठी सक्षम करण्याच्या हेतूने दिली जातात. त्यामुळे आरक्षणाच्या ४९ टक्के या मर्यादेचा समानतेच्या तत्त्वानुरूप सैद्धांतिकदृष्ट्या तसेच देशातील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवरही जरूर पुनर्विचार करायला हवा. ४९ टक्क्यांची मर्यादा ही घटनात्मक नसून, तो न्यायालयीन निर्णय आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने आढावा घेऊन त्यात बदल केला तर तो केला जाऊ शकतो.

मागास प्रवर्गांनाही या वस्तुस्थितीची जाणीव करून देणे गरजेचे आहे की, आरक्षण हा त्यांचा एकमेव रक्षणकर्ता नाही. मागास प्रवर्गात समाविष्ट होण्यासाठी किंवा आपला समुदाय मागास आहे हे सिद्ध करण्यासाठी जी स्पर्धा सध्या सुरू आहे, ती त्यांच्या आणि देशाच्याही हिताची नाही. वर उल्लेखिल्याप्रमाणे, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रत्येकाला आवडीप्रमाणे प्रवेश घेता येईल इतक्या जागा निर्माण करण्यासाठी राज्यांनी तातडीने पावले टाकायला हवीत. असे केले तरच शिक्षणातील आरक्षणाची गरज संपुष्टात आणता येईल. त्याचप्रमाणे कोणत्याही जाती-जमातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळण्याची व्यवस्थाही राज्यांनी करायला हवी. नोकऱ्यांचा विचार करायचा झाल्यास शेतीतील सुधारणांपासून सुरू होणाऱ्या आर्थिक विकासात या समस्येचे उत्तर दडले आहे. एवढे केले तरी प्रत्येक स्त्री-पुरुषाला चरितार्थासाठी पुरेसे देण्याची ताकद शेतीमध्ये आहे. त्याचप्रमाणे सर्व जातिसमूहांनी आपले लक्ष राष्ट्रीय हिताच्या संवर्धनावर केंद्रित करायला हवे.

**शब्दांकन - चेतन शिंदे**

***



YuZen
Shaping Career

# YuZen Consultancy Services

## We have success stories and on the path of our vision



**Konnichiwa,**

**YuZen Consultancy Services has completed the 1st mile stone.**

**Our 10 students started working in Japan with a minimum salary of Yen 195,000 = ₹ 125,000 per month.**

**After Venerable Bhanteji Surai Sasaiji's initiative of sending our engineers to Japan in 1997, this is the first time within a span of 1 year our 10 students secured job in Japan through the consistent coaching and guidance of YuZen Consultancy. All these candidates has continuously studied Japanese Language up to N3 level for 1.5 years along with some technical skills of respective fields.**

For inquiry and queries please contact our office.


**Mahesh Khaire +91 9820963268 / +91 79-72472853**

**Web : www.yuzenconsultancy.com** **Email : consultyuzen@gmail.com**

**Reg Office:** 11, Ground Floor,Block B, J K Sawant Marg,
Opposite Yashwant Natya Mandir, Mahim West Mumbai - 400 016

**Nagpur Office:** 24, Ekmat Housing Society, Near Kala Maruti Mandir, Off Omkar Nagar
Besa Road, Omkar Nagar Colony, Nagpur - 440027

# मनुवाद आणि मनिवादाला ठेचून काढा



*ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील यांची 'सध्याची सामाजिक व राजकीय परिस्थिती आणि आरक्षणाचा प्रश्न' या विषयावर प्रा. डॉ. मिलिंद कसबे यांनी घेतलेली ही विशेष मुलाखत...*

**प्रश्न : सध्या महाराष्ट्रात आरक्षणाचा मुद्दा अधिक प्रखर होत आहे. विशेषतः मराठा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आहे. याविषयी तुमची भूमिका काय आहे?**

उत्तर : आरक्षणाबाबत माझी भूमिका स्पष्ट आहे. आता आरक्षण मागणारे जातीनिहाय लोकलढे उभे राहत आहेत हे खरे आहे; परंतु केवळ आरक्षणाची मागणी करून आपले प्रश्न सुटणार नाहीत असे मला वाटते. आज आरक्षणाच्या समर्थनार्थ बोलणे उचित आहे असेही मी समजत नाही. आरक्षणाच्या मागणीचे मूळ काय आहे ते नीट समजून घेतले पाहिजे. केवळ मोर्चे काढून आरक्षण मिळेल असे मला वाटत नाही. एकदा की आरक्षणाचे मूळ काय आहे ते समजून घेतले की, मग त्यात राजकारण येणार नाही.

मी सांगतो की, आम्ही केजी टू पीजीपर्यंतच्या मुलांना मोफत शिक्षण आणि बेरोजगारांना भत्ता मागतोय. त्यात आपले सगळे प्रश्न सुटतात असे मला वाटते. भारतीय संविधानाची काटेकोर अंमलबजावणी करावी, सर्वांना मोफत शिक्षण द्यावे आणि बेरोजगारांना निर्वाहभत्ता दिला जावा. या तीन गोष्टी केल्या की, आरक्षणाचा प्रश्न राहणार नाही अशी आमची भूमिका आहे. परंतु आरक्षणाच्या प्रश्नाला मुळापासून संपवण्यासाठी सरकारने ज्या उपाययोजना करायला हव्यात त्या केल्या जात नाही असे मला वाटते.

**प्रश्न : वाढत्या असहिष्णुतेची कारणं काय आहेत?**

उत्तर : असहिष्णुता कमालीची वाढत आहे. मानवी मूल्यांचा संकोच होत आहे. संविधानाने बहाल केलेल्या मूलभूत हक्कांवर गदा येत आहे हे सारे खरे आहे; पण आज भारतापुढे सर्वांत मोठे संकट मनुवादी आणि मनिवादी व्यवस्थेचे आहे. या दोन्ही व्यवस्थेने आमच्या देशाचा मोठा घात केला आहे. आपल्या देशात मनुवाद्यांचा हस्तक्षेप पूर्वीपासूनच आहे; पण त्यांचे सरकार सत्तेवर आल्याने ते सर्वच क्षेत्रात मोक्याच्या जागी जाहीर हस्तक्षेप करू लागले आहेत. मी नेहमी म्हणत असतो की, संघ कुठे नाही? तर संघ सर्वत्र आहे.

आज देशातल्या सर्व महत्त्वाच्या जागांवर संघाची माणसे आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय, न्यायव्यवस्था, नोकरशाही अशा सर्व जागांवर संघाचे वर्चस्व आहे. त्यामुळे आपल्या देशात



कोणतेही सरकार आले तरी संघाचा हस्तक्षेप संपणार नाही. संघाची भूमिका तर सर्वपरिचित आहे. त्यांना भारत हिंदूराष्ट्र करायचा आहे. आज कोणतीही कायदेशीर नोंदणी नसताना संघाची संघटना जगभर पसरली आहे. कोट्यवधी रुपयांची उलाढाल असतानाही संघ हिशेब देत नाही. त्यांच्या दृष्टीने ते मालक आहेत आणि मालकाने हिशेब द्यायचा नसतो अशी त्यांची समजूत आहे. सावरकर, गोळवलकर ते अगदी मोहन भागवत यांच्यापर्यंतच्या माणसांचे विचार वाचले तरी हे लक्षात येते की, त्यांना हिंदुत्वाचे भावनिक राजकारण करायचे आहे. संघाने स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला नाही हे खरे आहे. स्वातंत्र्य मिळण्याच्या आदल्या रात्री संघाने सर्व देशात जाळपोळ केली हेही खरे आहे. महात्मा गांधींचा खून झाला तेव्हा संघाची बरीच माणसं तुरुंगात गेली होती. त्यामुळे असहिष्णुता ही संघाच्या जन्मातच जन्मलेली गोष्ट आहे. संघ विघातक आहे हे कालही खरे होते आणि आजही खरे आहे.

**प्रश्न : आज न्यायव्यवस्थेत राजकीय हस्तक्षेप वाढतो आहे असे तुम्हाला वाटते का?**

उत्तर : मी जवळजवळ पंधरा वर्षे जस्टिस सावंतांचा विद्यार्थी राहिलो आहे. जस्टिस सावंतांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना दोषी मानले होते. त्या न्यायमूर्ती सावंतांकडून मी न्यायव्यवस्थेचा आदर कसा करायचा हे शिकलो आहे. पण सावंतांची भाषा ज्ञानेश्वरांसारखी आहे आणि माझी भाषा मात्र तुकारामांच्या भाषेसारखी रांगडी आहे. जस्टिस सावंत यांनी आम्हाला न्यायव्यवस्थेचा आदर आणि आब राखण्याचे शिकवले.त्यांच्या विचारांत राहून मी म्हणेन की, न्यायव्यवस्था अधिक निरपेक्ष व्हायला हवी. राजकारण्यांचा हस्तक्षेप कमी व्हायला हवा. पोलिस यंत्रणा सरकारच्या हातात असते म्हणून सरकार तिचाही गैरवापर करते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतीय संविधानाची काटेकोर अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. आता राहिला प्रश्न संघाच्या हस्तक्षेपाचा. आपल्याला माहीत आहे की, भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याच्या आदल्या दिवशी देशात संघाच्या मंडळींनी जाळपोळ केली होती. गोळवलकर गुरुजींच्या विरोधी असंख्य पुरावे उपलब्ध असूनही उत्तर प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांना अटक केली नाही. उलट त्यांना उत्तर प्रदेश सोडून दुसरीकडे जायला सांगितले. आजची परिस्थितीही अशीच आहे. संघाच्या माणसांच्या घरात शस्त्रे आहेत; पण आपल्या घरात साधे पत्र जरी सापडले तरी आपल्याला अटक केली जाते. याचाच अर्थ संघाची पोहोच कुठे कुठे आहे हे आपल्या लक्षात येईल. आता अजून एका मीटिंगचे उदाहरण देतो. २००८ ची ही मीटिंग होती. संघ परिवारातली वरची मंडळी या मीटिंगला हजर होती. त्यात त्रिवेदी, पुरोहित अशी मनुवादी मंडळी होती. या मीटिंगमध्ये आम्हाला राज्यघटना नको अशी चर्चा केली गेली. ती जाळण्याचा कटही रचला गेला. हे सारे रेकॉर्डेड आहे. यावर कोर्टात केसही दाखल झालेली आहे; पण या घटनाविरोधी लोकांवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही. उलट भारतीय राज्यघटनेचा सन्मान करणारी आम्ही एल्गार परिषद आयोजित केली तर आमच्यावर केसेस दाखल करण्यात आल्या. त्याचा संबंध अगदी देशाच्या पंतप्रधानांच्या खुनापर्यंत जोडण्यात आला.म्हणून केवळ कायद्यातच नाही तर आपल्या देशात सर्वच क्षेत्रात संघ हस्तक्षेप करतो आहे असे मला वाटते.

**प्रश्न : शहरी नक्षलवाद या नावाने काही माणसांना पकडण्यात आले. यामागे संघाचा हात आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे का?**

उत्तर : नक्कीच. यामागे संघाचा हात नक्कीच आहे असे मला वाटते. एल्गार परिषदेचा नक्षलवाद्यांशी कोणताही संबंध नाही हे मी वारंवार वेगवेगळ्या माध्यमांवर सांगितले आहेच. आज संघाचे सरकार आहे. ते मनात येईल तशी दडपशाही करू शकते. ते कुणालाही दहशतवादी म्हणून घोषित करू शकतात आणि कुणालाही राष्ट्रद्रोही म्हणू शकतात.

**प्रश्न : संघाच्या राष्ट्रवादाच्या भूमिकेबद्दल तुमचे मत काय?**

उत्तर : या देशात अनेक जातिधर्माचे लोक राहतात हे ते विसरतात. राष्ट्रवाद म्हणजे केवळ सीमारेषा नव्हे तर त्यात राहणारे लोक महत्त्वाचे असतात. संघाला विविध जातिधर्माच्या लोकांचे काही देणे-घेणे नाही. त्यांना केवळ वैदिक हिंदूंचेच देणे-घेणे आहे. त्यामुळे त्यांना केवळ हिंदूंचा देश हवा आहे ज्याला ते हिंदुस्तान म्हणतात. संपूर्ण देशात हिंदी भाषेची सक्ती हीसुद्धा संघाची चाल आहे असे मला वाटते. असे सक्तीने 'एक भाषा -एक देश' म्हणत भारत हिंदूराष्ट्र होणार नाही. तसेच भारतीय जनतेला पायदळी तुडवून

'भारत माता की जय' म्हणण्याची सक्तीही करण्यात अर्थ नाही.

**प्रश्न : संघ बदलतोय असं तुम्हाला वाटतंय का?**

उत्तर : अलीकडे मोहन भागवत यांची दिल्लीतील झालेली भाषणे ऐकल्यानंतर संघ बदलतोय असं चित्र दाखवण्यात आलं; पण संघ बदलतोय हे खोटं आहे. संघाची ही राजकीय चालबाजी आहे. संघ बदलणार नाही हे वास्तव आहे.

**प्रश्न : २०१९ च्या निवडणुकीत भाजप विजयी होईल?**

उतर : संघाची मंडळी पूर्वी खुर्चीत होती आता ती सिंहासनावर आहेत. त्यामुळे सत्तेचा गैरवापर करून ते निवडून येतीलही. पूर्वी ईव्हीएम मशीन नव्हते, आता तर ईव्हीएम मशीनद्वारे गडबडी करून निवडून येणे त्यांना सहज सोपे आहे. जगात अनेक देशांनी ईव्हीएम मशीनला नकार दिलेला असूनही भारतात ते वापरण्याचा आग्रह का केला जातो, याचेही कारण आपण शोधले पाहिजे. म्हणून भाजपला सत्तेवरून हटवणे आता फार अवघड आहे. एखादी निवडणूक विरोधक जिंकले तरी ते दीर्घकाळ जिंकतीलच असे चित्र दिसत नाही. कारण सत्ता मिळवण्याच्या महत्त्वाच्या जागी आता संघाने शिरकाव केलेला आहे. यासाठी खरी गरज आहे ती लोकप्रबोधनाची.

**प्रश्न : भारतात सध्या काँग्रेससह सेक्युलर राजकीय पक्ष एकत्र येऊ पाहत आहेत. महाराष्ट्रातही विरोधी पक्षांची भाजपविरोधी एकजूट होऊ पाहत आहे.**

उत्तर : म्हणजे पुरोगामी प्रवाहांनी एकत्र यावे ही खूप चांगली अपेक्षा आहे; पण ती तेवढीच भाबडीपण आहे. गेल्या तीस वर्षांत भारतातील पुरोगामी चळवळी एकत्र येत नाहीत हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. दलितांच्या चळवळीचे आणि त्यांच्या राजकारणाचे काय झाले हे आपण पाहतो आहोतच. हीच अवस्था कम्युनिस्ट आणि समाजवाद्यांचीही आहे. आता पश्चिम बंगालचे उदाहरण पाहा; जवळजवळ तीस वर्षे ज्योती बसू यांचे तिथे कम्युनिस्ट सरकार होते, पण तिथे ३० टक्के मुस्लिम असूनही कम्युनिस्टांनी एकाही मुस्लिमाला सत्तेत घेतले नाही हे वास्तव आहे. म्हणून दोन्ही कम्युनिस्ट असो की काँग्रेस असो हे अजूनही ब्राह्मणवादाच्या दबावात आहेत असे मला वाटते. प्रागतिक चळवळी नक्कीच एक झाल्या पाहिजेत; पण त्या राजकारणापलीकडे जाऊन वैचारिक आणि सामाजिक दृष्टीने एक झाल्या पाहिजेत असे मला मनापासून वाटते. राजकारणाचे म्हणाल तर आज हिंदुत्ववाद्यांना टक्कर देण्यासाठी काँगेस सोडून दुसरा पर्याय आपल्याकडे दिसत नाही.

**प्रश्न : मोदी सरकारने घेतलेले निर्णय विशेषतः नोटबंदी व जीएसटीबद्दल तुमचे मत काय?**

उतर : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चुकले असे मी म्हणत नाही. ते फार हुशार आहेत. भारताच्या जनतेची पिळवणूक करायची हा संघप्रणीत अजेंडाच आहे. भाजप सरकारने जनतेच्या पिळवणुकीचे घेतलेले हे निर्णय चुकीचे कसे म्हणता येईल? तो तर त्यांचा मूळ हेतूच आहे. नोटबंदीमुळे सर्वसामान्य जनतेचे काय हाल झाले हे तर सर्वांनी पाहिलेच. आता २८ टक्के जीएसटीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत किती चढ-उतार होत आहेत हेही दिसेल. हा २८ टक्के जीएसटी कोणत्याही देशात नाही, तो केवळ भारतात आहे. आपल्याला बिसलरी पाण्याच्या भावात पेट्रोल देणे शक्य आहे; पण ते या सरकारला करायचे नाही. या निर्णयाचे परिणाम देशात केवळ अर्थव्यवस्थेवरच झाले असे नाही तर यामुळे आपल्या देशातल्या चळवळी संपल्या. श्रमिक आणि कष्टकरी बहुजन जनतेचे लढेही संपवण्याचा मोठा घाट मोदींच्या या निर्णयामागे आहे.



**प्रश्न : अलीकडे झालेल्या बहुजन महासंघ आणि एमआयएमच्या युतीबद्दल आपणास काय वाटते?**

उत्तर : आपल्याच माणसांबद्दल बोलायला नको म्हणून यावर मी भाष्य करत नाही.

**प्रश्न : आज देशासमोर कोणकोणते महत्त्वाचे प्रश्न आहेत?**

उत्तर : आज आपल्या देशात दोन विरोधाभासी गोष्टी चालू आहेत असे माझे मत आहे. एकीकडे राममंदिर, आरक्षण, घरवापसी, धर्मांतर, गोमांसबंदी हे सारे वरवर दाखविले जाते; पण दुसरीकडे मात्र आपली अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करून आपल्याला लुटले जात आहे असे मला वाटते. आज भारतासमोर सर्वांत मोठी समस्या आहे ती म्हणजे बिघडलेली अर्थव्यवस्था. वरवर राजकीय व सामाजिक प्रश्न दाखवून आत मात्र देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचे काम सध्याचे सरकार करत आहे, असे माझे निरीक्षण आहे. मोदींच्या निर्णयांमुळे आज आपली अर्थव्यवस्था पूर्णपणे झोपली आहे. २०१५ पर्यंत आपल्या राष्ट्रीयीकृत बँका नफ्यात होत्या, तो नफा फिरवून उद्योगपतींचे कर्ज भरण्याचे आदेश भाजप सरकारने दिले. भाजप सरकार जेव्हा सत्तेवर आले तेव्हा दीड लाख कोटी रुपयांचा एनपीए होता. तो आता दहा-बारा लाख कोटींपर्यंत नेला आणि तो भरलाच नाही शेवटी तो रद्द केला. दुसरी गोष्ट म्हणजे या सरकारच्या अगोदर सामान्य माणसांच्या बँकांमध्ये जवळजवळ सव्वा लाख कोटींच्या ठेवी होत्या, त्या बुडायच्या मार्गावर आहेत. भारतातल्या सर्वसामान्य जनतेची एलआयसी २० लाख कोटींची आहे. तिच्यातला पैसाही खासगी बँकांकडे वळवला. आज राष्ट्रीयीकृत बँका बुडितात निघाल्या. नोटबंदीनंतर आपल्या देशातले लघुउद्योग बंद होत आहेत. सामान्य माणसाला नोकरी नाही. मोठ्या उद्योगातही उत्पादन कमी होत आहे; कारण सर्वसामान्य माणसाकडे पैसाच नाही अशी अवस्था आहे. परंतु दुसरीकडे मीडियाला हाताशी धरून आपले पंतप्रधान खोटे बोलत आहेत. राफेल घोटाळ्यातून त्यांची सुटका होणार नाही. यात मोठा भ्रष्टाचार झालेला असला तरी मोदी यातून सुटण्याचा मार्ग नक्की शोधतील हेही नाकारता येणार नाही. गुजरात दंगलीच्या कटातून ते सुटले तर राफेल घोटाळा त्यांच्यासाठी अवघड नाही. म्हणून मला वाटते आज आपण आपल्या देशातल्या आर्थिक प्रश्नांवर आणि त्यातून होणाऱ्या भ्रष्टाचारावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आर्थिक प्रश्न हा आपल्या देशासमोरचा आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे असे मला वाटते. आज आपल्या देशात वरवर धर्माच्या नावाची चर्चा चालू आहे आणि आत मात्र संपूर्ण अर्थव्यवस्था संपविली जात आहे. हे सर्वसामान्य माणसाने गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे असे माझे मत आहे.

**प्रश्न : सामाजिक चळवळीतला आपला मोठा अनुभव लक्षात घेता बहुजनांच्या मुलांना आपण काय संदेश द्याल?**

उत्तर : मी माझं आयुष्य बहुजनांच्या मुलांना संघटित करण्यात खर्च केलंय. त्यांच्या शिक्षणाचे आणि सामाजिक प्रबोधनाचे प्रश्न सोडवले म्हणून बहुजन समाज माझ्याकडे मार्गदर्शक म्हणून पाहत आहे. मला वाटते आपले सारे प्रश्न शिक्षणाने सुटू शकतील. राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन आपण शिक्षणाची कास सोडू नये. यातूनच माणूस शहाणा होतो. विचार करू लागतो. संघटित होतो आणि संघर्षाला सज्ज होतो. म्हणून आज तमाम बहुजन समाजातील मुलांनी आपल्या इतिहासाचा वास्तवदर्शी विचार केला पाहिजे. इतिहासाच्या लेखनात आर्यभटांनी केलेल्या चुका दुरुस्त करून खरा इतिहास मांडण्यासाठी पुढे आले पाहिजे. महापुरुषांचा शिक्षणात ज्या पद्धतीने संकोच केला आहे त्या विरोधी आवाज उठवून महापुरुषांची सत्य प्रतिमा शिक्षणात आणल्या पाहिजे असे मला वाटते. शिवाजी महाराजांच्या बाबतीत हे अनेकदा घडत आहे. शालेय अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल भारतात आणि भारताबाहेर विसंगत माहिती कशी असू शकते? म्हणून बहुजनांच्या सुशिक्षित मुलांनी याकडे डोळसपणे पाहायला पाहिजे. मनुवादी ब्राह्मण मंडळींना आपल्या महापुरुषांच्या सत्य प्रतिमा दाखवायच्या नाहीत त्यामुळे हे काम आता आपणच हाती घेतले पाहिजे, असे माझे मत आहे.

**प्रश्न : शेवटचा प्रश्न. ज्यांना आपण मनुवादी म्हणता त्यांच्या सांस्कृतिक चळवळीत व राजकीय पक्षात बहुजन मुलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसतो.**

उत्तर : हे खरं आहे. बहुजन मुलांच्या मेंदूचे सपाटीकरण करून त्यांना आपल्या हितासाठी वापरण्यात मनुवादी शक्ती नक्कीच यशस्वी झाल्या आहेत. म्हणून संघाच्या वाढीचे तेही एक कारण आहेच. आपली मुलं बऱ्याचदा अज्ञानापोटी ते स्वीकारतात. त्यांच्या तत्कालीन गरजाही असतात. अलीकडे पैशाने अनेक गोष्टी विकत घेता येतात; पण विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे असे मला वाटते. यासाठी बहुजन समाजाचे वैचारिक प्रबोधन महत्त्वाचे आहे. आता खरी गरज आहे ती बहुजनांच्या शिकलेल्या लोकांनी समाजासाठी योगदान देण्याची. हे योगदान अगदी मनापासून दिले पाहिजे. आपल्या समाजाला सत्याकडे नेण्यासाठी, त्याच्या उत्कर्षासाठी आणि त्याला संघर्षाला सज्ज करण्यासाठी आपले आयुष्य प्रामाणिकपणे समाजाला समर्पित करण्याची ही वेळ आली आहे. म्हणून मी नेहमी सांगत असतो की आपण कायदा, पोलिस आणि मरणाला घाबरू नये. संविधानाने आपल्याला जे स्वातंत्र्य देऊन मूलभूत अधिकार बहाल केले आहेत त्यांचा निर्भीडपणे वापर केला पाहिजे. संविधानजागृती मनामनात गेली पाहिजे. भारतीय संविधानाच्या प्रामाणिक अंमलबजावणीतूनच उद्याच्या धर्मनिरपेक्ष, समाजवादी लोकशाहीत भारताचे हित आहे.

***




Corporate Gift Supplier:-

T-shirt With Printing
Pendrive With Printing
Ballpen With Printing
Coffee Mug With Printing
Cap with Printing
Keychain With Printing

BALAJI ENTERPRISE
Corporate Suppliers For All.

www.balaji-ent.com
enquiry@balaji-ent.com
Tel:- 022-2577 2505

Office Bag With Printing
Leather Folder With Printing
Water Bottle With Printing
Name Badge Printing
Trophy With Laser Printing
visiting card Printing
All Types Of Crockery

B-2, Sanjay Bhavan , Opp.Jain Mandir, Near IIT Powai, Powai, Mumbai- 400076.



– प्रा. श्रावण देवरे

# क्रांती आणि प्रतिक्रांती : कारण आरक्षण!



## पूर्वार्ध

### आरक्षणाच्या सिद्धांताचा जन्म

सर्वांत आधी विधायक (positive) आरक्षणाचा सिद्धांत मांडला तो तात्यासाहेब तथा महात्मा जोतिराव फुले यांनी! महात्मा जोतिराव फुले रूढ अर्थाने तत्त्वज्ञ, विद्वान वा पंडित नव्हते. त्यामुळे एखाद्या सिद्धांताची मांडणी करण्यासाठी ग्रंथांशी झटापट करणे, काथ्याकूट करणे वा कोणाचे तरी खोडून काढणे वगैरे त्यांच्याकडे नव्हते. दिवसभर ते व त्यांचे मित्र-कार्यकर्ते आपापल्या क्षेत्रात काम करायचे. संध्याकाळी एकत्र बसून दिवसभराचा अहवाल मांडून चर्चा करायचे. त्याचबरोबर दुसऱ्या दिवसाचा कृती कार्यक्रम ठरवायचे. रात्री उशिरा सगळे कार्यकर्ते निघून गेल्यावर तात्यासाहेब ती चर्चा लिहून काढायचे. तात्यासाहेबांची हीच पद्धत संशोधन करण्याची व ते ग्रंथरूप करण्याची होती.

त्या काळी पुण्यातील काही विद्वान ब्राह्मणांनी इंग्रज शासनाकडे अर्ज केला आणि मागणी केली की, 'आम्हा हिंदूंनाही उच्चपदावरच्या नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत'. तात्यांच्या घरी या विषयावर जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा त्यांची खिल्ली उडविताना तात्या म्हणाले की, 'नाव हिंदूंचे आणि गाव मात्र ब्राह्मणांचे'. या एका वाक्यात ते कितीतरी सिद्धांत मांडून जातात. पहिला सिद्धांत हा की, धर्माच्या नावाने ते जे काही मागतात ते सर्व ब्राह्मणांसाठीच असते. दुसरा सिद्धांत हा की, आपली ब्राह्मण जात अल्पसंख्य आहे. हा न्यूनगंड निर्माण होऊ नये म्हणून ते हिंदू धर्माचा आधार घेत आहे. तिसरा सिद्धांत हा की, ते हिंदूंसाठी नाही, तर आपल्या जातीसाठीच आरक्षण मागत आहेत.

या चर्चेतील तात्यासाहेबांचे पुढचे वाक्य असे आहे की, 'ब्राह्मणांना त्यांच्या संख्येप्रमाणे नोकऱ्या देऊ नये, असे माझे म्हणणे नाही'. याचा अर्थ ते ब्राह्मणांवरही अन्याय होऊ नये यासाठी काळजी घेतात. ब्राह्मणांना त्यांच्या संख्येप्रमाणे नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत, असेच त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी ते पूर्ण भारतातील ब्राह्मणांची लोकसंख्या मोजायला सांगतात. परंतु, खरा क्रांतिकारक सिद्धांत

मांडणारे त्यांचे वाक्य पुढीलप्रमाणे आहे, ते वाक्य असे, 'ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येप्रमाणे नोकऱ्या दिल्यानंतर ज्या जागा रिकाम्या राहतील त्या जागांवर शूद्रातिशूद्र उमेदवार मिळाला नाही तर त्या जागा इंग्रजांना द्याव्यात; परंतु ब्राह्मणांना देऊ नयेत'. या वाक्यात एक महत्त्वाचा सिद्धांत असा आहे की, नोकरशाहीत ब्राह्मणांचे वर्चस्व नष्ट करणे. म्हणजे नोकरशाहीचे अब्राह्मणीकरण करणे हा त्याच्या मागे मुख्य उद्देश होता. नोकरशाहीचे अब्राह्मणीकरण झाल्याशिवाय शूद्रातिशूद्र व शेतकरी जनतेला न्याय मिळणार नाही, ही त्यांची पक्की खात्री होती.

या चार वाक्यांना तत्त्वज्ञान यासाठी म्हणावे लागते की, त्यात समाजपरिवर्तानाचं क्रांतिकारक सूत्र आहे. तात्यासाहेब ब्राह्मणांना आरक्षण देण्याचा सिद्धांत मांडतात, शूद्रातिशूद्रांना आरक्षण द्या, असे ते म्हणत नाहीत! फक्त ब्राह्मणांसाठी आरक्षण मागण्याचा हेतू हा होता की, आरक्षण नावाच्या एका वेगळ्या कप्प्यात ब्राह्मणांना बंदिस्त करणे व त्यांना आरक्षण-भोगी म्हणून बाकी समाजघटकांपासून वेगळे करणे. म्हणजे त्यांचे 'हिंदू'च्या आड लपणे बंद झाले असते व यातून ब्राह्मण विरुद्ध अब्राह्मण हे ध्रुवीकरण गतिमान झाले असते. ब्राह्मण हे अल्पसंख्य असल्याने ते नेहमीच दहशतीत असतात. म्हणून ते नेहमी 'आपण सारे हिंदू, आपण सारे भारतीय' असे सांगतात व वेगळे होण्याचे टाळतात. तात्यासाहेबांचे तत्त्वज्ञान असे सांगते की, प्रथम ब्राह्मणांना ''ब्राह्मण'' म्हणून इतर समाजापासून वेगळे करा. म्हणजे त्याला ''शत्रू'' म्हणून समोर उभा केल्याशिवाय त्याच्या विरोधात लढणार कसे? हा शत्रू कधी 'हिंदू'च्या बिळात लपतो तर कधी 'भारतीय'च्या बिळात लपतो. त्याला 'ब्राह्मण' म्हणून वेगळा करणे गरजेचे आहे.

### मार्क्स व फुले

तात्यासाहेबांचे सारे साहित्य, तत्त्वज्ञान, व्यवहार आदी काळजीपूर्वक अभ्यासल्यावर हे स्पष्ट होते की, ते मार्क्सपेक्षाही फार मोठे क्रांतिकारक व तत्त्वज्ञानी होते. कारण भारताचा अभ्यास केल्यावर असा जातिव्यवस्था नष्ट करण्याचा मार्क्ससुद्धा सिद्धांत मांडू शकला नाही. मार्क्सने सांगितले की, औद्योगिक क्रांतीत जातिव्यवस्था ''आपोआप'' नष्ट होऊन जाईल. जातिव्यवस्था आपोआप नष्ट होणे म्हणजे त्यासाठी वेगळे तत्त्वज्ञान, वेगळे धोरण, वेगळा कृती कार्यक्रम, वेगळे महापुरुष वगैरे यांची गरजच नाही. सर्वकाही आपोआप होईल. कुणी काही प्रयत्न करण्याची गरज नाही. त्यामुळे मार्क्सच्या लेखी ''फुले-आंबेडकर'' महापुरुष म्हणून आपोआप निकालात निघतात. हेच भारतातील कम्युनिस्टांच्या 'जाणीव-नेणीव'ला भावले. ते आनंदाने कम्युनिस्ट बनले. जर मार्क्सने ''फुलेवाद'' जाणून घेऊन जातिव्यवस्थेचा संघर्ष समजून घेतला असता व तो एक तत्त्वज्ञानाचा भाग केला असता तर किती ब्राह्मण ''कम्युनिस्ट'' म्हणून कृतीत उतरले असते? प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांनी मार्क्सला 'फुले-आंबेडकरी' निळा-कमरदोरा गुंडाळायला सुरुवात करताच त्यांना जाणवेधारी मार्क्सवादी कम्युनिस्टांनी पक्षातून हाकलून काढले.

तात्यासाहेबांच्या सर्व सिद्धांताच्या आधारे एक तत्त्वज्ञान आकार घेते. समाजाचे ध्रुवीकरण व संघटिकरण करण्याचे तत्त्वज्ञान. मार्क्सचे तत्त्वज्ञान सांगते की, समाजाचे वर्गीय ध्रुवीकरण झाले पाहिजे, ज्यामुळे शोषित-पीडित कामगार व शेतकरी यांचे संघटन होईल. भांडवलदार वर्ग शोषक वर्गाच्या स्वरूपात 'शत्रू' म्हणून समोर उभा राहिल्यावर त्याच्या विरोधात वर्गयुद्ध सुरू करता येईल. या युद्धाचा शेवट वर्गव्यवस्था नष्ट करण्यात होईल. हे आहे मार्क्सचे वर्गांचे तत्त्वज्ञान! मार्क्सचा हा जाहीरनामा १८४९ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याच्या एक वर्ष आधीच, म्हणजे १८४८ मध्ये तात्यासाहेब महात्मा जोतिराव फुले यांनी मुलींची शाळा काढून जात्यंताचे युद्ध सुरू केले होते. त्याच काळात जातिव्यवस्था नष्ट करण्याचे तत्त्वज्ञान ते मांडत होते, सिद्धही करीत होते. त्यांचा 'फुलेवाद' स्पष्टपणे सांगतो की, भारतीय समाजाचे ध्रुवीकरण 'ब्राह्मण-अब्राह्मण' असे झाले पाहिजे, ज्याच्यामुळे शूद्रातिशूद्र संघटित-जागृत होतील व ते जातिव्यवस्था समूळ उखडून टाकण्यास सक्षम होतील. आरक्षणामागील फुलेवादाचा मुख्य उद्देश हा अशा ध्रुवीकरणाचा होता.

### शाहू-आंबेडकरी पर्व

परंतु पुढे हा आरक्षणाचा सिद्धांत उफराटा झाला. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी जेव्हा १९०२ मध्ये आरक्षणाची अंमलबजावणी सुरू केली तेव्हा त्यांच्यासमोर समाजाचे 'क्रांतिकारक ध्रुवीकरण' हा उद्देश नव्हता, तर अब्राह्मण जातींचे सक्षमीकरण हा होता. १९०१ ची जनगणना नुकतीच झालेली होती. त्यातील ब्राह्मणांची संख्या किती, ते सहज समजू शकले असते. ब्राह्मणांना त्यांच्या लोकसंख्येप्रमाणे आरक्षण देऊन समाजाचे 'ब्राह्मण-अब्राह्मण' असे क्रांतिकारक ध्रुवीकरण घडविता आले असते. परंतु, प्रत्यक्षात तसे मात्र घडले नाही. शेवटी राजा म्हणून काही मर्यादा येतातच! त्यात पुन्हा ते 'सत्यशोधक' नव्हते. ते उघडपणे सांगायचे की, 'मी सत्यशोधक नाही, आर्य समाजिस्ट आहे'. एखाद-दुसरा अपवाद सोडला तर काळाच्या मर्यादा कोणीही महापुरुष ओलांडू शकलेला नाही, हे ऐतिहासिक सत्य आहे.

शाहू राजांच्या हातात किमान राजसत्ता तरी होती. परंतु बाबासाहेबांच्या हातात कोणतीही साधने नव्हती. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांच्या समोर सर्वांत मोठा प्रश्न अस्पृश्यांच्या

सक्षमीकरणाचाच होता. म्हणून त्यांनी आरक्षणाचे तत्त्व अस्पृश्यांपासून राबवायचा आग्रह धरला. शूद्रातिशूद्रांचे तीन विभाग करून आरक्षणाची वाटणी केली. 'शेड्युल ट्राईब्ज' या गटात सर्व आदिवासी आलेत. 'शेड्युल कास्ट्स' या गटात दलित-अस्पृश्य जाती आल्यात. आणि तिसरा वर्ग सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या वर्गाचा आहे, ज्यात मुख्यतः (OBC) मध्यम जाती आल्यात. आरक्षणाच्या समान हितसंबंधातून हे तीनही जाती-गट एकत्र येतील व जातिव्यवस्था समूळ नष्ट करतील हे तत्त्वज्ञान बाबासाहेब आंबेडकरांचे होते. या लढाईत आरक्षण हे केवळ एक हत्यार असेल.

जोपर्यंत हे आरक्षणाचे हत्यार ओबीसींच्या हातात पडत नाही, तोपर्यंत जात्यंताचा लढा निर्णायक टोकावर जाणार नाही, हे बाबासाहेबांना पूर्ण माहीत होते. ओबीसी जातींना आरक्षणाचा संघर्ष भावी काळात करता यावा यासाठी त्यांनी घटनेत ३४० वे कलम समाविष्ट केले. एवढेच करून ते थांबले नाहीत, तर या कलमाची अंमलबजावणी न केल्याच्या निषेधार्थ त्यांनी राजीनामाही दिला. बाबासाहेबप्रणीत जातिअंताच्या लढाईत ओबीसींचे स्थान किती वरचे आहे, हे यावरून लक्षात घेतले पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर राईटिंग्ज ॲन्ड स्पीचेसच्या ५ व्या खंडात पान क्रमांक ११२ वर जो तक्ता दिलेला आहे, त्याचा बारकाईने अभ्यास केला तर सहज लक्षात येते की, बाबासाहेब ओबीसींशिवाय जात्यंताची लढाईच अशक्य असल्याचे सांगतात. ज्या दिवशी ओबीसींच्या हातात आरक्षणाचे हत्यार पडेल त्या दिवसापासून विनाविलंब ओबीसी आपली जात्यंताच्या युद्धातील क्रांतिकारक भूमिका वास्तवात आणील.

### ओबीसी पर्व

फुले, शाहू, आंबेडकर या तीनही महापुरुषांनी ओबीसींबाबतचे जे क्रांतिकारी स्वप्न पाहिले होते, ते ओबीसींनी खरे करून दाखविले. १९९३ ला राष्ट्रीय स्तरावर ओबीसींना आरक्षण मिळायला सुरुवात झाली आणि जात्यंताची लढाई गतिमान झाली. येथे एक लक्षात घेतले पाहिजे की, क्रांती म्हणजे युद्ध असतं व त्याचं एक शास्त्र असतं. युद्धात ज्याप्रमाणे धोरण, डावपेच, गनिमी कावा आखणारे हुशार बुद्धिमान असतात, त्याप्रमाणे प्रत्यक्ष रणांगणात पहिली फळी, दुसरी फळी, राखीव फळी अशी फौजांची विभागणी ही असते. सामाजिक युद्धातही हीच रचना असते. वर्गयुद्धाची रचना करताना मार्क्सनेही हेच शास्त्र मांडलं. वर्गयुद्धात रणांगणावर कामगार हा अग्रदलात असतो; कारण तो वर्गव्यवस्थेचा सर्वांत जास्त शोषित-पीडित असतो. त्याच्या भूमिकेत शेतकरी सहाय्यक असतो. त्यानंतरची मधली सैन्याची फळी मध्यम वर्ग असतो. हा मध्यम वर्ग क्रांतीसाठी सामाजिक-राजकीय मशागत करून मैदान तयार करतो. त्याचप्रमाणे जातियुद्धात जातव्यवस्थेमुळे सर्वांत जास्त शोषित-पीडित असलेले अस्पृश्य अग्रदल म्हणून लढणार. मध्यम जाती असलेल्या ओबीसी ही या युद्धातील दुसरी फळी असेल. ती क्रांतीसाठी सामाजिक-राजकीय मशागत करेल व क्रांतीसाठी मैदान तयार करून देईल. राईटिंग्ज ॲन्ड स्पीचेसच्या पाचव्या खंडात पान ११२ वर हेच सांगितलेले आहे.

ओबीसींच्या हातात आरक्षणाचं हत्यार पडताच ते आपल्या कामाला लागले. १९९३ नंतरच्या काळात जेवढ्याही राज्यस्तरावरच्या निवडणुका झाल्या, त्यात त्यांनी ओबीसी-दलित मुख्यमंत्री पहिल्यांदा निवडून आणले. ओबीसींनी आपले पक्ष स्थापन केले. राज्यस्तरीय सत्ताही ताब्यात घेतली. १९९३ ते २०१४ पर्यंतच्या पूर्ण दशकात ब्राह्मणवाद्यांचे मुख्य राष्ट्रीय पक्ष असलेले काँग्रेस व भाजप पूर्णपणे लंगडे करून टाकलेले होते. एकही पक्ष देशस्तरावर केंद्र सरकार स्थापन करू शकत नव्हता. देवेगौडांसारखा सर्वसामान्य ओबीसी देशाचा प्रधानमंत्री होतो व जातनिहाय जनगणनेचा ठराव मंत्रिमंडळात मंजूरही करून घेतो. जातनिहाय जनगणना म्हणजे जातिव्यवस्थेचे आर्थिक व राजकीय



कंबरडे मोडणे होय! यालाच क्रांतीचं मैदान तयार करणे असे म्हणतात. याचा फायदा घेऊन दलित पक्ष-संघटनांनी पुढे आले पाहिजे होते व जात्यंताच्या क्रांतीचं अग्रदल म्हणून लढाईचं नेतृत्व केलं पाहिजे होतं. क्रांतिकारी म्हणविणाऱ्या कम्युनिस्ट पक्षालाही निमंत्रण धाडलं! पण ज्योती बसूंनी आपलं शेपूट गुंडाळत पळ काढला. त्यावेळी ज्योती बसूंनी प्रधानमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारली असती तर दलित-ओबीसींच्या मदतीने जात्यंताची क्रांती दृष्टिक्षेपात आली असती. जातिअंताच्या क्रांतिकारक उंबरठ्यावर देश आलेला असताना कम्युनिस्टांनी नेहमीप्रमाणे आपलं 'ब्राह्मण्यं' जपलं. 'पानिपत'ची लढाई निर्णायक टोकावर आलेली असताना 'यज्ञयागात' गुंग झालेल्या पेशव्यांपेक्षा भारतीय कम्युनिस्ट वेगळे नाहीत, हेच पुन्हा सिद्ध झालं.


दुसरीकडे ओबीसी-दलितांचे पक्ष खासगी-कौटुंबिक मालकीचे बनत गेलेत. मसिहा व्ही. पी. सिंगांनी मंडल आयोगाची एक शिफारस लागू केली. त्यातून जे क्रांतीचं वातावरण तयार झालं त्याचा फायदा दलित-ओबीसी पक्ष मजबूत होण्यासाठी झाला. या दलित-ओबीसी पक्षांची राज्य सरकारे स्थापन झालीत. मात्र एकाही दलित-ओबीसी मुख्यमंत्र्याने मंडल आयोगाची दुसरी शिफारस लागू करण्याची हिम्मत केली नाही. व्ही. पी. सिंगांच्या पुण्याईवरच हे दलित-ओबीसी पक्ष सत्तेत येत राहिलेत. त्यात या दलित-ओबीसी पक्षांचं योगदान शून्यच! तरीही ओबीसी या दलित-ओबीसी पक्षांच्या पाठीशी दहा वर्षे खंबीरपणे उभा राहिला. दरम्यानच्या काळात आपापसातल्या ताणतणावांमुळे दलित-ओबीसी पक्ष क्षीण होत गेलेत. नेमका याचा फायदा ब्राह्मणी शक्तींनी उचलला व २०१४ ला प्रधानमंत्रिपदासाठी ओबीसी उमेदवार जाहीर केला. २०१४ ला लाट ओबीसींची होती, मोदींची नव्हे. ज्या ओबीसींनी ब्राह्मणी बलाढ्य पक्ष जर्जर करून टाकले होते, त्याच ओबीसींचा उपयोग करून हे ब्राह्मणी पक्ष मजबूत झालेत.

जी चूक दलित-ओबीसी-कम्युनिस्ट पक्षांनी केली, ती चूक ब्राह्मणी पक्षांनी करणे शक्यच नव्हतं. भाजपच्या हातात मजबूत सत्ता येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता ओबीसींच्या आरक्षणाच्या विरोधात फतवे काढायला सुरुवात केली. ओबीसींचे आरक्षण जितक्या लवकर निकामी करता येईल तितक्या लवकर देशात ''पेशवाई'' स्थापन करता येईल. ब्राह्मणी पक्षांना दलित आरक्षण, आदिवासी आरक्षण यापासून कधीच भीती वाटली नाही. ब्राह्मण घाबरतात फक्त ओबीसी आरक्षणाला. कारण ओबीसींच्या हातात आरक्षणाचं हत्यार पडताच तो क्रांतिकारक होतो. याचा प्रत्यक्ष अनुभवच घेतल्यानंतर ब्राह्मणी शक्ती शांत कशा राहतील? कारण जात्यंत क्रांती झाली तर ब्राह्मणांच्या गळ्यात गाडगे-मडके व ढुंगणाला झाडू येईल की काय, अशा कल्पनेनेच ब्राह्मण अशांत होतात. याउलट गाडगे-मडकेचा व ढुंगणाला झाडूचा आम्हाला अनुभव आहे व तो पेलण्याची क्षमता-सहनशीलता आमच्यात पुरेपूर आहे, त्यामुळे चिंता करण्याचे काम नाही, येऊ द्या पेशवाई, असा विचार करून दलित पक्षांना शांत राहणे परवडते, मात्र ब्राह्मणांना ते कसे परवडेल? म्हणून ब्राह्मणी शक्ती नेहमीच अशांत, सतर्क व सतत लढाईच्या शक्कलमध्ये कार्यरत असते.

ओबीसी आरक्षणाचं हत्यार निकामी करण्याच्या त्यांच्या प्रतिक्रांतिकारी धोरणाचा काळ गतिमान होत आहे. त्यात त्यांनी नेहमीप्रमाणे क्षत्रिय वर्णातून आलेल्या जाट-पटेल-मराठा यांसारख्या जातींची मदत घेतली आहे. आता येथून पुढे ब्राह्मण-क्षत्रिय या प्राचीन काळापासून दोस्त असलेल्या प्रतिक्रांतिकारी जातींचं नवं पर्व सुरू झालेले आहे.

**उत्तरार्ध –**

**ब्राह्मण-क्षत्रिय पर्व**



जाट, पटेल व मराठा आरक्षणाच्या प्रश्नाने पूर्ण देशच पेटता ठेवला जात आहे. अर्थात हे भारताला काही नवीन नाही. तसा हा प्रश्न फार काही अवघड आहे असेही नाही. देशपातळीवरील कारभारी जर प्रामाणिक असतील तर ते हा प्रश्न चुटकीसरशी सोडू शकतात. परंतु देशाची सर्व पातळीवरची सर्वोच्च निर्णयप्रक्रिया अशा सर्वशक्तिमान लोकांच्या हातात आहे की, त्यांना हा देश पेटता ठेवण्यातच आपल्या जातीचं भलं आहे, असं वाटतं.

मूळ समस्या आरक्षणात नाही, तर ती एकूणच जातिव्यवस्थेच्या सत्तासंघर्षात आहे. आणि म्हणून आपल्या देशातील संत व महापुरुषांनी जातिव्यवस्था नष्ट करण्यावर भर दिला. त्यासाठी




त्यांनी लढेही दिले. आरक्षण हा त्या लढ्यातील एक छोटासा उपाय होता व आहे! मात्र काही जातव्यवस्थावाद्यांनी आरक्षणालाच हत्यार बनवून जातिव्यवस्था जिवंत ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. जाट, पटेल, ठाकूर, मराठादी आरक्षण हा त्यातीलच एक प्रकार आहे. म्हणून या प्रश्नाच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे.

भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना देशातील विविध जात-धर्म-वंश आधारित घटकांनी आपल्या अस्तित्वाचे, सन्मानपूर्वक जगण्याचे व विकासाचे प्रश्न उचलून धरले. मुसलमानांना आपल्या विकासाचा व सन्मानपूर्वक जगण्याचा मार्ग देशाच्या फाळणीत सापडला. त्याप्रमाणे त्यांनी पाकिस्तान मिळविला. दलित जाती व आदिवासी जमातींनी सामाजिक-शैक्षणिक आरक्षण व तत्सम विशेष संरक्षण-सवलतींच्या माध्यमातून आपला विकास साधण्याचा मार्ग पत्करला. ब्राह्मण, क्षत्रिय (मराठा-जाट) व वैश्य जातींनी आपले परंपरागत अधिकार व परंपरागत जात-सत्तेच्या जोरावर आपले वर्चस्व कायम ठेवीत आपला विकास साधला. मराठा-जाट यांसारख्या क्षत्रिय जातींना राज्यस्तरावरच्या राजकीय सत्तेत सामावून घेण्यात आले. देशात ओबीसी हा असा एकमेव समाजघटक होता की, जो आपल्या देशपातळीवरच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या बाबतीत बेफिकीर होता. बिहार वा तमिळनाडूसारख्या दोन-तीन राज्यांचा याला अपवाद आहे. ओबीसींनी आपला विकास देशाच्या विकासातच पाहिला. त्या काळात एखादा अपवाद वगळला तर वर्गीय पातळीवर कामगार व शेतकरीवर्गही समाधानीच वाटत होता. कारण हे वर्ग जातीच्याच पोटात अंकुरत होते. मात्र ही जातवर्गीय शांतता वादळापूर्वीची होती का?

### वर्गीय धोरणाचा जातीय परिणाम

१९८० पर्यंत या जात वर्गरचनेत फारसा बदल झाला नाही. छोटे-मोठे संघर्ष सोडल्यास एकूणच देशपातळीवर शांतता व सुव्यवस्थाच होती. मात्र नेहरू सरकारने कालेलकर आयोग फेटाळल्याने जो ओबीसी असंतोष १९६० पासून निर्माण होत होता, त्याला समाजवादी पक्षांच्या राजकीय फोल्डमध्ये सामावून घेण्यात आले होते. त्यामुळे ओबीसींचे स्वतंत्र असे अस्तित्व राजकीय अजेंड्यावर आलेले नव्हते. ओबीसी प्रभावाखालील जनता पक्षात (१९७७ मध्ये) त्याला पहिल्यांदा देशपातळीवरचे राजकीय अस्तित्व प्राप्त झाले. याच सुमारास (१९८१ डंकेल प्रस्तावाचे नगारे वाजू लागलेत आणि देशातील धुरीण खळबळून जागे झाले. खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाने (खा.ऊ.जा. LPG धोरणाने) जागृत समाजघटकांची झोप उडविली. जगाची उलथापालथ होत असताना भारत तरी त्यातून वेगळा कसा राहील? 'खाऊजा' धोरण म्हणजे जागतिक स्पर्धा! जे जातिघटक व वर्गघटक स्वतःच्या देशातील स्पर्धेत 'कायमचे पराभूत' होते. ते जागतिक स्पर्धेत येण्याचा प्रश्नच

नव्हता. कामगार देशोधडीला लागला व शेतकरी आत्महत्येला मजबूर झाला. हे दोन्ही वर्ग ज्या जातींच्या पोटात आकार घेत होते, ते मुख्यतः दलित व ओबीसी होते. वर्गीय असलेल्या 'खाऊजा' धोरणातून जो संघर्ष उफाळला त्यातून जात-जाणिवाच वाढल्या. कारण हे वर्ग अजूनही जातीतच बंदिस्त होते. वर्गीय जाणिवा दाबल्या गेल्या. याचे साधे कारण हे होते की, वर्गीय असलेल्या 'खाऊजा' धोरणाच्या आड अन्याय-अत्याचार करणारा व शोषण करणारा भांडवलदार वर्ग (वैश्य-जाती), प्रशासक वर्ग (ब्राह्मण-जात) व राज्यस्तरीय राज्यकर्ता वर्ग (क्षत्रिय-जाती) हे आपले पारंपरिक जातीय अधिकार वापरूनच अन्याय-अत्याचार करीत होते व करीत आहेत. त्यामुळे जात-जाणिवा तीव्र होऊ लागल्या. 'खाऊजा'चा प्रश्न वर्गीय होता; परंतु त्याचे सोल्यूशन जाती संघर्षातच शोधणे भाग पडले.

यापूर्वी जातसंघर्षात ओबीसी प्रभावाखालील जनता पक्षाने मंडल आयोगाची नियुक्ती करून जात-समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. मात्र जाट, पटेल, मराठा व तत्सम जातिसंघटनांनी त्याला विरोध केला. त्याच वेळेस मंडल आयोगाची अंमलबजावणी केली असती तर कामगार व शेतकऱ्यांचा वर्गीय प्रश्न काहीअंशी जातीय अंगाने मार्गी लागला असता. मात्र, मंडल आयोगाचा अहवाल लोकसभेच्या पटलावर येण्याच्या आधीच ते सरकार पाडण्यात कट्टर जातवादी पक्षांना यश आले. याला अर्थातच क्रांतिकारी म्हणविणाऱ्या ब्राह्मणी कम्युनिस्ट-समाजवाद्यांचा मूक पाठिंबा होताच. त्यामुळे वर्गजात-समन्वयक मंडल आयोग अहवाल १० वर्षांसाठी कचऱ्याच्या डब्यात गेला. १९८९ला 'ओबीसी-वर्चस्वाचे' जनता दल सरकार आले. व्ही. पी. सिंग सरकार ढोबळ मानाने ब्राह्मणेतरांचे सरकार होते. ते ओबीसी वर्चस्वाखाली होते. ते पाडले जाण्याच्या आतच मंडल आयोगाची एक शिफारस लागू करून बाजी मारण्यात आली. सरकारी अजेंड्यावर जातिसंघर्षाचा विषय येताच जातव्यवस्थावाद्यांकडून राममंदिराचा धार्मिक अजेंडा पुढे आला. सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून क्रीमी लेयरची पाचर मारून मंडल आयोगाची अंमलबजावणी शिथिल करण्याचा प्रयत्न झाला.

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे शासकीय नोकऱ्यांत ओबीसींना आजवर पाच टक्केही फायदा झाला नाही. मात्र मंडल आयोगासाठी झालेल्या संघर्षातून जी देशपातळीवरची उलथापालथ झाली, ती मुख्यतः राजकीय होती. ओबीसींतील संख्येने बहू असलेल्या जातीतून (यादव, माळी, कुर्मी वगैरे) राजकीय पर्याय उभे राहू लागलेत. त्यांनी बाबरी भंजनातून नाराज झालेल्या मुसलमान घटकाला सोबत घेत ओबीसींचे पक्ष स्थापन केलेत व राज्यपातळीवर सत्ताही हस्तगत केली. यातून राज्यस्तरावरच्या क्षत्रिय सत्ताधारी जाती बिथरणे स्वाभाविक होते. जाट, पटेल, ठाकूर व मराठा या जाती राज्यस्तरावरच्या सत्ताधारी जाती होत्या व आहेत. त्यांनी १९८१ पासूनच मंडल आयोगाला विरोध केला होता. परंतु, हा जातसंघर्ष तीव्र झाला तो पंचायत राजचा कायदा अमलात येऊ लागल्यानंतर! काँग्रेसने १९९३ मध्ये घटनादुरुस्तीतून पंचायत राज कायदा आणून ओबीसी-दलित वोटबँक मिळविण्याचा प्रयत्न केला. याला पार्श्वभूमी अर्थातच मान्यवर कांशीराम, लालू, मुलायम, भुजबळ, मुंडे यांच्या प्रभावशाली राजकारणाची होती. हे नेते आपल्या राज्याच्या सीमा ओलांडून दिल्लीकडे आगेकूच करू लागले होते. आणि हा सर्वांत मोठा धोका दिल्लीतून देशावर सत्ता गाजविणाऱ्या ब्राह्मणी शक्तींना वाटत होता. या ओबीसी-संकटातून सुटका करून घेण्यासाठी ब्राह्मणांनी नेहमीप्रमाणे बिथरलेल्या क्षत्रिय जातींना पुढे केले आहे. आधी १९८१मध्ये या क्षत्रिय जाती मंडल आयोग अंमलबजावणीला विरोध करीत होत्या. आता १९९३ला मंडल आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी सुरू होताच, याच क्षत्रिय जाती ओबीसीचा दर्जा मागत आहेत. अर्थात हे दिल्लीस्थित ब्राह्मण धुरिणांच्या इशाऱ्यावरून घडत आहे. जाट, पटेल, मराठा, ठाकूर व तत्सम क्षत्रिय जातींना ओबीसी कोट्यात टाकून ओबीसींची दिल्लीकडील आगेकूच रोखणे हा एकमेव मुख्य उद्देश आहे. दुसरा सर्वांत महत्त्वाचा उद्देश हा आहे की, दलित-ओबीसींच्या संघर्षाची ब्राह्मणविरोधी दिशा बदलून ती क्षत्रिय जातीविरोधात करणे. हे दोन्ही उद्देश सफल करण्यात दिल्लीकेंद्रित सत्ताधारी ब्राह्मणी शक्ती यशस्वी झाली आहे. अपवाद वगळता क्षत्रिय जातींच्या विद्वानांमध्ये जातीपलीकडे जाऊन अभ्यास करण्याची कुवतच नसल्याने त्यांना ब्राह्मणी शक्तींचे कारस्थान कधीच समजले नाही. मराठा समाजाचे युगपुरुष असलेले पुरुषोत्तम खेडेकर यांच्याकडून जातिअंताची भूमिका घेतली जाण्याची फार मोठी अपेक्षा होती. मात्र तेही रेशीमबागेतील ब्राह्मण दरबारात जाऊन मुजरा करून आल्यामुळे ही क्रांतिकारक अपेक्षा निरर्थक ठरली.

मराठा, जाट, पटेल आरक्षणाचे हे खरे मूळ आहे; पण ते समजून घेण्यात क्षत्रिय जातीतील बुद्धिमान कमी पडलेत. या क्षत्रिय जातींना असे वाटते की, राज्यातील राजकीय सत्तेतच आपले अस्तित्व व विकास आहे. पंचायत राजच्या अंमलबजावणीमुळे गावाकडचा तहहयात सत्तेत असलेला 'पाटील सरपंचाचा' आता पायउतार झाला व आता त्या खुर्चीवर तेली-माळी-न्हावी-धोबी अशा अल्पसंख्य ओबीसी व दलित-आदिवासी जाती-जमातींचे स्त्री-पुरुष बसू लागले आहेत. सरंजामी गुर्मीला हा फार मोठा तडा गेल्यामुळे क्षत्रिय जाती पेटून उठणे स्वाभाविक होतं. ग्रामपंचायत,

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या या ग्रामीण भागातील सत्तास्थानावर क्षत्रिय जाती गेल्या ७० वर्षांपासून मांड ठोकून होत्या. पंचायत राजमुळे ही सत्तास्थाने ओबीसी-दलित-आदिवासींच्या ताब्यात येऊ लागली. त्यामुळे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री वगैरे राज्यस्तरीय सत्तास्थाने क्षत्रिय जातींच्या हातातून निसटू लागली. २०१४ मध्ये देशपातळीवर ओबीसी जागृतीचा वाढता प्रभाव हे एक संकटच होते. या संकटातून सुटका करून घेण्यासाठी ब्राह्मणी शक्तींनी 'ओबीसी प्रधानमंत्री' केला. तात्पुरती का होईना आपली सुटका करून घेतली आहे. मात्र ''कटेंगे लेकीन झुकेंगे नही'' असा क्षत्रिय बाणा असलेल्या जाती 'ओबीसी मुख्यमंत्री' बनवून जात-समन्वय करायला तयार नाहीत. ब्राह्मण मुख्यमंत्री उरावर घेऊन स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्याचा पारंपरिक धंदा आजही ते इमाने इतबारे करीत आहेत. समन्वय, चर्चा वगैरे लोकशाही मूल्ये अजूनही त्यांच्या पचनी पडलेली नाहीत. कसेही करून ओबीसी कोट्यात घुसखोरी करायची व आपली राज्यस्तरावरची सत्ता टिकवायची, हा त्यांचा प्रयत्न आहे.

### आरक्षण मिळविण्याची तीन आदर्श उदाहरणे

जाट-पटेल-मराठा या जातीत खरोखर बुद्धिमान व विद्वान असते तर त्यांनी आपल्या जातीला आरक्षण मिळविण्याचा आदर्श मार्ग दाखविला असता. या आदर्श मार्गाची तीन आदर्श उदाहरणे आहेत. १९५० ला संविधान लागू होईपर्यंत या देशाची सर्वंकष प्रशासकीय सत्ता १०० टक्के ब्राह्मणांच्या ताब्यात होती. १) या देशातील समस्त दलित-अस्पृश्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्धिमान व लढाऊ नेतृत्वाखाली लोकशाही मार्गाने संघर्ष केला व ब्राह्मणांच्या ताब्यात असलेल्या १०० टक्क्यांपैकी १५ टक्के जागा आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात मिळविल्या. २) आदिवासींनीसुद्धा याच लोकशाही मार्गाने ब्राह्मणांच्या ताब्यातून आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात ७.५ टक्के जागा मिळविल्यात. ३) सर्वांत क्रांतिकारक उदाहरण ओबीसींचे! या ओबीसींनी १९५५ ते १९९० पर्यंतच्या प्रदीर्घ संघर्षात अनेक अनुल्लंघनीय अडथळे पार पाडलेत. सर्वांत मोठा अडथळा क्षत्रिय वर्णातून आलेल्या जाट-पटेल-मराठा जातींचा! या जातींनी ओबीसी आरक्षणाविरोधात देशपातळीवर हल्लाबोल केला. त्यानंतर मंदिर-मशीदसारख्या ब्राह्मणी कारवाया पचवित ओबीसी शेवटी आरक्षणापर्यंत पोहोचलाच स्वातंत्र्यानंतर संपूर्ण देशाची सर्वंकष सत्ता ब्राह्मण-क्षत्रियांच्या हातात आल्याने ब्राह्मणी शक्ती बलाढ्य झालेली होती. अशा बलाढ्य शक्तींशी ओबीसींनी लढा दिला. लोकशाही मार्गानेच २७ टक्के आरक्षण मिळविले. त्याचप्रमाणे जाट-पटेल-मराठासारख्या शूरवीर जातींनी साडेतीन टक्के ब्राह्मणांच्या ताब्यातील ५० टक्के जागांपैकी आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा हिसकावून घ्याव्यात. पण क्षत्रिय जातींना आरक्षण महत्त्वाचे वाटत नाही, तर ओबीसींतील क्रांतिकारक शक्ती कमजोर करायची आहे, जेणेकरून जातिव्यवस्था जिवंत राहील. ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्यांचे वर्चस्व कायम राहील.

मराठा आरक्षणाचा प्रश्न कायद्याच्या मजबूत आधारावर सुटावा, अशी इच्छा मराठा नेत्यांचीच नाही. कारण त्यांना तो राजकारणासाठी वापरून घ्यायचा आहे. राज्यात जाट, पटेल,


आरक्षणासाठी जाट समाजाने ४८ दिवस आंदोलन केले.

मराठा, ठाकूर मुख्यमंत्री होते तोपर्यंत या जातींनी आरक्षणासाठी कधीच मोर्चे काढले नाहीत. मात्र ज्या क्षणी इतर जातींचे मुख्यमंत्री व्हायला सुरुवात झाली त्या क्षणापासून आरक्षणासाठी मूक मोर्चे, ठोक मोर्चे सुरू झाले. उत्तर प्रदेशात हिंसक 'जाट आरक्षण आंदोलनात' ३५ तरुण मारले गेलेत. जाट समाजात 'संविधान-साक्षर' वकील नसल्याने जाट आरक्षण मिळतच नाही. मात्र जाट आरक्षण आंदोलनातून मुख्यमंत्रिपद मिळविता येते. आता उत्तर प्रदेशात जाट मुख्यमंत्री होताच जाटांची आरक्षणासाठीची हिंसक आंदोलने बंद झाली. महाराष्ट्रात मराठा मुख्यमंत्री करा, मराठा आरक्षणासाठीची सर्व आंदोलने ताबडतोब गुंडाळण्यात येतील.

**'खाऊजा' धोरणाने केले जातीय प्रश्न तीव्र -**

आता मराठा आरक्षणाला कोणता आधार आहे हे पाहू या! 'खाऊजा' धोरणाचा परिणाम देशातील सर्वच जातिवर्गांवर होणार होता, तो झाला! ज्या जाती जागृत व सतर्क होत्या त्यांनी आपल्या (पळ)वाटा आधीच शोधून ठेवल्या होत्या. त्याप्रमाणे ते युरोप-अमेरिकेत जाऊन मोठ्या संख्येने स्थिरावले. जातीय सत्तेच्या गुर्मीत गुंग झालेले क्षत्रिय काळानुसार बदल करून घ्यायला तयार नाहीत. हातात सत्ता असूनही शेतीचे धोरण पारंपरिकच राहिले. कारण मानसिकताच जातगुर्मीच्या रूढी-परंपरांनी ग्रस्त होती व आहे. सगळी सोंगे करता येतात, मात्र पैशांचे सोंग करता येत नाही. त्यामुळे मराठा, पटेल, ठाकूर, जाट आदी क्षत्रिय जातीत एक गरीब वर्ग निर्माण झाला. त्याचा असंतोष राजकीय सत्तेच्या विरोधात जाऊ नये म्हणून तो ओबीसी आरक्षणाकडे वळविण्यात आला. शेती परवडत नाही म्हणून गरीब झालेल्या मराठ्याला सांगण्यात आले की, तुला नोकरी मिळत नाही म्हणून तू गरीब आहेस. मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष झाला की, त्याचा फायदा प्रस्थापित मराठा व ब्राह्मणी नेत्यांना होणारच.

सुप्रीम कोर्टाने मंडल कमिशन अंमलबजावणीच्या खटल्यातील निवाड्यात एक मार्गदर्शक सूचना केली आहे. केंद्र व राज्य सरकारांनी न्यायालयीन दर्जा असलेले मागासवर्गीय आयोग नेमावेत. कोणत्या जातीला ओबीसी आरक्षण कोट्यात टाकायचे वा काढायचे याचे सर्व अधिकार या आयोगाला देण्यात आलेत. त्यामुळे कोणताही पक्ष वा त्याचे सरकार मनमानी करून कोणत्याही जातीला आरक्षण देऊ शकत नाहीत. मराठा आरक्षणाचा प्रश्न आतापर्यंत किमान पाच वेळा राज्य मागासवर्ग आयोगाकडे व केंद्रीय मागासवर्गीय आयोगाकडे मांडला गेला आहे. प्रत्येक वेळेस तो फेटाळलाच गेला आहे. २०१४च्या लोकसभा निवडणुका जिंकण्याच्या राजकीय हेतूने मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने मनमानी करून जाटांना ओबीसी कोट्यात टाकले, त्याचवेळी पृथ्वीराज चव्हाणांच्या महाराष्ट्र सरकारनेही मनमानी करून असंविधानिक राणे समिती नेमली. तिच्या शिफारशीवरून मराठा समाजाला स्वतंत्र १६ टक्के आरक्षण देण्याचा अध्यादेश काढला. मात्र लगेच प्रकरण कोर्टात गेले. निवडणुका संपल्यावर अध्यादेशाला स्थगिती आली. अशा प्रकारे राजकीय हेतूने एखाद्या जातीला आरक्षण देणे हा केवळ घटनाद्रोह नाही किंवा केवळ न्यायालयाचा अपमानही नाही, तर एकूणच अनैतिक अशी कृती आहे.

**परिणाम**

मात्र केंद्र सरकार पुन्हा नेहमीप्रमाणे घोळ घालून संभ्रम निर्माण करीत आहे. आर्थिक आधारावर सर्व जातींना आरक्षण देण्याची लोकसभेत चर्चा सुरू झाली आहे. मात्र ५० टक्के मर्यादा तोडण्यावर कोणीच बोलत नाहीत. सर्व नॉनब्राह्मिण जातीतील गरिबांना ५० टक्क्यांमध्ये कोंबून, ओपन असलेल्या ५० टक्के जागा एकट्या ब्राह्मण जातींना देण्याचा घाट घातला जात आहे, तो मराठा-जाटसकट सर्वच बहुजन जातींसाठी घातक आहे. त्यामुळे मराठा-जाट-पटेल आरक्षणाचे आंदोलन जे सुरुवातीपासूनच चुकीच्या रस्त्यावर होते ते आता सर्व बहुजन जातींना खड्ड्यात घातल्याशिवाय राहणार नाही.

हा झाला देशपातळीवरचा प्रदीर्घ काळातील परिणाम. भारताच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासात ब्राह्मण-क्षत्रिय युती ही अभेद्य असून, आजही तिचा साक्षात्कार होतो आहे. महाराष्ट्रात ब्राह्मण-मराठा (क्षत्रिय) युती आजही स्पष्टपणे दिसते आहे. फडणवीसी पेशवाईचा रथ १४५ मराठा आमदार आनंदाने ओढत आहेत. आनंदाने यासाठी की, आज नाही तर उद्या आपलाही मुख्यमंत्री येईलच. केंद्रात भाजप-काँग्रेस आलटून-पालटून सत्तेवर येत राहतात. महाराष्ट्रात आलटून-पालटून एकदा मराठा, एकदा ब्राह्मण मुख्यमंत्री येत असतो. दोघांचेही आर्थिक-सामाजिक धोरण एकच! अपवादात्मक स्थितीत त्यांची गरज म्हणून कधीतरी नाईलाजास्तव एखादा भटका वा दलित मुख्यमंत्री बनविला जातो. पण चुकूनही प्रभावी ओबीसी नेता मुख्यमंत्री होणार नाही याची ते 'डोळ्यात तेल घालून काळजी' घेतात. एखादा प्रभावशाली ओबीसी नेता खूपच उड्या मारायला लागला की, त्याला सरळ जेलमध्ये टाकून बदनाम केले जाते किंवा ठार केले जाते.

मराठा आरक्षणाच्या हिंसक आंदोलनाचा महाराष्ट्रात ताबडतोबीचा परिणाम २०१९च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांवर होणार आहे. आधी महाराष्ट्राच्या विधानसभेत २८८ पैकी २०० आमदार मराठा असायचे. जेव्हापासून मराठ्यांनी ओबीसीमध्ये घुसखोरी करायला सुरुवात केली तेव्हापासून मराठा आमदारांची संख्या घटायला लागली. शुद्ध-खऱ्या

ओबीसी आमदारांची (३५) संख्या वाढायला लागली. आज विधानसभेत फक्त १४५ मराठा आमदार आहेत. आता हिंसक मराठा आंदोलनामुळे २०१९ला मराठा आमदारांची संख्या ४० च्यावर जाणार नाही. गेल्या महिन्यात नाशिक महसूल विभागात विधान परिषदेच्या दोन निवडणुका झाल्या. या दोन्ही विधानसभा निवडणुकीत सर्व मराठा उमेदवार पराभूत झालेत. दोन्ही जागांवर वंजारा उमेदवार केवळ 'ओबीसी' म्हणून निवडून आले. मराठा रस्त्यावर आला की ओबीसी शांतपणे आपल्या घरातच बसून असं काही प्लॅनिंग करतो की, ज्यामुळे 'एक घाव दोन तुकडे' होतात. दुःख याचेच वाटते की, या मराठा-ओबीसी संघर्षाचा फायदा ब्राह्मणी भाजप-सेनेला होतो आहे.

**उपाय**

मुंबई हायकोर्टाने व सुप्रीम कोर्टाने मराठा-जाट आरक्षण फेटाळताना जी कारणे दिली आहेत, त्यात तीन कारणे महत्त्वाची आहेत. १) ५० टक्के आरक्षणाची मर्यादा तोडलेली आहे, २) केंद्रीय व राज्य मागासवर्गाने हे आरक्षण फेटाळले आहे व ३) आरक्षण गरिबी नष्ट करण्यासाठी नाही तर सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण नष्ट करण्यासाठी आहे. त्यामुळे आरक्षण फक्त शासन-प्रशासनात-शिक्षणात अपुरे प्रतिनिधित्व असलेल्या वर्ग-जातीलाच दिले जाते. जाट-मराठा आरक्षण हे या निकषावर उतरत नाहीत.



भारतात साक्षरता केवळ 'इयत्ते'वरून मोजली जात नाही. 'अक्षर-साक्षरता', 'संगणक-साक्षरता' तशी संविधान साक्षरताही असते. ही संविधान साक्षरता दोन व्यक्तींचा अपवाद वगळता, मराठा समाजात कोठेच आढळत नाही. त्यामुळे मराठा समाजातील बडे-बडे दिग्गज वकील मराठा मूक मोर्चात मूकपणे सामील झाले. त्यांनी संविधान वाचले आहे पण समजून घेतले नाही. जातजाणीव कोणत्याही जात्यंतक ज्ञानाच्या आड येतेच. मराठा वकील जर संविधान साक्षर असते तर ते मराठा समाजाच्या मोर्चात सामील न होता कायदेशीर मार्गाने मराठा आरक्षण मिळविण्यासाठी आमच्याबरोबर सामील झाले असते. छावा मराठा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय किशोर चव्हाण व माजी खासदार माननीय सत्यजित गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मराठा-ओबीसी प्रतिनिधींचे एक शिष्टमंडळ तयार केले. तत्कालीन (२०१३मध्ये) केंद्रीय मंत्री नचिअप्पन यांना दिल्लीत भेटलो. त्यावेळी मराठा वकिलांनी आम्हाला साथ दिली असती तर आतापर्यंत कायद्याच्या पक्क्या बेसवर मराठा आरक्षण कधीच मिळून गेले असते. पण तसे घडले नाही.

मी स्वतः अनेक वेळा लेख लिहून, पुस्तके लिहून, प्रत्यक्ष चर्चा करून तर कधी ओबीसी आंदोलनातून मराठा आरक्षणावर लोकशाही तोडगा सुचविला आहे. तो कोणता? केंद्र सरकारने २००५मध्ये सामाजिक आरक्षणावर मार्गदर्शक सूचनांसाठी संसदीय नचिअप्पन कमिटीची नियुक्ती केली. या कमिटीने स्पष्टपणे शिफारस केली आहे की, सामाजिक आरक्षणावरची ५० टक्के मर्यादा काढून टाकावी व त्यासाठी घटनेत दुरुस्ती करावी. त्यामुळे अजूनही ज्या जातींना आरक्षण मिळाले नाही त्या जातींना आरक्षण देणे शक्य होईल. राज्यघटनेत आणखी एक दुरुस्ती करावी लागेल. या दुरुस्तीसाठी घटनेच्या कलम ४६चा आधार घेता येतो. या कलमात म्हटले आहे-"Promotion of educational and economic interestsof Scheduled castes and Scheduled Tribes and other weaker Sections- The State shall promote with special care in educational and economic interests of the weaker sections of the people, and in particular, of the Scheduled castes and Scheduled Tribes, and shall protect them from social injustice and all forms of exploitation".

यातील 'आर्थिक हितसंबंध व इतर दुर्बल वर्ग' या संकल्पनांचा उपयोग करून एक नवे उपकलम ४६ (अ) पुढीलप्रमाणे जोडता येईल, ते असे-नव्या आर्थिक स्थित्यंतरात

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व तत्सम उच्च जातीतील दारिद्र्यरेषेखालील 'आर्थिक दुर्बल जनवर्ग' बनवून त्यांच्यासाठी स्वतंत्रपणे दारिद्र्य निर्मूलनाचे विशेष उपाय करण्यास कोणताही प्रतिबंध करता येणार नाही. त्याचप्रमाणे नचिप्पन कमिटीच्या अहवालाचा आधार घेत दुसरे उपकलम ४६ (ब) पुढीलप्रमाणे जोडता येईल, ते असे - ''या आर्थिक दुर्बल जनवर्गासाठी विशेष उपाययोजना करताना नियुक्त्या किंवा पदे राखून ठेवण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सामाजिक, शैक्षणिक मागासलेल्या वर्गांना (ओबीसींना) दिलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त स्वतंत्र आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणात दिले जाईल, त्यासाठी आरक्षणाच्या प्रमाणावर कोणतेही बंधन राहणार नाही''.

हा 'जनवर्ग' समाजातून शोधून काढण्यासाठी त्याचे निकष ठरविणारा व उपाययोजना करणाऱ्या शिफारशी सादर करणारा मंडल आयोगासारखा एखादा आयोग केंद्र सरकारने नेमला पाहिजे. पार्लमेंट्री नचिअप्पन कमिटीचा अहवाल व संविधानाचे कलम ४६ हे दोन भक्कम आधार घेऊन सर्व उच्च जातींच्या दारिद्र्यरेषेखालील 'जनवर्गासाठी' घटनादुरुस्ती केली तरच ब्राह्मणांसकट मराठा-जाट-पटेल-कापू जातींच्या अखिल भारतीय आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो. माननीय शरद पवारांनी नुकतेच मराठा आरक्षणासाठी घटनादुरुस्ती मान्य केली. परंतु लगेच नारायण राणेंकडून त्याला नकारात्मक प्रतिक्रिया देण्यात आली. मराठा समाजातील शरद पवारांचा सकारात्मक इशारा समजून त्यावर आंदोलन उभारले पाहिजे. मात्र सध्या मराठा समाज शरद पवारांच्या नियंत्रणात नसून, तो फडणवीसी जंजाळात ओबीसी-आरक्षणाचे स्वप्न पाहण्यात दंग आहे.

## जातीनिहाय जनगणना


कोणत्याही जातीला आरक्षण द्यायचे तर त्यासाठी त्या जातीची लोकसंख्या, त्यांचे शिक्षणाचे प्रमाण, नोकऱ्यांचे प्रमाण, शेती व उद्योगाचे प्रमाण वगैरे शासकीय आकडेवारी उपलब्ध असणे आवश्यक आहे. अशी आकडेवारी शासकीय जातनिहाय जनगणना करूनच मिळविता येते. गेल्या वर्षी तमिळनाडू सरकारने हायकोर्टाच्या आदेशानुसार राज्यस्तरावर जातनिहाय जनगणना सुरू केली होती. काही दिवसांपूर्वी तेलंगणा सरकारने ओबीसी जनगणना करण्याचे ठरविले असून, ती ताबडतोब सुरू होत आहे. महाराष्ट्र सरकारही अशी जातनिहाय जनगणना सुरू करू शकते. दोन महिन्यांत ही जातनिहाय जनगणना पूर्ण होऊ शकते. या जनगणनेनुसार जर मराठा समाजाचे नोकऱ्यांमधील व शिक्षणातील प्रमाण कमी असेल तर त्यांना 'ओबीसी' म्हणून वेगळे आरक्षण देता येईल. असे मराठा आरक्षण रद्द करण्याचा निकाल कोणतेही कोर्ट देऊ शकत नाही.

काही लोक कोणतीही आकडेवारी (Facts Figuers) उपलब्ध नसताना तोडगा सुचविताना सांगतात की, मराठ्यांना ओबीसीत टाकून त्यांचा एक उपप्रवर्ग बनवावा व त्यांना १६ टक्के आरक्षण वेगळे द्यावे. हा भूलभुलय्या आहे. राज्य मागासवर्गीय आयोगावर दडपण आणण्याचे काम जोरात सुरू आहे. मराठा आमदार, मराठा मंत्री आयोगाच्या अध्यक्षांना भेटत आहेत. खुद्द मुख्यमंत्री आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांना फोन करून दडपण आणत आहेत. कोणत्याही अधिकृत फॅक्ट्स व फिगर्स उपलब्ध नसताना राज्य मागास आयोगावर दडपण आणून मराठा जातीला 'ओबीसी' दर्जा द्यायचा व त्यांचा वेगळा ओबीसी गट तयार करून १६ टक्के आरक्षण द्यायचे, असे सूतोवाच मुख्यमंत्री फडणवीस करीत आहेत. सरकार तसा अध्यादेश काढेल व तो हायकोर्टाला सादर करेल. २०१३ मध्ये निवडणुका जिंकण्यासाठी हाच फंडा पृथ्वीराज चव्हाणांच्या राज्य व मनमोहनसिंगांच्या केंद्रीय काँग्रेस सरकारनेही वापरला. आता फडणवीस सरकार हाच चुकीचा उपाय करून वेळकाढूपणा करणार आहे. असे जर झाले तर ती फसवणूक ठरेल. दोन्ही निवडणुका झाल्यावर हायकोर्टाचा निकाल ठरलेला आहे. एकदा का मराठा जातीला ओबीसी दर्जा मिळाला की, तो उंटासारखा वाढत जाऊन ओबीसींचे संपूर्ण घरच उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही. मराठा-जाट-पटेल जाती ओबीसीमध्ये घुसल्या तर खऱ्या कुणब्याला शिपायाची नोकरीही शिल्लक राहणार नाही. भावी काळात कुणबी समाजावर असा अन्याय होताना पाहून मराठा समाजातील पुरोगामी लोकांनाही वाईट वाटेल. पण त्यावेळी दुःख व्यक्त करण्यावाचून काहीही हातात राहणार नाही.

## २०१९ - सुवर्णसंधी

काँग्रेस-राष्ट्रवादी व भाजप-सेना हे आलटून-पालटून सत्तेवर येत राहतात ते मराठासकट सर्वच जातींशी मांजर-उंदराचा जीवघेणा खेळ खेळत असतात. म्हणून २०१९ ला पुरोगामी फुले-आंबेडकरवादी पर्याय उभा करणे गरजेचे आहे. हा पुरोगामी पर्यायी पक्ष सत्तेत येवो अथवा ना येवो, तो मात्र मराठासकट सर्वच जाती-जमातींना न्याय देण्यासाठी दबाव निर्माण करेल व त्यातूनच आताचे सर्व जातिगत प्रश्नांची सोडवणूक सुरू होईल. म्हणून मराठा-पुरोगामीसकट समस्त ओबीसी जातींनी एक राजकीय आघाडी स्थापन करावी. ती बाळासाहेब प्रकाश आंबेडकर प्रणीत 'वंचित बहुजन' आघाडीत सामील करून घेतली पाहिजे, जेणेकरून राजकारणातील पुरोगामी टक्का वाढेल. जातिअंताच्या दिशेने वाटचाल सुरू होईल.

***




आवाज
e INDIA
TV CHANNEL
Awaaz India TV Channel
Nation's voice
www.awaazindiatv.com
Facebook.com/awaazindiatvchannel
Youtube.com/awaazindia
Email: advt@awaazindiatv.com

# शूद्र मराठा-कुणब्य

लाखोंच्या संख्येनं रस्त्यावर आलेल्या आणि बहुसंख्येने
स्वरूप स्पष्ट करून सांगितले पाहिजे. महात्मा फुल्यां
हेही सांगितले पाहिजे. स्वतःला उच्चकुलीन मराठा स
लग्नं होत नाहीत हेही निदर्शनास आणले पाहिजे. मर
दृष्टिकोनातून योग्यच आहे आणि या समूहाला जातिअंत




– डॉ. भारत पाटणकर



**'बरा कुणबी केलो। नाही तरी दंभेचि असतो मेलो'** तुकोबारायांनी हा अभंग लिहून 'मराठा' समाजाला केलेले मार्गदर्शन आजच्या काळातही नेमकेपणाने लागू होते. 'मराठा क्रांती मूक मोर्चा' या वाक्यानं ओळखल्या जाणाऱ्या, स्वतःला मराठा म्हणवणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या चळवळीविषयीची भूमिकासुद्धा या मार्गदर्शनाच्या आधारे घेणे अत्यावश्यक आहे. नाहीतर मराठा क्रांती मूक मोर्चांमध्ये स्वतःच्या भूमिका ठामपणे जाहीर करून ज्यांनी सहभाग घेतला त्यांना 'प्रतिगामी झाले' असा शिक्का मारण्याच्या सोप्या कृतीकडे जाण्याशिवाय दुसरे काहीही घडणार नाही. याला आणखी एक संदर्भ आहे. हा संदर्भ महात्मा फुलेंच्या लिखाणातील आहे. 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकाचे लिखाण करताना जोतिबांचे अनेक लोकांशी बोलणे झाले. त्यापैकी त्यांनी दिलेल्या 'मासल्यां'पैकी ''खासा मराठा म्हणविणारा'' हा मासला खास प्रबोधक आहे. ते लिहितात, ''असुडाचा दुसरा भाग संपून दुसरे काम हातात घेतो आहे, इतक्यात एक ब्राह्मण चक्रीदार पागोटे घातलेला गृहस्थ माझ्यापुढे लोडाशी टेकून बसल्यानंतर, तेथील प्रत्येक सामानसुमानाकडे न्याहाळून पहात आहे. तो इकडे माझ्या मनात आले की, हे गृहस्थ मारवाड्यातील म्हणावे तर पागोट्याखाली तीन शेंड्या लोंबत नव्हत्या. शिंप्यातील म्हणावे तर पागोट्यावर जागोजाग सुया टोचलेल्या नव्हत्या. सोनारातील म्हणावे तर त्यांचे बाहूपुढे उराड निघाले नव्हते व ब्राह्मणातील म्हणावे तर त्याला दोन-चार शब्द बोलताना ऐकले नव्हते. यावरून ते कोणत्या वर्गापैकी असावेत म्हणून मी अनुमान करीत आहे''. तोच त्यांनी आपला मोहरा मजकडे फिरवून, आपणहूनच मला प्रश्न केला की, ''आपण मला ओळखले नाही काय?'' मी म्हणालो, ''नाही महाराज, मी तुम्हाला ओळखले नाही, माफ करा''. गृहस्थ म्हणाला, ''मी मराठी कुळातील मराठी आहे''. मी, ''तुम्ही मराठे असाल परंतु तुमची जात कोणती?'' गृहस्थ- ''माझी जात मराठे''. मी -''महाराष्ट्रात जेवढे म्हणून

# ांना आरक्षण हवेंच

शोषित असलेल्या मराठा कुणब्यांना त्यांच्या शोषणाचे
जी शिवाजी महाराजांना 'कुळवाडी भूषण' का म्हटले,
मजणाऱ्या दीड-दोनशे कुटुंबांशी या शूद्र कुणब्यांची
ठा कुणब्यांना आरक्षण देणे सामाजिक, मानवतावादी
कडे घेऊन जाणेही आवश्यक आहेच.



महारापासून तो ब्राह्मणापर्यंत लोक आहेत त्या सर्वांसच मराठे म्हणतात. तरी तुम्ही अमुक जातीचे आहात याचा उलगडा तेवढ्याने होत नाही''. गृहस्थ - ''तर मी कुणबी आहे असे समजा''. मराठा म्हणवून घेणाऱ्या या गृहस्थाला जोतिबांनी 'कुणबी' असल्याचे सत्य मान्य करण्यापर्यंत नेले! आजही सकल मराठ्यांच्या बाबतीत असेच आहे. त्यांनी 'कुणबी' असल्याचे सत्य मान्यच केले पाहिजे. जे मान्य करतील त्यांची मुक्ती, 'स्त्री-शूद्रातिशूद्र यांनी बनलेल्या एकमय लोकांमध्ये सामील झाल्यावर त्यांनी दिलेल्या मुक्तिलढ्यामधून होऊ शकेल. आरक्षण तर केवळ मलमपट्टी आहे. ती तर जाता जाताच मिळवता येईल.

सन १८८१ च्या जनगणनेत मराठा नावाची जातच नाही. याचे कारण 'आम्ही मराठा जातीचे आहोत' असे कुणीच सांगितलेले नाही. १८८४ च्या 'गॅझेटियर'मध्ये म्हटले आहे की, मराठा (जातीचे) लोक संपूर्ण जिल्ह्यामध्ये सापडतात; पण १९८१ ची जनगणना त्यांना 'कुणबी'मध्येच समाविष्ट करते. कारण ते त्यांच्यापेक्षा वेगळी जात म्हणून अस्तित्वात नाहीत. त्यात असेही म्हटले आहे की, ''कुणबी आणि मराठा हा फरक संपूर्णपणे सामाजिक आहे''. राजर्षी शाहू महाराजांनी क्षात्र जगद्गुरूंची स्थापना करून 'क्षत्रियत्वाला' त्यांच्या पद्धतीने औपचारिक मान्यताप्राप्त बनविले (जे ब्राह्मण पंडित-पुजाऱ्यांना मान्य नव्हते) आणि केवळ पश्चिम-दक्षिण महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील बहुसंख्य कुणबी स्वत:ला 'मराठा' जातीचे म्हणू लागले. तरीही १९२५-३० सालापर्यंतही त्यांच्या नोंदी कुणबी म्हणून सापडू शकतात.

हे कुणबी 'मराठे' आर्थिकदृष्ट्या तरी सत्ताधारी स्तरात होते की नाही, याचीही तपासणी यानिमित्ताने करणे अत्यावश्यक आहे. १८८४ च्या गॅझेटियर्सप्रमाणे तपासले तर असे दिसते की, ९५ टक्क्यांपेक्षा जास्त कुणबी एक तर स्वत:च्या संपूर्ण कुटुंबाची राबणूक करून शेती करणारे, 'रयत' म्हणून राबणारे छोटे शेतकरी होते किंवा शेतमजुरी करून जगत होते. त्याचबरोबर जमीनदारांच्या शेतावर कूळ म्हणून काम करीत होते. कोरडवाहू शेती करणे हे त्यांना नेमून दिलेले 'जातीचे काम' होते. जमीनदार असणारे कुणबी (मराठा) एक टक्क्यापेक्षाही कमी होते. महाराष्ट्रातील आजही कुणबी म्हणून घेणारी जात आणि कुणबी असूनही गेली अनेक दशके 'मराठा' म्हणून घेणारी जात अशा दोन जाती नसून, एकाच जातीचा भाग आहेत. धनगर आणि माळी यांच्यामध्ये व कुणब्यांमध्ये जातीचे काम करण्यातला समान धागा 'शेती करणे' हा आहे.

आजही कुणबी आणि आज मराठा म्हणून घेणारे कुणबी हे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद इत्यादी ठिकाणी औद्योगिक क्षेत्रात अकुशल आणि ओझी उचलण्याची किंवा ओझी ढकलून नेण्याची कामे करतात. खेड्यापाड्यांमधले बहुसंख्य मराठे (कुणबी) कष्टकरी शेतकरी आणि मजूर आहेत.




अशा ऐतिहासिक आणि वर्तमानकाळातल्या पार्श्वभूमीवर मराठा (कुणबी) ही शोषक जात आहे. (जात या नात्याने शोषक आहे) असे म्हणण्याला कोणताही आधार नाही. ज्या जातीतले बहुसंख्य स्त्री-पुरुष शोषित असतात ती जात शोषक असू शकत नाही. ज्या जातीला ब्राह्मणी जातिव्यवस्थेच्या उतरंडीने शूद्र जात म्हणूनच ठरविले, शिक्षणबंदी त्यांच्यावर लादली, त्यांचा स्पर्श जरी ब्राह्मणांना चालत होता तरी ते त्यांना (माझ्या पिढीच्या लहानपणापर्यंत) पाणी वरूनच ओंजळीत वाढत होते. ती जात वरचढ किंवा शोषक असू शकत नाही. उलट या जातीतली १५०-२०० कुटुंबे स्वत:ला क्षत्रिय मराठा म्हणवून घेतात आणि इतर मराठ्यांशी (कुणब्यांशी) बेटी व्यवहार करीत नाहीत. ती कुटुंबे उर्वरित मराठा (कुणबी) जातीच्या जनतेचे शोषण करतात. त्यांना टाचेखाली ठेवतात. या पेचातून या मराठा (कुणबी) स्त्री-पुरुषांची मुक्तता करून त्यांना अन्य शोषित जातींच्या आघाडीत घेऊन या मूठभर 'धनदांडग्या, जातदांडग्या आणि रानदांडग्या' तथाकथित क्षत्रिय मराठ्यांच्या कचाट्यातून सोडवून शोषणमुक्तीच्या लढ्यात सहभागी करून घेण्याची गरज आहे. आणि तसे करणे शक्य असल्याचे आमच्या चळवळीमधून आम्ही प्रत्यक्षात दाखवलेही आहे.

गावोगाव मराठा (कुणबी) जातीत शोषक मूठभरांची निर्मिती होत आली आहे. इतर जातींच्या स्त्रियांवर आणि पुरुषांवर अत्याचार करण्याबरोबरच हे टोळके बहुसंख्य कष्टकरी मराठा (कुणबी) स्त्री-पुरुष जनतेवरही अत्याचार करीत आहे. शोषण करीत आहे. स्त्रियांवर बलात्कार करण्याच्याही घटना समोर आल्या आहेत. स्वत:ला मराठा म्हणवणाऱ्या कुणबी जातीच्या जनतेची लोकसंख्येतील टक्केवारी सुमारे ३० टक्के आहे. या जनतेला मुक्त करण्यासाठी फुले-आंबेडकरी चळवळीने पुढाकार घेणे निकडीचे आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मराठा आमदारांची संख्या जास्त असते म्हणून 'राज्य मराठ्यांचे आहे', 'सत्ता मराठ्यांची आहे' असे विश्लेषण साफ चुकीचे आहे. असा पुकारा सपशेल असत्य आहे. सत्ता अंबानी, टाटा, अदानी, मित्तल, किर्लोस्कर, गरवारे यांचीच प्रामुख्याने आहे. ब्राह्मण्यवादी जातीय उतरंडीची आहे, पुरुषांच्या वर्चस्वाची आहे. या खऱ्या सत्ताधाऱ्यांची सत्ता चालवायला हे 'धनदांडगे, रानदांडगे आणि जातदांडगे (मराठा-क्षत्रिय??)' मराठे, कारू-नारू मराठ्यांच्या आणि अन्य शोषित जातींच्या डोक्यावर पाय ठेवून सरकारी सत्तेत जातात. यांचे पितळ उघडे पाडून बहुसंख्य मराठा (कुणबी) जनतेला त्यांच्या कचाट्यातून सोडवणे अत्यंत तातडीचे आहे आणि हे सत्य उघडपणे, मोठ्याने आणि ठामपणे मांडण्यासाठी 'मराठा मूक क्रांती मोर्चा' नावाने सुरू झालेल्या चळवळीत सहभागी होण्याची नितांत आवश्यकता होती.

मी मराठा (कुणबी) समाजात जन्माला आलो. माझ्या आजी-आजोबांचे कुटुंब माझ्या गावात भूमिहीन आणि बेघर होते. नंतर दुसऱ्यांची शेती वाट्याने करणारे कूळ असलेले कुटुंब बनले. मी, ('मागोवा' ग्रुप असताना) १९७३-७४ ला माझ्या गावात (कासेगाव,

जि. सांगली) सुरू केलेली पहिली चळवळ शेतमजुरांची होती. मराठा, माळी, धनगर, बौद्ध, मातंग, चांभार आणि अन्य सर्व बलुतेदार जातींमधले शेतमजूर होते. जातीच्या पायावर धनदांडग्या वगैरे मराठ्यांनी चळवळीत फूट पाडण्याचा केलेला प्रयत्न त्यावेळी आणि त्यानंतर आजपर्यंतही हाणून पाडणे शक्य झाले आहे. ४५ वर्षे शोषित जातींच्या, स्त्रियांच्या कष्टकरी मजूर कामगार वर्गांच्या चळवळी करीत असताना जोतिबांच्या मांडणीप्रमाणे 'स्त्री-शूद्रातिशूद्र' जनतेची एकमय (मराठा कुणब्यांसह) आघाडी बांधूनच विजय मिळवणाऱ्या पथदर्शी चळवळी केल्या आहेत. 'जातिमुक्ती आंदोलन' स्थापन करण्यात श्रमिक मुक्ती दलाच्या वतीने पुढाकार घेतला आहे. अशा पार्श्वभूमीवर श्रमिक मुक्ती दलाच्या निर्णयानुसार 'मराठा मूक क्रांती मोर्चा'मध्ये सहभाग केला (पुढाकार घेतला नाही). पण अशावेळी सर्व भूमिका, धोका पत्करूनही परखडपणे आणि जाहीरपणे मांडल्या.

एकतर मी बौद्ध धम्म स्वीकारला असल्याचे कधीच लपवले नाही. उलट या भूमिका घेताना त्याचा पुकाराही मी केला आणि तरीही 'धनदांडगे, रानदांडगे आणि जातदांडगे' अशा पुढाऱ्यांना, सत्तेच्या स्पर्धेत कायमचा खेळ करणाऱ्यांना मोर्चातच घेऊ नये अशी उघड भूमिका मराठा मोर्चातल्या लोकांनी स्वीकारली नाही. मला आणि श्रमिक मुक्ती दलाच्या कार्यकर्त्यांना कसलाही मज्जाव झाला नाही. 'अॅट्रॉसिटी कायदा रद्द करा' अशा भूमिकेबाबत अगदी खासदार उदयन भोसले यांनाही परखड बोल जाहीरपणे सुनावले. पण माझ्यावर कसलाही हल्ला झाला नाही किंवा आम्हाला मोर्चामधून बाहेर काढण्यासारखेही काही घडले नाही. मराठ्यांच्या कुणबित्वाला आम्ही भरभक्कम पुराव्यांवर उभे करून जोरदारपणे पुढे आणले. त्याही बाबतीत प्रतिगामी आक्रमक प्रतिक्रिया उमटली नाही. याचा अर्थ सर्वसाधारण मराठा समाज यातले सत्य स्वीकारण्याच्या मनःस्थितीत आहे.

> **विदर्भामध्ये कुणबी ही एक मोठी शेतकरी जात आहे. तिचा समावेश मंडल आयोगाने रिझर्व्हेशन मिळणाऱ्या जातींमध्ये केला आहे. या कुणबी जातीची खेड्यापाड्यातली स्थिती मराठा (कुणबी) जातीपेक्षा वेगळी नाही.**

या एकंदर मनःस्थितीची कल्पना या 'धनदांडग्या, रानदांडग्यांना' आहे असाच याचा अर्थ होतो. 'स्त्री-शूद्रातिशूद्र' या जोतिबाप्रणीत एकमय लोक आघाडीत ही जनता येणे अवघड नाही हेच यातून सिद्ध होते. पण असे असले तरी सरकारी सत्ता केंद्रांना ताब्यात ठेवण्यासाठी जातीचं राजकारण करणाऱ्यांना ही आघाडी नको आहे. अशी आघाडी झाली तर जात संपवण्याची आणि भांडवली सत्ता संपवण्याची चळवळ पुढे जाईल. स्त्रीमुक्ती चळवळही मजबूत होईल हे या राजकारणवाल्यांना चांगलेच माहीत आहे. कोणत्याही परिस्थितीत मराठ्यांनी कुणबित्वाचे सत्य स्वीकारू नये अशी त्यांची छुपी पण जबरदस्त मोहीम चालू आहे.

इथेच मार्क्सवादी आणि फुले-आंबेडकर-मार्क्सवादी यांच्या जातिविषयीच्या सैद्धांतिक समजाचा मुद्दा महत्त्वाचा बनतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेची दोन पायाभूत लक्षणे सांगितली आहेत. एक म्हणजे जातिव्यवस्था ही 'उतरंडीच्या विषमतेने' बनलेली असते आणि दुसरे म्हणजे उतरंडी विषमतेत श्रमिक जातींच्या अंतर्गतही विषमतामुक्त उतरंड असते. ही उतरंड 'श्रमिकांची विभागणी' करते. याचा अर्थ श्रमिक जातींमध्येही एकमेकांपेक्षा उच्च-नीच भेदांवर आधारित, अधिकारांच्या विषमतेवर आधारित आणि शोषणाच्या संबंधांवर आधारित उतरंड असते.

एकंदर शोषण, विषमता, उच्च-नीचतेवर आधारित सांस्कृतिक विषमतेने निर्माण केलेल्या अंतर्विरोधांमधून जन्मलेली 'श्रमिकांची विभागणी' अडथळा म्हणून उभी राहते. त्यासाठी या अंतर्विरोधाची सोडवणूक करणे अत्यंत कळीचे ठरते. हे अंतर्विरोध तसेच ठेवून जातिव्यवस्थेचा अंत होऊ शकत नाही. कारण त्यासाठी शोषित जाती येऊ शकत नाहीत.

पण इथेच वेगवेगळे समज अडथळा ठरतात. मार्क्स-फुले-आंबेडकरवादाचे जनक कॉ. शरद पाटील त्यांच्या 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या पुस्तकात म्हणतात, 'उच्च-नीचतेची उतरंड केवळ जातिव्यवस्थेचे लक्षण नाही, वर्णव्यवस्थेचे होते, वर्गव्यवस्थेचे आहेच. जातिव्यवस्थेचे खास लक्षण आहे जातवार वस्त्या आणि त्यातल्या त्यात गावकूस व गावकुसाबाहेरच्या...' (पान नं. ३०) त्याच पुस्तकात ते पान नं. ५३ वर म्हणतात, 'भारताच्या विशिष्ट प्रदेशात एका विशिष्ट वरचढ जातीची वस्ती असते आणि त्यातील खेड्यांमध्ये तिचे वर्चस्व असते. स्वातंत्र्योत्तर काळात स्टॅट्यूटरी जमीनदारी नष्ट झाल्यानंतर उच्चजातीय जमीनदारांची सत्ता नष्ट झाली. खेड्यातील वरचढ शेतकरी जातींच्या वर्चस्वाला मग राजकीय सत्तेची जोड मिळाली. सत्ता जरी वरचढ शेतकरी जातींच्या उच्च वर्गाच्या हातात असते तरी खेड्यात वर्चस्व वरचढ शेतकरी जातींचे असते. मंडल आयोगाने म्हणून रिझर्व्हेशनमधून वरचढ शेतकरी जातींना वगळले आहे. जात्यन्तक चळवळीची मुहूर्तमेढ फुले या अवरचढ जातीयाने रोवली हा योगायोग नाही'.

याचा अर्थ लावायचा म्हटला तर अनेक अंतर्विरोधी गोष्टी पुढे येतात. पहिली गोष्ट म्हणजे 'मराठा (कुणबी)' जातीला मंडल आयोगाने रिझर्व्हेशनमधून वगळले हे बरोबरच होते, असे कॉ. शरद

पाटील यांचे मत स्पष्टपणे पुढे येते आणि मग काही प्रश्न आपोआपच निर्माण होतात. ज्या यादव, कुर्मी अशा उत्तरेकडील राज्यांमधल्या शेतकरी जाती आहेत त्या 'वरचढ शेतकरी जाती' आहेत की नाहीत? महाराष्ट्राच्या त्या-त्या विशिष्ट प्रदेशांमध्ये माळी किंवा धनगर या वरिष्ठ किंवा 'वरचढ शेतकरी जाती' म्हणून वर्चस्व गाजवतात काय? शहरात हमाली किंवा ओझी उचलणे-ढकलणे किंवा हॉटेलांमध्ये टेबले पुसणे वगैरे कामे करणे अशांमध्ये मराठा (कुणबी) आणि धनगर या शेतकरी जातींची लाखो माणसे कामाला आहेत. माळी जातीमधली का नाही? बुद्धांनंतर जातिव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या लक्ष्याचे नेतृत्व करणारे बसवण्णा ब्राह्मण जातीत जन्माला आले कसे? संत तुकोबा, मराठा (कुणबी) जातीतून येऊन जातिव्यवस्थेला परखडपणे विरोध करणाऱ्या वारकरी परंपरेत नेतृत्व करायला कसे काय उभे राहिले? विसंगतीची सुसंगती लावणे मग अशक्य होऊन बसते.

ज्या मराठा (कुणबी) जातीला, जातिव्यवस्थेच्या नियमांनीच शेतीला बांधून ठेवले, त्यांना ज्ञानबंदी केली, जमीनदारांच्या जमिनी कसणारी कुळे म्हणून शोषले, शेतमजूर म्हणून राबवून घेतले ती मराठा (कुणबी) जात ही अख्खी जात म्हणून 'वरचढ शेतकरी जात' किंवा वर्चस्व गाजवणारी जात कशी ठरते हे काही कॉम्रेड यांच्या मांडणीतून स्पष्ट होत नाही. कॉ. शरद पाटील यांनी जी विधाने मराठा जातीविषयी (नाव न घेता) केली आहेत ती सर्व विदर्भातल्या कुणबी जातीला लागू होतात आणि त्यामुळेच त्यांची मांडणी कोसळून पडते. कॉ. पाटील यांचे महत्त्वाचे योगदान मान्य असूनही असे म्हणावे लागते की, जातिव्यवस्थेच्या या विश्लेषणासंदर्भात त्यांनी चुकीची मांडणी केली आहे. त्यामुळेच याच मांडणीशी सुसंगत मांडणी करणाऱ्यांची भूमिकासुद्धा याच निकषांवर सपशेल चुकीची ठरते हेसुद्धा नमूद करणे आवश्यक आहे.

ज्या जातीतले नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त लोक जात, स्त्रिया आणि वर्ग म्हणूनही शोषित आहेत त्यांना त्यांच्याच जातीच्या 'धनदांडग्या-रानदांडग्या-जातदांडग्यां'मध्ये ढकलून दोन ऐतिहासिक चुका होताना दिसतात. एक म्हणजे मराठा (कुणबी) जातीतल्या मूठभर शोषकांच्या तावडीत या शोषितांना ढकलून शोषणाच्या एकूण व्यवस्थेला मजबूत ठेवण्याला मदत करण्याची चूक. दुसरी म्हणजे या शोषितांना इतर शोषित जाती, वर्ण आणि स्त्रिया यांच्या आघाडीत यायला बंदी घालून शोषितांची, मानवमुक्तीच्या संघर्षासाठी आवश्यक आघाडी कमकुवत करण्याची चूक. या दोन्ही चुका आज काही कम्युनिस्ट पक्ष, मार्क्स-फुले-आंबेडकरवादी संच आणि काही आंबेडकरवादी पक्ष करीत आहेत. यात काही ओबीसी संघटनाही आहेत. जातिअंताची आणि म्हणून वर्गीय आणि लैंगिक शोषणाच्या अंताची चळवळ यामुळे कमकुवत होत आहे. समाजाचा सुमारे ३० टक्के असलेला शोषित जातसमूह आणि त्यातल्या कष्टकरी वर्गातील स्त्रिया आणि पुरुष यांना शोषकांमध्ये ढकलून कोणतीही मानवमुक्तीची चळवळ यशस्वी होऊ



शकत नाही.

म्हणूनच लाखोंच्या संख्येने रस्त्यावर आलेल्या आणि बहुसंख्येने शोषित असणाऱ्या मराठा (कुणबी) स्त्री-पुरुषांना, त्यांच्या शोषणाचे स्वरूप स्पष्ट करून, एकंदर शोषित जनतेच्या चळवळीत सामील करण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. असे घडवण्यासाठी सर्वप्रथम या जनतेला तिच्या कुणबीत्वाची जाणीव सर्वांगीण पद्धतीने होण्यासाठी सर्व माध्यमांच्या सहाय्याने विशेष प्रयत्न केले पाहिजेत. त्याचबरोबर त्यांच्या स्वतःच्या जातीतल्या 'धनदांडग्या-रानदांडग्या' मूठभरांनी त्यांचे शोषण कशा प्रकारे चालविले आहे याचा सविस्तर उलगडा केला गेला पाहिजे. महात्मा जोतिबा फुले यांनी शिवाजी महाराजांचा पोवाडा लिहिताना त्यांना 'कुळवाडी कुलभूषण' का म्हटले, याविषयीचेही प्रबोधन केले गेले पाहिजे. स्वतःला मराठा - उच्चकुलीन किंवा घरंदाज मराठा म्हणणाऱ्या १५० ते २०० कुटुंबांची लग्नं या १५० ते २०० कुटुंबांच्या बाहेर असलेल्या मराठ्यांशी होत नाहीत हे प्रकर्षाने त्यांच्या निदर्शनास आणणे अत्यावश्यक आहे. ही कुटुंबे स्वतःला क्षत्रिय समजतात आणि बहुसंख्य मराठा (कुणबी) समाजाला कनिष्ठ समजतात आणि तरीही राजकीय स्वार्थासाठी आणि आर्थिक हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी मराठा क्रांती मोर्चात सामील होतात. या मागचे शोषणाचे राजकारण त्यांना समजून देणे गरजेचे आहे.

हे कार्य मानवमुक्तीच्या परिवर्तनवादी ध्येयाशी कोणतीही तडजोड न करता येणे शक्य आहे. हे कशाप्रकारे शक्य आहे, हेच व्यवहारात दाखवून देण्याचा यशस्वी प्रयत्न श्रमिक मुक्ती दलाने, मी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये केला. यासंदर्भात जाहीर टीकात्मक भूमिका घेण्याऐवजी एक 'कुजबुज' मोहीम अनेक प्रकारच्या पुरोगाम्यांनी केली. आता हे 'जातीसाठी माती खावी' या पद्धतीने वागू लागले. भारत पाटणकरसुद्धा शेवटी 'जातीवर गेले'. दलित पँथर्सपासून जातिव्यवस्थेच्या अंतासाठी केलेले कार्य

आणि इतर पथदर्शक चळवळी आता संपल्या वगैरे वगैरे टीका झाली. पण त्याच काळात 'सामाजिक अत्याचार प्रतिबंधक चळवळ आणि जातीमुक्ती आंदोलन' या संयुक्त मंचाचे काम चालू होते. मातंग समाजाच्या मेळाव्यात मराठा 'जातदांडगे आणि रानदांडगे-धनदांडगे' यांच्यावर झोड उठवून 'अॅट्रॉसिटी कायदा शिथिल करता कामा नये' अशी भूमिका घेण्यात पुढाकार होता. दलितांच्या वस्त्यांवर झालेल्या हल्ल्याच्या संदर्भात परखड भूमिका घेण्यात आणि हल्ल्याची परिस्थिती येऊच नये म्हणून मार्ग काढण्यात पुढाकार चालू होता. या वस्तुस्थितीची पर्वा या टीकाकारांना नव्हती. एवढा व्यापक व्यवहार आणि धोका पत्करून भूमिका घेण्याचे कार्य त्यांच्यापैकी कोणीही करीत नव्हते. दलितांवर अत्याचार करणाऱ्यांमध्ये ज्या मराठा (कुणबी) जातीतले लोक होते किंवा ओबीसी शेतकरी जातीमधले लोक होते त्यांना शिक्षा व्हावी म्हणून जिवाचे रान करणारे कोणी दिसत नव्हते.

खरा प्रश्न शोषित जातींमध्येही उच्च-नीचतेची उतरंड आहे. या उतरंडीच्या माध्यमातून प्रत्येक 'वरची' शोषित जात थोड्या प्रमाणात का असेना 'खालच्या' शोषित जातीच्या शोषण व दडपणुकीत सहभागी असते. म्हणूनच या सर्व शोषित जाती जातिव्यवस्थाच नष्ट करण्याच्या चळवळीसाठी एकमय होऊन एकत्र येणे अवघड बनते. हे अवघड असले तरी ते साध्य केल्याशिवाय जातिव्यवस्था संपणार नाही. या संपूर्ण वास्तवाला सामोरे जाऊन जातिव्यवस्था अंताचा सैद्धांतिक आणि व्यावहारिक कार्यक्रमाचा मार्ग शोधावाच लागेल. याविषयीचे गांभीर्य यापैकी कुणाच्याही प्रत्यक्ष व्यवहारात दिसत नाही. जातिव्यवस्थेच्या उतरंडीतल्या सर्वांत तळाला ज्यांचे स्थान ठेवले गेले त्या जातींच्या जनसमुदायांमध्ये तात्पुरती सहानुभूती मिळण्यापलीकडे किंवा काही काळ संभ्रम निर्माण होण्यापलीकडे या 'कुजबुज' मोहिमेतून काही साध्य होऊच शकत नव्हते. त्यांना एवढेही भान नव्हते की, श्रमिक मुक्ती दल आणि दलाच्या माझ्यासारख्या कार्यकर्त्यांचा जनाधार तपासला तर तो कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, दलित, ओबीसी समजल्या जाणाऱ्या जाती यांच्यातच आहे. कष्टकरी मराठा (कुणबी) हे केवळ या एकंदर जनाधाराचा एक भाग आहेत. 'मराठा मूक क्रांती मोर्चा'तला सहभाग परखड टीकेसह तर होताच; पण तो या सर्व जनाधारांसह होता याची कल्पनाही या मंडळींनी केली नाही.

> **आज 'मराठा मूक क्रांती मोर्चा' या चळवळीची स्थिती विस्कळीत आहे. सरकारने वेगवेगळी प्रलोभने दाखवून मूळ प्रश्न लोंबकळत ठेवला आहे.**

चळवळीत वेगवेगळे गट-तट तयार झाले आहेत. मधल्या काळात झालेल्या अस्ताव्यस्त चळवळींमुळे तरुणांवर पोलिस केसेस होऊन त्यांना नसता त्रास सुरू आहे. 'सरकारने अशा नेमक्या पद्धतीने आरक्षण द्यावे आणि तसे देणे कायदेशीर आहे' अशी स्पष्ट भूमिका ठामपणे घेऊन आंदोलन सुरू झाले नाही आणि आजही नाही. ज्यावेळी असे नसते त्यावेळी चळवळीला टोक येत नाही आणि सरकार अशा चळवळीला विस्कळीत करण्यात यशस्वी होते असा अनेक चळवळींचा बोलका अनुभव आहे. अशा स्थितीत या चळवळीला 'सर्व शोषित जातींच्या पाठिंब्यासह चळवळ' असे स्वरूप देण्यासाठी, तिच्यातून 'धनदांडगे-रानदांडगे-जातदांडगे' यांचे प्रभुत्व काढून टाकण्यासाठी खास प्रयत्न करण्याची गरज आहे. हे प्रयत्न करण्याची जबाबदारी 'जाती-वर्गीय-लैंगिक' शोषणाचा अंत करून मानवमुक्तीकडे जाणारी चळवळ उभारण्याचा वसा घेतलेल्या सर्व संघटना आणि कार्यकर्त्यांची आहे. असे झाले नाही तर कर्जबाजारीपणामुळे होणाऱ्या आत्महत्या, दुष्काळामुळे होणारे भणंग स्थलांतरण, महाकाय प्रकल्पांमुळे जमिनी काढून घेण्याचा भांडवलशाहीचा सपाटा, उत्पादन खर्चावर आधारित भाव शेतमालाला न मिळणे अशा सर्वांगीण चक्रीवादळात अडकून हा मराठा (कुणबी) समाज भरकटून जाईल. त्यामुळे मानवमुक्तीच्या परिवर्तनवादी चळवळींना हानी पोहोचेल. उद्ध्वस्त समाजातली उद्ध्वस्त तरुण पोरं गुन्हेगारी, गुंडगिरी, गँगस्टरिझम, फॅसिझम अशा सर्व संकटांना बळी जातील. शेतामध्ये कष्ट घाम गाळून नवनिर्मिती करत आलेल्या या जाती-जातीला क्रांतीप्रवण करण्याला आज दुसरा पर्याय नाही.

भूमिकांचा, चुकांचा पुनर्विचार आणि पुनर्विलोकन आमच्यासह सर्वांनीच करावे आणि याचा एकत्रितपणे गांभीर्यानं विचार करावा. खुल्या मनाने 'स्त्री-शूद्रातिशूद्र' जनतेची एकमय झालेली फळी उभारण्यासाठी हे अत्यावश्यक आहे.

कॉ. शरद पाटील यांनी जातिव्यवस्था अंतासाठीचा सिद्धांत आवश्यक आहे हे सिद्ध करण्यासाठी, जातिअंताशिवाय या देशात मानवमुक्तीची क्रांती अशक्य आहे हे प्रकर्षाने आणि सैद्धांतिक पातळीवर पुढे आणण्यासाठी ऐतिहासिक योगदान केले आहे. त्यासाठी ते आदरणीय आहेतच. पण त्यांनी मांडलेली भूमिका केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पायाभूत भूमिकेला नाकारते म्हणून नव्हे तर ती जातिअंतासाठी 'स्त्री-शूद्रातिशूद्र' अशा सर्वांची एकमय आघाडी होण्याच्या आड येणारी आहे. म्हणून तिचा प्रतिवाद करणे या लेखात माझे कर्तव्यच होते. त्याचबरोबर त्यांच्या भूमिकेमुळे एका शूद्र-शोषित जातीतल्या ९० टक्क्यांपेक्षाही जास्त जनतेला क्रांतिप्रवण आघाडीतून बाहेर फेकले जाते म्हणूनही त्यांच्या भूमिकेचा सैद्धांतिक प्रतिवाद करणे निकडीचे होते. पण यामुळे त्यांची महत्ता तीळभरही कमी होत नाही. त्यांना क्रांतिकारी सलाम करूनच हा लेख संपवणे मी उचित समजतो.

***

# इतरांच्या आरक्षणात मराठ्यांना घुसवू नका

*मराठा समाजातही गरिबांची संख्या खूप आहे. त्यांना आरक्षण देण्यास सर्वांचाच पाठिंबा आहे. त्यासाठी संसदेत जाऊन काही दुरुस्त्या कराव्या लागत असतील तर त्याही कराव्यात; पण इतरांच्या आरक्षणामध्ये यांना न घुसवता स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करायला हवी.*



**प्रश्न : मराठा आरक्षणाचा विषय सध्या खूप चर्चेत आहे, आपली भूमिका काय आहे?**

**उत्तर** : भारतामध्ये फक्त मराठा समाजच मागणी करतो असं नाही. त्यामध्ये गुजर समाज आहे, जाट समाज आहे, पाटीदार समाज आहे हे सर्व खरं तर पुढारलेले समाज आहेत आणि हे सर्व आरक्षण मागत आहेत. आता आरक्षण कशासाठी दिले पाहिजे हे घटनेमध्ये व त्याच्या नियमांमध्ये सांगितले आहे. मुख्य म्हणजे सामाजिकदृष्ट्या जे मागासलेले आहेत, ज्यांना नोकऱ्यांमध्ये, शिक्षणामध्ये व इतर ठिकाणी पुरेसं प्रतिनिधित्व मिळालेलं नाही, त्यांचा विचार आरक्षणामध्ये व्हायला पाहिजे असे घटनेत ठळक मुद्दे आहेत. आज जर दलित समाजाची एखादी व्यक्ती जरी पाच कोटी रुपयांचा मालक असेल तरीदेखील त्याला त्याच्या गावामध्ये चांगली वागणूक मिळते असे नाही. तो श्रीमंत असूनदेखील त्याला तुच्छतेचीच वागणूक दिली जाते. तर हा सामाजिक मागासलेपणा कमी व्हावा यासाठी आरक्षणाची तरतूद केली गेली. आता दलित समाजामधले अनेक लोक शिक्षित झाले; पण झोपडपट्ट्यांमधील दलित समाजातील अनेक लोकांना अजूनही शिक्षण मिळत नाही. तो समाज किती मोठा आहे. साधं उदाहरण आहे, मुंबई शहरामध्ये गटारं वगैरे साफ करतो तो समाज कोण आहे? त्यामध्ये किती टक्के ब्राह्मण आहेत, किती लोक त्यामध्ये पुढारलेल्या समाजातील आहेत? यासाठी खरं म्हणजे आरक्षणाची व्यवस्था केली आणि मग त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या सर्व गोष्टी आल्या. खरं म्हणजे आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आभार मानायला हवेत. कारण त्यांनी मनूने निर्माण केलेली व्यवस्था मोडून काढली. आज काही लोक असे म्हणतात की, डॉ. बाबासाहेबांनी जातिव्यवस्था निर्माण केली. ते पूर्णपणे चुकीचं आहे. खरं म्हणजे हजारो जातींना डॉ. बाबासाहेबांनी चार वर्गात बसविले. म्हणजे एक ओपन, एक ओबीसी, एक एस.सी., एक एस.टी. अशी रचना करून डॉ. बाबासाहेबांनी जातीयवाद कमी करण्याचा प्रयत्न केला. या लोकांना नोकरी, शिक्षण व इतर ठिकाणी आरक्षण दिलं. आता ओबीसी समाज जात नाही तर एक वर्ग आहे. त्यामध्ये महाराष्ट्रात जवळपास ३५० जाती आहेत. १९९४-९५ मध्ये मंडल आयोगाने दिलेला अहवाल स्वीकारला. केंद्रात व्ही. पी. सिंग आणि महाराष्ट्रातून पवारसाहेबांनी व महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून आम्ही मागणी केली. जालन्यामध्ये निघालेल्या मोर्चामध्ये त्यावेळी मागणी केली होती. ही मागणी मान्य करून एक ते दोन महिन्यांत आम्हाला आरक्षण दिलं. त्यावेळेला २५० च्या आसपास जाती होत्या. आता हळूहळू वाढ होत ३५० च्या जवळपास जाती आहेत. वाढ कशी झाली? आता त्यासाठी एक ओबीसी आयोग स्थापन करण्यात आला. त्यामध्ये खत्री कमिशन, सराफ कमिशन असे काही कमिशन झाले. त्यांच्याकडे त्या जातीच्या लोकांनी अर्ज करायचा. मग त्या कमिशनमधील लोक त्याचा अभ्यास करणार की, हे लोक किती कष्टाची कामे करतात. त्या जातीमधील महिला किती कष्टाची कामे करतात. त्यांच्या आरोग्याची काय व्यवस्था आहे, त्यांच्यामधील शिक्षणाचे प्रमाण किती आहे, किती लोकांना स्वतःची घरे आहेत, नोकऱ्यांचे किती प्रमाण आहे, या आणि इतर गोष्टींचा अभ्यास कमिशन करतं आणि ठरवतं. आणि सरकारला कळवतं की, तुम्ही यांना आरक्षण द्या. आता यामध्ये या जातींची वाढ झाली. त्यामध्ये आम्ही कोणालाच विरोध नाही केला. कारण या सर्व आयोगांनी त्याचा अभ्यास करून त्यांना ते आरक्षण दिले. मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे म्हणून लाखो लोकांचे मोर्चे निघाले. अर्थातच राजकारणामध्ये निवडून यायचं असेल तर मराठा समाज हा मोठा समाज आहे. सगळ्यात मोठा समाज महाराष्ट्रामध्ये हा ओबीसी समाजच आहे. पण तो ३५० जातींमध्ये विखुरलेला आहे. ओबीसी समाज जवळपास ५४ टक्के आहे आणि १९३१ च्या जनगणनेप्रमाणे त्यावेळी १६ टक्के/१७ टक्के होता. त्यामध्ये ६० टक्के समाज हा कुणबी आहे. ते ओबीसींमध्ये येऊन बसलेत. परंतु एक जात म्हणून मराठा समाज सर्वांत मोठा आहे आणि महाराष्ट्रात आपण पाहत आहोत साखर कारखाने, शिक्षण संस्था, नोकरीधंद्यात व इतर ठिकाणी सगळीकडे मराठा समाजच आहे आणि हेदेखील खरं आहे की, या समाजामध्ये गरीब लोकदेखील खूप आहेत. त्यांना मदतीचा हात पाहिजे. आपण नेहमी असं म्हणतो की, हा गरिबी हटाओचा कार्यक्रम नाही आणि हे बरोबर आहे की, आरक्षण हा गरिबी हटाओचा कार्यक्रम नाहीये. प्रश्न हा आहे की, आरक्षण दिल्यावर ही गरिबी दूर होणार आहे असं नाही. हे जर असं असतं तर मग ज्या वर्गाला पूर्वीपासूनच आरक्षण मिळालेलं आहे, ते सर्व लोक आतापर्यंत करोडपती झाले असते. पण लोकांना असं वाटतं की, आम्हाला जर आरक्षण मिळालं तर आमची गरिबी हटेल अन् त्यामुळेही मोठमोठे मोर्चे निघत आहेत. प्रत्येक राजकीय पक्षाला मते हवी असतात. त्यांना ओबीसी पण हवे असतात. एस.सी. पण हवेत, एस.टी. पण हवेत आणि मराठा समाजदेखील हवा असतो. म्हणूनच मग मराठा समाजाला सगळीकडून पाठिंबा



मिळत आहे. आम्हीदेखील सांगितलं की, मराठा समाजाला आरक्षण द्या पण ते देत असताना ओबीसी समाजाचं आरक्षण कुठेच कमी करू नका. त्यांना धक्का न लावता आरक्षण द्या आणि हेच मत सर्वांनीच व्यक्त केलं. सगळ्याच पक्षांनी हेच मत दिलं आणि जे विचारवंत आहेत त्यांनीदेखील आपलं मत फिरवलं.

ओबीसी समाज ५४ टक्के असताना त्यांना २७ टक्के आरक्षण मिळालं. यामध्ये व्हीजेएनटी प्रवर्ग १/२/३/४ सगळं गेल्यानंतर आता फक्त ३५० जाती शिल्लक आहेत की, त्यांना हे २७ टक्के आरक्षण बाकी आहे. माझं स्वतःचं मत असं आहे की, यांना जर आरक्षण द्यायचं असेल तर मी म्हणालो होतो की, तुम्ही १७ टक्क्यांमध्ये येऊन बसलात. यामध्ये आता तुम्हाला काय मिळेल, इतरांना काय मिळेल आणि परत सर्वांचंच मत आहे की, मराठा समाजाला आरक्षण ओबीसीमध्ये न देता वेगळं आरक्षण द्या. आता वेगळं आरक्षण द्यायचं म्हटल्यावर टक्का वाढतो, ५० टक्क्यांच्या वर ते जातं. कायद्यामध्ये कुठेही म्हटलं नाही की, ५० टक्क्यांच्या वर आरक्षण देऊ नका. हे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की, आरक्षण शक्यतो ५० टक्क्यांच्या वर वाढवू नका. तर ठीक आहे ना की सुप्रीम कोर्टाने अनेक वेळा निर्णय दिले आणि त्यांनी दिलेले निर्णय बदलवूनसुद्धा घेतले. आतासुद्धा संसदेमध्ये त्यांनी जर सांगितले की, आरक्षण ५० टक्क्यांच्या जागी ६० टक्के द्या किंवा ६५ टक्के द्या तर संसदेमध्ये त्यांना कोणी विरोध करणार नाही. सगळ्यांनीच त्यांना जर पाठिंबा दिला तर इतर ठिकाणी जसे की, गुजर, पाटीदार, जाट, मराठा या सगळ्यांचंच समाधान होऊ शकतं. पण त्यासाठी माझ्या मते संसदेत जाऊन तुम्हाला जे काही १०/१५ टक्के वाढवायचे आहेत ते वाढवून घ्यावेत. दक्षिणेमध्येसुद्धा ७० टक्क्यांपर्यंत आरक्षण आहेच.

**प्रश्न : वाढत्या मूलतत्त्ववादाचा बहुजन समाजावर काय परिणाम होतोय?**

**उत्तर :** बहुजन समाज आता पूर्वीपेक्षा बराचसा सुशिक्षित झालाय. अगदी बहुतेक जण डॉक्टर, इंजिनिअर नाही झाले तरी पण ते शिकलेले आहेत. बऱ्याच लोकांना वाचता येतं, मोबाईलसारखं उपकरण हाताळता येतं. जवळपास सगळ्याच लोकांच्या घरामध्ये टीव्ही आहे. त्यामध्ये चर्चा ते ऐकत असतात. जगामध्ये काय चाललंय हे त्यांना कळत असतं. देशामध्ये, राज्यामध्ये, जिल्ह्यामध्ये अगदीच गावामध्ये सध्या काय चाललंय हे सगळं त्यांना कळत असतं. मला वाटतं या बहुजन समाजाने याचा विचार केला पाहिजे. काही वेळा हे लोक म्हणतात आता हे आरक्षण थांबवलं पाहिजे, नंतर याला विरोध झाला की, हे लोक म्हणणार आरक्षण थांबवायला नको. अजून ते लोक इतरांच्या बरोबरीला आलेले नाहीत. त्यातील संभाजी भिडेसारखे काही लोक म्हणणार की, आंबे खाल्ल्यावर मुलगा होतो. म्हणजे परत हे लोक जुन्या काळामध्ये जायला बघत आहेत. तोच संभाजी भिडे खरं म्हटलं तर त्याचं नाव मनोहर कुलकर्णी आहे. ब्राह्मण समाजामध्ये शिवाजी किंवा संभाजी हे नाव कधीही ठेवलं जात नाही. त्यामुळे बहुजन समाजामध्ये फूट पाडण्यासाठी किंवा फितवण्यासाठी त्यांना आपलंसं वाटावं म्हणून त्यांनी नाव बदलवलं. तो काय म्हणतो, तर 'मनू' हा ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्यापेक्षाही श्रेष्ठ होता. मग यांना जर 'मनू' आणायचाय आणि ज्या संत तुकारामाने, संत ज्ञानेश्वराने सामान्य माणसापर्यंत गीता नेली असेल, समतेची शिकवण देण्याचा प्रयत्न केला असेल तर त्यांना नको आहे. त्यांना मनुवाद हवाय. त्यांना पुन्हा ते चार वर्ण पाहिजे आहेत. या विचारसरणीचे लोक आज अनेक ठिकाणी बसलेले आहेत. ते मीडियामध्ये बसलेले आहेत, ते आय.ए.एस.मध्ये आहेत. आय.

पी.एस.मध्ये आहेत, ते न्यायालयामध्ये आहेत, ते राजकारणामध्ये आहेत, ते मंत्रालयामध्ये आहेत आणि मधूनमधून त्यांना याची उमळ येते. निवडणूक जवळ आली की, परत पलटी मारतात आणि म्हणतात, 'सबका साथ सबका विकास'. मात्र राजकारणात निर्णय घेताना ते तसं वागत नाहीत किंवा त्यांचे जे बोलवते धनी लोक आहेत, ते वेगवेगळ्या मार्गाने बोलतच असतात. प्रचार करत असतात आणि जे जे लोक फुले, शाहू, आंबेडकर यांच्या मार्गाने जातात त्या लोकांना विरोध करून हे लोक त्यांना तोडण्याचं, संकटात टाकायचं, त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारचं प्रेशर निर्माण करायचं अगदी ठार करण्यापर्यंत हे सगळं चालूच आहे.

दाभोलकरांची केस घ्या, गोविंद पानसरेंची केस घ्या, कलबुर्गी घ्या किंवा गौरी लंकेश घ्या, या सगळ्या गोष्टी कशाचे उदाहरणं आहेत? या त्यांच्या ज्या संघटना आहेत, त्याच वेगवेगळ्या मार्गाने काम करत असतात. कोणी मीडियामध्ये काम, कोणी लेखक म्हणून काम करतील. कोणी सरकारमध्ये काम करतील. अशा प्रकारे किंवा मग कोणी सनातनमध्ये राहून असे कृत्य करतील. त्यांना जेव्हा संधी मिळते, त्यांना अधिकार मिळतात तेव्हा हे लोक उचल खातात. तेव्हा बहुजन समाजाने या गोष्टींचा विचार करायला पाहिजे की, आपण कोणाच्या पाठीमागे राहायला पाहिजे. आणि या लोकांची खरी विचारसरणी काय आहे आणि निवडणुकांच्या वेळी काय असते? याचा अभ्यास लोकांनी करायला पाहिजे.

**प्रश्न : 'मनू'चा विषय आला म्हणून विचारतो. काही दिवसांपूर्वी तुम्ही देखील मनुस्मृती जाळलेली आहे. इतक्या दिवसांनंतरही 'मनुस्मृती' जाळावीशी का वाटली?**

**उत्तर** : याचं कारण असं आहे की, या देशामध्ये जे 'मनुस्मृती'ला मानणारे लोक आहेत ते परत एकदा उठाव करत आहेत. ते कशा प्रकारे उठाव करतात याबद्दल मी तुम्हाला बोललो आहे. ते मीडिया असो, राजकारण असो, गुंडगिरीच्या माध्यमातून करतात. फसलं तर फसलं विरोध करायचा फक्त, कधी आरक्षण बंद करा तर कधी आमचा आरक्षणाला पाठिंबा आहे असं. ते अनंत हेगडे काय म्हणाले, आम्ही संविधान बदलून टाकू जर आमचं संसदेमध्ये बहुमत आलं तर! तर मला हे म्हणायचं सध्याच्या संविधानामध्ये अशी कोणती गोष्ट तुम्हाला वाईट वाटली की, ते बदलायला निघालेत. आरक्षण आणि गोरगरिबांना डॉ. बाबासाहेबांनी जे स्वातंत्र्य दिलेलं आहे आणि त्यांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले नियम आणि कायदे आहेत या गोष्टीच तुम्हाला नेहमी भीतिदायक का वाटतात? हवी असलेली चातुर्वर्ण्य पद्धत स्थापन करता येत नाही. त्यांच्या आड फक्त डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेलं हे संविधान येतंय म्हणून त्यांना हे बदलायचं आहे. परत त्यांना २०० वर्षांपूर्वी महात्मा फुलेंच्या पूर्वी जो पेशवाईचा काळ होता तसं वातावरण देशात निर्माण करायचं आहे. बहुजनांनी आता याचा अभ्यास करायला पाहिजे. आपले कोण, परके कोण हे ओळखायला पाहिजे. आपल्याला फक्त गुंगवणारे कोण याचा बारकाईने अभ्यास करून खरोखरच आपल्या उत्थानासाठी कोण असायला पाहिजे याचा विचार करायला पाहिजे.

**प्रश्न : आज देशामध्ये फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेला दाबण्याचा प्रयत्न केला जातो असं वाटतं का?**

**उत्तर** : मनुवाद उभा राहणं किंवा ठिकठिकाणी त्याला उकळ्या फुटणं याचाच अर्थ सरळ सरळ असा निघतो की, ते फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार वरती आला की, मनुवाद आपोआपच गाडला जातो. मनुवाद जेव्हा वर डोके काढतो तेव्हा फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराला दाबण्याचा प्रयत्न सुरू होतो. हे दोन्ही वाद एकत्र जाऊच शकत नाहीत. त्यामुळे मनुवाद वाढतोय, असं मी म्हणतो. 'मनुस्मृती' जाळण्याची मानसिकता जेव्हा आपली होते त्याचा अर्थच असा आहे की, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराचं समतेचं चक्र फिरवण्याचं काम काही लोक, काही शक्ती या देशामध्ये करत आहेत.

**प्रश्न : तुमच्या विरोधात जी कारवाई झाली ती बहुजन समाजाचे नेतृत्व दाबण्यासाठी झाली, अशी चर्चा बहुजन समाजात आहे. काय सांगाल?**

**उत्तर** : याचं कारण तेच आहे. केवळ मी समता परिषदेचं काम करतो, बहुजनांचं काम करतो. ज्या वेळेला मंडल आयोग व्ही. पी. सिंग यांनी स्वीकारला तेव्हा दुसऱ्यांदा मुंबईचा महापौर होतो. मी शिवसेनेत होतो. मी त्याचं स्वागत केलं आणि त्यानंतर माझ्या बाबतीत शिवसेनेची गडबड चालू झाली. त्याचा परिणाम हा झाला की, मी शिवसेना सोडली. मग पवारसाहेबांच्या माध्यमातून मंडल आयोगाचे आरक्षण मिळवून घेतलं. त्यानंतर मी असं ठरवलं की, फक्त महाराष्ट्रातच नाही तर सगळीकडे गेलं पाहिजे. बिहारमध्ये ७ लाख लोकांची मीटिंग झाली. दिल्लीमध्ये रामलीला मैदान पूर्णपणे भरवून टाकलं. जयपूर, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश अशा वेगवेगळ्या



ठिकाणी आम्ही या परिषदा घेतल्या. काही ठिकाणी तर ९ टक्क्यांच्या वर आरक्षण आहे. काही ठिकाणी ११ टक्के आरक्षण आहे. देशामध्ये अनेक ठिकाणी अजूनही २७ टक्के आरक्षण पूर्ण दिलेलं नाही हा भाग वेगळा आहे. २७ टक्के आरक्षण देऊनदेखील ते पूर्ण भरलं जात नाही आणि झारीतले शुक्राचार्य वेगवेगळ्या ठिकाणी बसलेले आहेत. न्यायव्यवस्थेपासून ते प्रशासनापर्यंत. सरकार दरबारी तर २७ टक्के आरक्षण आम्हाला दिलं पाहिजे म्हणून हा आवाज उठवावा लागला, एल्गार पुकारावा लागला. खूप मोठ्या प्रमाणामध्ये आम्हाला पाठिंबादेखील मिळाला. आय.आय.एम. आणि आय.आय.टी. यांसारख्या संस्थांमध्येदेखील आरक्षण नव्हतं. मी स्वतः मंत्री असताना जंतरमंतर मैदानावर जाऊन बसलो. आरक्षणाची मागणी केली. त्यावेळी सुदैवाने अर्जुनसिंह भारत सरकारचे मानव संसाधन मंत्री होते. त्यांनी कॅबिनेटमध्ये प्रस्ताव मांडला आणि पवारसाहेबांनी त्याला पाठिंबा दिला. आम्हाला आरक्षण मिळालं. आता हे आरक्षण वेगवेगळ्या मार्गाने काढून टाकण्याचा प्रयत्न होतोय. ही एक लढाई आहे. पण प्रश्न हा आहे, मला अटक झाली याच्या मागे हेही एक कारण आहे की, याचं तोंड दाबावं कायमचं. १९९५ ते १९९६ मध्ये बीजेपीची सत्ता असताना मी विरोधी पक्षनेता होतो त्यावेळेला शिवसेना-बीजेपीचं सरकार गेलं. त्यावेळी लोक असं बोलायचे की, छगन भुजबळ हे 'वन मॅन आर्मी'सारखे लढले. शिवसेना-बीजेपीचं सरकार गेलं. जे जुने पत्रकार आहेत त्यांना ते माहीत आहे. मला आतमध्ये टाकण्यामागे हेही कारण असू शकतं की, मला बदनाम केलं जाईल आणि लोक बाहेर आल्यावर दगडच मारतील. म्हणजे याचा आवाज बंद होईल. आत गेल्यानंतर कटकट कमी होईल. आपल्याला सुखाने राज्य करता येईल. म्हणजे यामुळे फुले-शाहू-आंबेडकरांची जी विचारधारा आहे ही थांबून जाईल. या विचारधारेला कुठेतरी खीळ बसेल. या सर्व गोष्टी आहेतच ना! केस न चालवता अडीच वर्षे डांबून ठेवायचं. एवढंच नाही तर मी आमदार होण्यापूर्वीपासूनच्या माझ्या मालमत्ता या सर्व अटॅचेड करून टाकायच्या की, हा बाहेर आल्यानंतर याला खायला-प्यायला पण मिळता कामा नये. हे सर्व करण्यामागे कारण काय? हेच कारण आहे. तर यांनी कारण काय दिलं तर 'महाराष्ट्र सदन'. बरं कारणामध्ये जे महाराष्ट्र सदनामध्ये अंधेरीला अतिशय उत्कृष्ट असे आरटीओचे कार्यालय आणि मलबार हिलला हाय अमाऊंटचे गेस्ट हाऊस या तीन-चार बिल्डिंगचा संपूर्ण तो प्रस्ताव होता. तो प्रस्ताव कॅबिनेटने एकदा नव्हे, दोनदा पास केला. त्याचा कॉन्ट्रॅक्टर मला न नेमता किंवा त्याला मी पास न करता, तो कॉन्ट्रॅक्टर अगोदरच झोपडपट्टीतील लोकांनी नियमाप्रमाणे एसआरएच्या झोपडपट्टीचे लोक त्यांचा डेव्हलपर नेमतात. त्यातच तो नेमलेला होता.

**मुलाखत - चेतन शिंदे**

***



– डॉ. अलीम वकील,
चांदवड

# मुस्लिमांसाठी राखीव जागांचे मृगजळ



**भारत-पाकिस्तान विभाजनानंतर भारतातच निष्ठेने राहिलेल्या मुस्लिमांच्या मानेवर विभाजनाचे पाप ठेवण्यात आले आहे. मुस्लिम समाजातील कणभर समृद्ध अभिजन वर्ग सोडला तर बाकी सर्व बाबतीत मागास आहेत. मंडल आणि सच्चर आयोगाने शिफारस करूनही राज्य आणि केंद्राच्या सर्व प्रकारच्या शासकीय सेवांमधील मुस्लिमांचा आलेख कोसळतोच. राजकीय विकासाबरोबर सामाजिक, आर्थिक विकासाचा विचार अवश्य बनला आहे.**

भारतीय राखीव जागांच्या धोरणाला भारताच्या विभाजनाची कडवट, संतापजनक आणि प्रतिशोध फुलविणारी पार्श्वभूमी आहे. शेड्युल्ड कास्ट आणि शेड्युल ट्राईब्ज यांना मिळालेल्या राखीव जागांनाही हीच पार्श्वभूमी आहे. भारताच्या विभाजनामुळे 'अल्पसंख्याक' या संकल्पनेला सुरुंग लावण्याचा कर्कश सूर घटना समितीतच करण्याचा प्रयत्न होत होता. २७ ऑगस्ट १९४७ ला ॲडव्हायजरी कमिटी ऑन मायनॉरिटीजचा अहवाल चर्चेसाठी घेण्यात आला. हा अहवाल सादर करताना सरदार वल्लभभाई पटेलांनी जे भाषण केले त्यात अल्पसंख्याकांमधील भिन्नतेचा गैरफायदा घेतलेला नाही, अशी ग्वाही दिली. ते म्हणाले, ''आपल्या सभोवताली जे काही घडत आहे, त्यामुळे आपले (संविधान निर्मितीचे) कार्य आपण लवकर

उरकले पाहिजे. (आणि हे करताना) सभागृहातील अडचणींमध्ये आणि शेजारच्या देशांमध्ये सध्या जो तीव्र संघर्ष सुरू आहे त्यात भर पडणार नाही आणि भारताच्या अत्युत्तम प्रांतामध्ये ज्या जखमा झाल्या आहेत त्याचा आपल्या भळभळणाऱ्या हृदयास अधिक त्रास होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे''.[१] घटना समितीने मूलभूत हक्कांतर्गत तपशीलवार अधिकार अल्पसंख्याकांना दिले.

या अहवालावर चर्चा करताना सदस्यांच्या संतापाचा रोख प्रामुख्याने मुस्लिमांकडे आहे हे स्पष्ट आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केवळ बारा दिवसांनी ही चर्चा होते आहे. याचा अर्थ पंजाब, बंगाल आणि दिल्लीमधील दंगली शमलेल्या नाहीत. जवळजवळ दहा लाख लोकांचा बळी गेला. असंख्य लोक बेघर झाले. विशेषतः सिंधमधील हिंदू निर्वासितांचे लोंढे आपल्या जीवघेण्या वेदना घेऊन भारतात आले. दोन्ही बाजूंच्या लाखापेक्षा जास्त महिलांवर झालेला बलात्कार आणि असंख्य महिलांचे अपहरण सहनशीलतेची प्रचंड परीक्षा घेणारे होते. डॉ. पंजाबराव देशमुखांना 'अल्पसंख्य' हा शब्द 'दानवी' वाटला. भारतीय राजकारणाच्या इतिहासात अल्पसंख्याक या 'सैतानी' शब्दाने भारताची शकले केली असे त्यांचे मत होते.[२] राजकारणात अल्पसंख्याक दडपले जाण्याची शक्यता जे. एस. मिल्‌पासून वर्तविली जात होती. मुस्लिम लीगच्या स्थापनेपासून मुस्लिमांचे दबावतंत्र सुरू झाले. अल्पसंख्याकांकडून राष्ट्र असल्याचा दावा दडपण आणूनच करण्यात आला यात शंका नाही. त्यामुळे डॉ. देशमुखांच्या भाषणात राग असला तरी तो साहजिक होता.[३] भारतीय ऐक्याविषयी नेत्यांना दृढ विश्वास होता. हिंदू आणि मुसलमानांमध्ये राजकीय स्पर्धा सुरू झाली असली तरी या ऐक्यावर विपरीत परिणाम होणार नाही याची खात्री पं. नेहरूंसारख्या नेत्यांना होती. आपल्या ऑटोबायोग्राफीमध्ये त्यांनी मुस्लिम राष्ट्राची कल्पना १९३५ मध्येच नाकारली होती. राजकीयदृष्ट्या ही संकल्पना हास्यास्पद, आर्थिकदृष्ट्या काल्पनिक आणि त्यामुळे फारसे लक्ष देण्याजोगी नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला होता.

प्रस्तुत अहवाल ऑगस्ट १९४७ मध्ये चर्चिला जात होता, तर सप्टेंबर १९४७ मध्ये ऑऊसलेक (Auchinleck) यांनी लंडनला कळविले होते की, ''भारताच्या सध्याच्या कॅबिनेटने पाकिस्तानचे शासन स्थिर पायावर उभे राहू देण्यापासून निष्ठूरपणे रोखण्याचा निश्चय केला आहे''. पाकिस्तानचे पतन होण्यास फारसा कालावधी लागणार नाही याची खात्री पंडितजींना असल्याने 'अखंड' भारतातील मुसलमानांविषयी पुनर्विचार करावा लागेल असे तर त्यांना वाटत नसेल? (अगदी) ऑक्टोबरपर्यंत पाकिस्तान इतक्या अडखळत्या स्थितीत होते की, ते टिकून राहण्याच्या स्थितीतच नव्हते.[६] ही परिस्थिती काँग्रेसच्या नेत्यांना माहीत होती हे स्पष्ट आहे.

भारतातील अल्पसंख्याकांना विकसित होण्यासाठी बहुसंख्याकांनी कशी अनुकूलता दर्शविली हे सांगत टी. प्रकाशम्‌ यांनी मत व्यक्त केले की, अल्पसंख्याकांनी गरळ ओकण्याचे कार्य केले. त्यांच्याच शब्दांत ``All these minorities have been allowed to be formed and developed to this stage until we are chocke with the poison of communalism that has been there for such a long time".

मुस्लिम लीगच्या सदस्यांच्या आढ्यतखोर, अव्यवहारी व कमअकल भूमिकेचे विराट दर्शन या अहवालाला त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांमध्ये होते. पाकिस्तानच्या निर्मितीची मुळे ज्या विभक्त मतदारसंघात होती, ती मागणी पुन्हा करण्याची जुर्रत त्यांनी केली. विभक्त व संयुक्त मतदारसंघ या संदर्भातील वाद येथे उपस्थित करण्याचे कारण नाही. त्यांची दुरुस्ती सूचना–


That on a consideration of the report of the Advisory committee on minorities, fundamental rights etc., on minority rights, this meeting of the constituent Assembly resolves that all elections to the central and provincial Legislatures should as far as Muslims are concerned be held on the basis of separate electorates.[८] घटना समितीत वातावरण गढूळ करण्याचे दुष्कर्म लीगवाल्यांनी केले. बी. पोकर साहिब बहादूर यांनी ही दुरुस्ती सूचना मांडली होती.

राखीव प्रतिनिधित्व असणाऱ्यांना घटना समितीच्या सर्वसाधारण जागा लढविण्याची परवानगी होती. मागासवर्गीय असतानाही नागप्पा मद्रास प्रांतातून सर्वसाधारण जागेवरून निवडून आले. मागासवर्गीयांसाठी त्यांनी 'हरिजन' असा शब्दप्रयोग केला आहे. हरिजनांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रांतिक विधिमंडळात जागा मिळावी आणि मुख्यमंत्रिपद रोटेशनने हिंदू, हरिजन, मुस्लिम आणि इतर अल्पसंख्याकांना मिळावे, अशी मागणी त्यांनी केली. वेगळे राज्य मागण्याचा अधिकार त्यांच्यापेक्षा जास्त कुणालाही नसताना या देशाचे ते मूळ रहिवासी असतानाही त्यांनी वेगळे राज्य मागितले नाही.[९] दुरुस्ती सूचनांना आणि उपस्थित केलेल्या मुद्द्यांना इतर सदस्यांनी आणि विशेषत्वे सरदार पटेलांनी सडेतोड उत्तरे दिली. लीगी



सदस्य त्यांच्या जीर्ण मानसिकतेत, थोडेसे घाबरत का होईना पण वावरताना दिसले. त्यामुळे इतर सदस्यांची 'सहानुभूती' त्यांना मिळविता आली नाही. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे क्वचितच निवडणुकीच्या परिघाबाहेर जाताना दिसले. मुस्लिमांचे हित सतत विभक्त मतदारसंघाशी जोडत त्यांनी आपली 'अभिजनता' कुरवाळत ठेवली. विभाजनाने मुस्लिम प्रतिमा मलिन होणे अत्यंत स्वाभाविक बाब होती. ही मलिनता स्वच्छ करण्याची संधी त्यांनी हातची गमावली. विभाजनाचे पाप न केलेल्या पिढ्यांना ते पापक्षालन करावे लागत आहे. आम मुस्लिम कल्याणाचा त्यांना विसर पडला. मुस्लिमांच्या राखीव जागांचा प्रश्न सोडविण्याची संधी होती, ती मुस्लिम अभिजनांनी घालविली. अल्पसंख्याक या संकल्पनेचाच विनाश व्हावा असा पक्का समज बहुसंख्य घटना समितीच्या सदस्यांना होण्याचे कारण मुस्लिम अभिजनांची 'बेगडी मुस्लिम अस्मिता' हे आहे. विभक्त मतदारसंघांनी अल्पसंख्याकांचे रूपांतर 'राष्ट्रात' केले हे इतर सदस्य कसे विसरतील? आणि त्यांनी ते का विसरावे?

मुस्लिम लीगच्या सदस्यांच्या हाती भारतातील मुस्लिमांच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक भवितव्याची बागडोर जावी हे आजच्या मुस्लिम तरुणांचे दुर्दैव होय. आता 'अशा' लीगी सदस्यांना सरदार पटेलांनी उत्तर दिले ते असे, ``...We have heard it long enough. We have heard it for years and as a result of this agitation. we are now a separate nation. The agitation was that we are a separate nation. we cannot have separate electorates or weightage or any other concession or consideration sufficient for our protection. Therefore give us a separate state". We said, ``All right, take your state". But in the rest of India, in the 80 percent of India, do you agree that there shall be one nation? Or do you still want the two nations talk to be brought here also".[१०] सरदार पटेलांना लीगी सदस्यांनी त्यांचे (लीगी सदस्यांचे) दुष्कर्म उघड करून देण्याची संधी दिली. विभाजनाचा संपूर्ण इतिहास सरदारांनी जितक्या संक्षिप्तपणे विशद केला त्याला या जागी आक्षेप घेण्याचे कारण नाही. परंतु या विषयावर जी बृहद चर्चा आंतरराष्ट्रीय स्तरावर झाली तिचा निर्देश केला पाहिजे. काँग्रेसलाच (अर्थात त्यात सरदार पटेल आलेच) अखंड भारत नको होता, अशी धमालही उडविण्यात आली आहे. हे सर्व जमेस धरता अनेक महत्त्वाचे मुद्दे प्रस्तुतः अप्रस्तुत असल्याने ते बाजूला ठेवू. संपूर्ण चर्चेच्या ओघात मुस्लिम लीगी सदस्याच्या वक्तव्याचा आधार घेत – (मुस्लिम अतिशय संघटित– strong-knit) मुस्लिमांना कुठल्याच आधाराची गरज नाही असा निष्कर्ष सरदार पटेलांनी काढला व तसे वक्तव्य केल्यावर सभागृहात चिअर्सचा जल्लोष झाला.[११] याची परिणिती मुसलमानांना राखीव जागा नाकारण्यात होणार आहे. याचा कयास बांधता आला नसता. मुस्लिम लीगच्या सदस्यांचे म्हणणे इतक्या गंभीरपणे घेण्याची गरज नव्हती. परंतु तसा निर्णय पूर्वीच घेण्यात आला असेल. मुस्लिम असंघटित आहेत, दुबळे आहेत अशा म्हणण्याने मुस्लिमांना राखीव जागा मिळाल्या असत्या असे नाही. इतर अनेक जमाती आहेत ज्या असंघटित आहेत, त्यांना आधाराची अधिक गरज होती आणि मुस्लिमांनी असे आधार भूतकाळात दीर्घपणे उपभोगले, असा



सरदार पटेलांचा युक्तिवाद होता.

राखीव जागांची गरज सरदार पटेल मान्य करतात. या देशातील राखीव जागांसारख्या जागा इतर कोणत्या देशात दिल्या जातात काय, ते असा प्रश्नही विचारतात. मुस्लिमांनी पांगळ्यासारखे वागू नये, धैर्य बाळगावे असे सांगत मुस्लिमांची बोळवण करतात.[१२] विधिमंडळामधील राखीव जागांविषयी निकाल लागला. सरदार पटेलांनी शेड्युल्ड कास्ट्सना विधिमंडळावर राखीव जागा दिल्या. त्याचबरोबर तंबी दिली. मुस्लिमांना दिलेल्या तंबीपेक्षा ही जरा सौम्य होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी त्यांनी राग व्यक्त करण्याची संधी सोडली नाही. ''डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या गटाने काय केले हे आपण विसरून जाऊ. शेड्युल्ड कास्ट्सनी काय केले हेही विसरून जाऊ''. यापुढे हे उद्धरण इंग्रजीतच देत आहे. ``You have very nearly escaped partition of the country on your lines... I feel that the vast majority of Hindu population wish you well. Without them where will you be? Therefore secure their confidence and forget that you are a scheduled caste. I do not understand how Mr. Khandekar is a scheduled caste man. If he and I were to go outside India, nobody will find out whether he is a sehedule caste man or I am a sceheduled caste man. There is no scheduled caste between us. So those representatives of the seheduled caste must know that the seheduled caste has to be effaced altogether from our society".[१३] सरदार पटेलांच्या म्हणण्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी 'काही'तरी केले असले पाहिजे. हे करूनसुद्धा संपूर्ण हिंदू समाज शेड्युल्ड कास्टबरोबर होता. सवर्ण आणि शेड्युल्ड कास्ट यांमधील फरक बाहेरच्या (भारताबाहेरच्या) लोकांना कळणार नाही हे अगदी बरोबर! कारण बाहेर जातिव्यवस्था असण्याचे कारणच नाही आणि शेड्युल्ड कास्ट नष्ट करण्यासंबंधी परिस्थिती आपल्यासमोर आहेच.

मुसलमानांना आरक्षण दिले जाण्याचा निर्णय झाला होता. परंतु भारताच्या विभाजनामुळे त्याला तिलांजली द्यावी लागली. (Sardar Patel- But at the same time, as you have enjoyed this to a certain extent for a long time and you may not feel that there is discrinination, we agree to reservation according to population basis)[१४] घटना समितीतील ही संपूर्ण चर्चा वाचताना दोन महत्त्वाच्या बाबी संभवतात, पहिली अशी की नाट्यशास्त्रातील/साहित्यातील पुनःप्रत्ययाचा आनंद. या चर्चेत आनंदाऐवजी दुःख प्राप्त होणे अटळ आहे. वाचक पुनःप्रत्ययाचे दुःख झेलतात. गोष्ट इथेच थांबत नाही त्याची आठवण करून देतात. मुसलमानांमध्ये जातिव्यवस्था नसल्याने जात्यांतर्गत वंचिततेचा प्रश्नच उद्भवत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. मंडल आयोगाने ८० मुस्लिम गट-जाती मागासलेल्या असल्याचे मान्य केले. ऑगस्ट १९९० मध्ये त्याच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली. १९४७ मध्ये मुस्लिमांना राखीव जागा द्याव्यात की न द्याव्यात, यावर खल होऊन ४३ वर्षांनी मुस्लिमांमधील ८० जाती मागास झाल्या. अगोदर त्या 'पुढार' तर नव्हत्याच! म्हणजे १९९० पर्यंत त्या मागासपेक्षा अधिक मागास झाल्या. तहसील कार्यालयांमध्ये मागास, अशिक्षित मुस्लिमांना- 'तुमच्यात जातिव्यवस्था नाही आणि तुम्ही तर जातीच्या आधारावर अर्ज करावयास आलात हे कसे? असे प्रश्न विचारण्यात येतात. भाजप सत्तेवर येण्यापूर्वी हीच परिस्थिती होती.

इथे आणखी एका मुद्याकडे लक्ष वेधले पाहिजे. शेड्युल्ड कास्ट्सच्या सवलती केवळ हिंदूंपुरत्या सीमित होत्या. शीख, बौद्ध, जैन यांना घटना कोडच्या संदर्भात हिंदूंमध्येच समाविष्ट करते. परंतु राखीव जागा शेड्युल्ड कास्ट्समधील अशा लोकांना मिळाल्या नाहीत ज्यांनी धर्मांतर केले. हे करताना आपल्या सेक्युलॅरिझमवर आच आली नाही. शिखांना १९५६ मध्ये आंदोलन करावे लागले तेव्हा त्यांच्यातील मागास जातींचा समावेश शेड्युल्ड कास्ट्समध्ये झाला. १९९० मध्ये नवबौद्धांचा समावेश झाला. शेड्युल्ड कास्ट्समधील ज्या लोकांनी ख्रिश्चन आणि इस्लामचा स्वीकार केला त्यांचे काय झाले? दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका झोया हसन यांनी स्पष्टीकरण दिले की, ''Both in the constitution and the Hindu code Bill, Hindus Include Jains, Buddhists and Sikhs, while Muslims and Christians are external to this fold because their religions were born outside India".[१५] स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण झोया हसन यांना झाली नसावी किंवा झाली असली तरी त्यांनी ती व्यक्त केली नसावी. स्वा. सावरकरांच्या हिंदुत्वावर टीका करण्यात ज्या काँग्रेसची हयात गेली

त्यांच्याविषयी झोया हसन अप्रत्यक्षतः बोलताहेत.

शेड्युल्ड कास्ट आणि शेड्युल्ड ट्राईब्जना ज्याप्रमाणे सरसकट राखीव जागा देण्यात आल्या तशा मुस्लिमांना देता येणार नाहीत असे मंडल आयोगानेही स्पष्ट केले होते.[१६] सर्व धर्मांमधील लोकांमध्ये काही लोक पुढारलेले असतात तर काही मागासलेले असतात. झोया हसन यांच्या म्हणण्याप्रमाणे मंडल आयोगाने मुस्लिमांमधील 'जातसदृश' गटांना मागासलेला 'वर्ग' मानलेले आहे. त्यांनी बारकाईने निरीक्षण नोंदविले आहे की, ''हे मात्र स्पष्ट नाही की मुस्लिम ओ.बी.सी.चा संबंध मुस्लिमांमधील पुढारलेल्या व मागासलेल्या गटांशी आहे की, मुस्लिमांमधील व्यावसायिक गटांशी आहे? या व्यावसायिक गटांचा समावेश मुस्लिम मागासवर्गात मंडल आयोगाने केला. विशेष या व्यावसायिक गटांचा समावेश 'अजलफ' (मुस्लिम कनिष्ठ) जातीत केला जातो हे वास्तव आहे. उच्चभ्रू असलेले गट म्हणजे 'अश्रफ' मुस्लिम वरिष्ठ जाती यातून वगळल्या आहेत हे महत्त्वाचे आहे; कारण अल्पसंख्याकांमध्ये समस्या 'गटांतर्गत' नसून, 'आंतरगटीय' विषमतेशी निगडित आहे.[१७] ''भारतातील काही घटकराज्यांनी मुस्लिमांना वर्ग किंवा जात मानून राखीव जागा दिल्या आहेत. केरळमध्ये मुस्लिमांसाठी राखीव जागा आहेत. तमिळनाडू आणि कर्नाटकात सर्व मुस्लिमांना जात/ वर्ग मानून राखीव जागा दिल्या आहेत. २२ टक्के मुस्लिम लोकसंख्या असणाऱ्या केरळात १२ टक्के राखीव जागा आहेत''.[१८] मंडल आयोगाप्रमाणे २७ टक्के लोकसंख्या ओ.बी.सी. लोकांची असून, या २७ टक्क्यांपैकी मुस्लिम ८ टक्के आहेत. मुस्लिमांची संख्या भारतीय लोकसंख्येच्या ११.२ टक्के आहे. याचा अर्थ मागास मुस्लिमांची संख्या एकूण मुस्लिम संख्येच्या निम्म्याहून जास्त आहे. मुस्लिम मागास जातीत विणकर, तेली, सुतार, परीट/ धोबी यांसारख्या जातीच्या लोकांचा समावेश होतो.[१९]

भारतीय पातळीवर लोकसंख्येत बदल झाले. हिंदू ७९.८ टक्के, मुस्लिम १४.२ टक्के, एस.सी. २० टक्के, एस.टी. ९ टक्के, ओ.बी.सी. ४१ टक्के, शीख, जैन व बौद्ध मिळून ६ टक्के आणि ब्राह्मण ५ टक्के आहेत. हिंदूंमध्येच एस.सी., एस.टी., शीख, जैन, बौद्ध आणि ब्राह्मणांचा समावेश आहे. ओबीसींमध्ये सर्व धर्मांतील लोकांचा समावेश होतो. (भिन्न, भिन्न स्रोतांमध्ये या आकडेवारीत थोडाफार बदल आढळतो.)

मुस्लिमांमधील काही गटांनी केलेल्या मागणीचा उल्लेख थिओडर राईट (ज्यु.) यांनी १९९७ मध्ये केला होता. ती मागणी अशी की, सर्व मुस्लिमांचा समावेश मागासवर्गात केला जावा. प्रथमतः ओबीसी मुस्लिमांच्या जागा भरल्या जाव्यात. काही कारणांनी त्यांचा कोटा पूर्ण भरला जात नसेल तर मुस्लिम अश्रफ जातीच्या उमेदवारांनी त्या भरल्या जाव्यात. परंतु अजलफांनी याला मान्यता दर्शविली नाही.[२०] राखीव जागांचा केक वर्ग आणि जातीच्या आधारे समांतरित कापताना धर्माच्या आधारे उभटही कापला पाहिजे, असा आग्रह धरला गेला.[२१]

या सर्व प्रक्रियेतील मुस्लिम मानस समजून घेतले पाहिजे. 'मुस्लिम' म्हणून मागासवर्ग मानला तर आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती चांगले असणारे लोक सवलती प्राप्त करतील आणि गरीब 'पात्र' मुस्लिम वंचित राहतील. केवळ गरिबांसाठीच राखीव जागा असतील तर या गरिबांपेक्षा थोडे अधिक चांगली आर्थिक स्थिती असणारे आणि श्रीमंत मुस्लिमांना स्पर्धा करावी लागेल ती सवर्ण हिंदूंशी जे सर्व दृष्टीने योजनेपुढे गेलेले आहेत. 'अश्रफ' मुस्लिमांच्या मागासपणात कोण जबाबदार आहे, हा चर्चेचा वेगळा विषय होईल. इतर कारणे असली तरी 'अनास्था' हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. बदलत्या परिस्थितीशी आणि शिक्षणाशी सुसंगतता मुस्लिमांना ठेवता आली नाही. याचा अर्थ त्यांना हात देण्याची शासनाची काही जबाबदारीच नसते असे नाही. मुस्लिमांना शिक्षणात आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये राखीव जागा देऊन हा प्रश्न सोडविता येऊ शकेल, संविधान अमलात आल्यानंतर आणि थोडेसे त्या अगोदरही मुस्लिमांना भारतीय राजकारणात सन्मानाची पदे मिळाली. पण सर्वसाधारण मुस्लिमांचे प्रश्न अजूनही कायम आहेत. परंतु त्यांच्या समस्यांवर चिंतन झाले नाही असे म्हणता येणार नाही.




२००६ मध्ये सच्चर समितीचा अहवाल आला. या अहवालाचा सर्वांत मोठा फायदा असा झाला की, मुस्लिमांविषयीच्या 'दंतकथा' या खरोखरच दंतकथा आहेत हे निःपक्षपाती समितीने सांगितले. तथ्ये काय आहेत हे वस्तुनिष्ठपणे सांगण्यात आली. मुस्लिमांचा अनुनय होतो किंवा झाला याची साक्ष देण्यासाठी हजारो साक्षीदार आपण पाहतो. राजकारणासाठी तसे केले जाते, त्याचप्रमाणे मुस्लिमांचे अनुनय केले जात नाही, असेही राजकरणासाठी म्हटले जाते.

भारतीय मुस्लिमांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीविषयी घटकराज्यांमधून माहिती संकलित करण्यात आली. मुस्लिमांची संख्या बारा घटकराज्यांमध्ये १५.४ टक्के होती. मुस्लिमांच्या लोकसंख्या दरात घट झाल्याचे सच्चर समिती सांगते.[२२] स्टेट पब्लिक सर्व्हिस कमिशन्सनुसार सरकारी क्षेत्रातील मुस्लिमांचा वाटा २.१ टक्के आहे.[२३] मागासलेपण ठरविण्याची 'जात' ही कसोटी आयोगाने आणि न्यायालयांनी मान्य केली. मुस्लिम ओबीसींना राखीव जागांची सवलत या आधारावर देण्यात आली. वेंकटरमण वि. स्टेट ऑफ मद्रास खटल्यात सुप्रीम कोर्टाने मद्रास शासनाने तयार केलेली मागासवर्गीय जातींची यादी मान्य केली. पी. राजेंद्रन वि. स्टेट ऑफ मद्रास खटल्यात सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, जातदेखील संपूर्णपणे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टीने मागासलेली असेल तर तीही नागरिकांचा 'वर्ग' मानता येतो. इंद्र साहनी वि. युनियन ऑफ इंडिया केसमध्ये आर्थिक घटकाने/निकषाने मागासलेपण ठरविता येणार नाही असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. अहिंदूंच्या मागासतेबद्दल कोर्टाने स्पष्ट केले की, परंपरागत व्यवसायाच्या आधारावर मागासलेपण ठरविता येईल.[२४] सच्चर समितीच्या केवळ तीन शिफारशी नाकारल्या. त्यात एक अत्यंत महत्त्वाची शिफारस नाकारली ती अशी की, ''मुस्लिमांमधील 'अर्जल' जातींच्या मुस्लिमांचा समावेश एस.सी.मध्ये करावा''. एस.सी.मधील लोक जी परंपरागत कामे करीत होती ती कामे 'अर्जल' करतात.

सच्चर आयोगानंतरच्या दशकात काय झाले याचा मागोवा घेण्यात आला. मासिक दरडोई खर्च करण्यात मुस्लिम सरासरीत शेवटच्या स्थानावर होते. मागासलेपणात सच्चर आयोगाने मुस्लिमांना शेड्युल्ड कास्ट व शेड्युल्ड ट्राईब्ज यांच्यापेक्षाही अधिक मागास म्हटले होते. आय.ए.एस. व आय.पी.एस. श्रेणीमध्ये मुस्लिमांना वाटा नगण्य होता. पोलिस फोर्समध्ये तर त्यांचा वाटा घटला. २०१३ मध्ये तो ७.६३ टक्के होता, २०१६मध्ये ६.२७ टक्के झाला. २०१६ मध्ये आय.ए.एस. श्रेणीत मुस्लिम ३.३२ टक्के तर आय.पी.एस.मध्ये ३.१९ टक्के होते. सच्चर समितीने (२००६ मध्ये) हे प्रमाण अनुक्रमे ३ टक्के आणि ४ टक्के दर्शविले आहे. पोलिस खात्यात सच्चर समितीच्या काळात मुस्लिम मोठे अधिकारी ७.१ टक्के होते तर २०१६ मध्ये हे प्रमाण ३.८२% पर्यंत घटले.[२७]

इ. स. २००७ मध्ये 'नॅशनल कमिशन फॉर रिलीजिअस ॲण्ड लिंग्विस्टिक मायनॉरिटीज'चा अहवाल (मिश्रा आयोग अहवाल) आला. या कमिशनने मुस्लिमांना आरक्षण देण्याची शिफारस केली. या कमिशनच्या इतर शिफारशी अतिशय मौलिक आहेत. त्याही खूप तपशीलवारपणे मांडल्या आहेत. म्हणून राखीव जागांविषयीचे विवेचनच लक्षात घेऊ. १६.२.१६ मध्ये कमिशन म्हणते की, शासकीय नोकऱ्यांच्या काही क्षेत्रात मुस्लिमांचे प्रमाण कमी आहे, तर काही क्षेत्रात तर ते अजिबात नाहीच. We recommend that they should be regarded as backward in this respect within the meaning that term as used in Article 16 (4) of the constitution-notably without qualifying the word backward with the words socially and educationally- and that 15 percent of posts in all



cadres and grades under the central and state Governments should be earmarked for them as follows...[२६]

या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी जर काही अडचण आली तर त्याचा पर्याय मिश्रा आयोगाने दिला. १६.२.१७ मध्ये आयोग स्पष्ट करतो की, मंडल आयोगाने ओबीसींसाठी २७ टक्के राखीव जागा दिल्या आहेत. यापैकी ८.४ टक्के जागा अल्पसंख्याकांसाठी दिल्या जाव्यात. ८.४ टक्क्यांपैकी ६ टक्के जागा मुस्लिमांना द्याव्यात, कारण अल्पसंख्याकांच्या लोकसंख्येत ७३ टक्के मुस्लिम अल्पसंख्याक आहेत. उरलेल्या २.४ टक्के इतर अल्पसंख्याकांमध्ये विभागल्या जाव्यात.[२७] मिश्रा आयोगाने आपले कार्य सुरू करून काही महिने झाल्यानंतर शासनाने टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये बदल केल्याचा उल्लेख पान १५३ वरच केला आहे. त्यामुळे राखीव जागांच्या मूळ शिफारशीला पर्याय शोधावयास लागला असण्याचा संभव आहे.

घटना समितीत या विषयावर जी चर्चा झाली ती देशाच्या विभाजनामुळे निर्माण झालेल्या धार्मिक हिंसाचाराच्या वादळात वाहून गेली. घटना समितीत अल्पसंख्याकांच्या अधिकारावर विचार करण्यासाठी जी सल्लागार समिती होती तिच्यातील मुस्लिम सदस्य मुस्लिमांपेक्षा 'जास्त' मुस्लिम लीगी होते. भारतीय मुस्लिमांच्या विकासाचा रोडमॅप त्यांच्या ध्यानीमनी नव्हता. स्वतःच्या राजकीय भवितव्याची काळजी त्यांना खात असली पाहिजे. त्यांच्या राजकारणाच्या ऱ्हासानंतर देशाच्या विभाजनाचे ओझे सर्वसामान्य मुस्लिमांवर आले. मुस्लिमांना सतत 'डेफन्सवर' ठेवण्यात राजकारणी यशस्वी ठरले आहेत. मुस्लिमांना धार्मिक प्रश्नांमध्ये गुंतविले गेले. ही गुंतविणाऱ्यांचीच चूक आहे असे अजिबात नाही. स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिमांनी सामाजिक सुधारणांवरच लक्ष केंद्रित करण्याची मागणी जोरदार होती. आर्थिक मुद्दे आले, मागण्या आल्या की, संविधानात दिलेल्या समानतेच्या अधिकाराची आठवण सर्वांना होत असे. अगदी शेड्युल्ड कास्ट आणि ट्राईब्जच्या हजारो वर्षांच्या वंचितांना राखीव जागा दिल्या तेव्हा समतेच्या मुद्यावर अनेकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. शासनाला कोणतीच झळ विशेषतः आर्थिक झळ सोसावी लागणार नाही अशा किरकोळ धार्मिक सवलती दिल्या की, मुस्लिम खूश आणि अनुनय झाला असा घोशा लावण्याची संधी मिळाली की हिंदुत्ववादी खूश!

आता तर हिंदू तरुणांचेही जे असंख्य प्रश्न आहेत त्यापासून त्यांचे लक्ष इतर प्रश्नांकडे वेधण्याचा प्रयत्न सुरू आहे. चांगले शिक्षण, चांगली नोकरी आणि सुसह्य जीवन या त्यांच्या मागण्यांचा त्यांना विसर पडावा म्हणून वातावरणनिर्मिती केली जातेय. गरीब, बेरोजगार मराठ्यांना याची जाणीव होऊन राखीव जागांची त्यांनी केलेली मागणी अतिशय नैसर्गिक आणि वास्तव स्वरूपाची आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीचा दावा केला जातो, तर रोजगार नाहीच अशी कबुलीही दिली जाते.

भारतीय सेक्युलॅरिझमने अनेक संकटांना तोंड दिले आहे. सेक्युलॅरिझमच्या समर्थकांनी मुस्लिमांची बाजू घेतली असल्याची टीका अनेक वर्षांपासून होत आहे. शेड्युल्ड कास्ट्स व ट्राईब्ज यांच्या राखीव जागांबद्दल लोकमत काय आहे हे नव्याने सांगायची गरज नाही. राजकीय समतेबरोबर आर्थिक समताही निर्माण झाली पाहिजे; परंतु समतेच्या तत्त्वाचे आकलन फार वेगवेगळ्या प्रकारचे आहे. मुस्लिमांना राखीव जागा दिल्याने उद्रेक होईल किंवा करविला जाण्याचा संभव आहे. इतरांना राखीव जागा दिल्याने संपूर्ण समाजाचे भले होईल अशी परिस्थिती निर्माण करण्यात कोणत्याही राजकीय पक्षाच्या शासनाने प्रयत्न केलेला नाही. राखीव जागा ज्यांना मिळालेल्या नाहीत त्यांना कोणत्याच समस्या नसतात असे म्हणता येणार नाही. राखीव जागा इतरांना दिल्याने राखीव जागा नसणाऱ्यांना कशापासून तरी वंचित केले जात आहे असे वाटणार नाही, असे धोरण आखावयास हवे. मनुष्यबळाचा जास्तीत जास्त वापर केला जाईल अशी अर्थव्यवस्था विकसित करायला हवी.

सगळ्यांचा विकास साधताना, ज्यांचा खूप विकास अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर झालेला असेल त्यांना आणखी फार मोठ्या प्रमाणावर विकास करण्यापासून थोडी विश्रांती दिली पाहिजे. अनेक वर्षांपासून वंचित राहणाऱ्यांना विकास करण्यासाठी मदत केली पाहिजे. सर्वांचे हितसंबंध समान असतील, विकासाचा लाभ घेण्याची क्षमता समान असेल तरच सर्वांचा विकास होईल. अन्यथा मोठा भांडवलदार आणि किरकोळ व्यापारी, मोठा शेतकरी व लहान शेतकरी, कारखानदार आणि किरकोळ व्यापारी, मोठा शेतकरी व लहान शेतकरी, कारखानदार आणि मजूर, खूप शिकलेला-डोनेशन देत देत का होईना, खूप कमी शिकलेला अत्यंत सुस्थितीतला आणि दारिद्र्याने पोखरलेला यांचा एकदम विकास ॲडम स्मिथचा 'इनाव्हिजिबल हँडच' करू शकतो; हा हँड स्मिथसाठी काम करत असावा. तो 'हँड' भारतात सध्याच्या शासनाने आणलेला असावा. जसे चालले आहे, चालू द्या. आपोआप 'संतुलन' निर्माण होईल. राखीव जागांसाठीच्या मागण्या लोंबकळत ठेवण्यासाठी बहाणा चांगला आहे.

# संदर्भ

1. There is much that is happening round us, which requires us to dispose of our business as quickly as frossible, and we should do nothing in this House which will add our difficulties or to the difficulties of our neighbours who are at present involved in bitter ptrife and when our heart are bleeding with the wounds that are being inficted on one of our best provinces in India (Conshitnent Assembly Debates Vol V 14-8-1947-30-8-1947 Report of on Minorily Rights P. 1980

2. In my opinion there is no more monstrous word in the history of indian politics than the word "minorily"....it is in my view, essentially the work of satan of minority that our beloved country unites for over a centry has been devided into more part than one.

Ibod p 201

3. For many years past, it was the majorily that has been tyrannized Ibid p. 201

4. Autobiograpy p. 469 उद्धृत Perry Anderson. The Indian Ideology, New Delhi, Three Essays 2012, p.60

५. पेरी अँडरसन कित्ता पान ८९

6. ".....by October it was in his eyes álready a tottering state- that is has no chance of survising" (Selected works of jawaharal nehru 9ed. S. Gopal) Second Series Vol 4 pp 270-271) pp 270-271)

पेरी अँडरसन कित्ता पान ८९

पूर्वोक्त (AD) पान २२०

८. कित्ता पान २११

९. ''I do not want like others weightages, or a separate state. Nobody has a better claim than us for a separate state. We are the aboriginals of tis country.

10. CAD Vol V p. 225

११. कित्ता पान २२५

12. ''Where is that kind of reservation in any other free country in the world? Will you show me? I ask you. You are a very well-organised community. Tell me why you behave like a lame man? Be a bold and strong man, as you are well-organised and stand up.

१३. कित्ता पान २७२

१४. कित्ता पान २२५

१५. झोया हसन- रिझर्वेशन्स फॉर मुस्लिम्स- सेमिनार- ५४९ मे २००५ न्यू डेलही, पान ४७

16. "It (mandal commission) recognized specific communities cutting across religion as beckward on the basis of a time- tested criterion of backwardnes evolved by different states" कित्ता पान ४८

१७. कित्ता पान ४८

१९. रिपोर्ट ऑफ दी बॅकवर्ड क्लासेस कमिशन १९८० (नोन अॅज दी मंडल कमिशन)

पाने ६०-६१ उद्धृत कित्ता पान ४८

२०. थिओडर राईट (ज्यु)- ए न्यू डिमांड फॉर मुस्लिम रिझर्वेशन्स इन इंडिया- एशियन सर्व्हे व्हाल्यूम ३७ नं. ९ सप्टेंबर १९९७ उद्धृत कित्ता पान ४९

२१. कित्ता पान ४९

२२. सच्चर समिती अहवाल प्रकरण १२ पान १७६ तसेच पुडे आले आहे की , "A very small proportion of government public sector empolyees are Muslims and on averagge they are concentrated in lower level position" (कित्ता पाने १८६-८७)

२४. कित्ता प्रकरण १२ पान १९२

२५. इंडियन एक्स्प्रेस २६ डिसेंबर २०१६ झिशान अली- टेन इयर्स आफ्टर साचर रिपोर्ट

२६. रंगनाथ मिश्रा आयोग- दिल्ली, मिनिस्ट्री ऑफ मायनॉरिटी अफेअर्स भाग पहिला- पान १५२

२७. कित्ता पान १५३

ही शिफारस करून मिश्रा आयोग म्हणते की, असे केल्याने फारशी अडचण येणार नाही.

"We are convinced that the action recommended by us above will have full sanctin of Artile 16 94) of the constitution".

आणि समजा काही अडचण आलीच तर संबंधित घटक राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागांमध्ये बदल करता येतील. अर्थात या सर्व बाबी त्याचवेळी घडतील जेव्हा आयोगाच्या शिफारशी मान्य केल्या जातील.

***



प्रा. डॉ. भारती पाटील



# महिला आरक्षण : संकल्पना आणि वास्तव

**आपल्याला पंख होते आणि उडताही येत होते हे पिंजऱ्यात राहून विसरून गेलेल्या महिला प्रथमच पिंजऱ्याबाहेर आल्या तेव्हा पंख हलवायला थोडाफार त्रास झाला हे खरे आहे. पण महिला आरक्षणाला आता पाव शतक पूर्ण झालंय. या काळाचा लाभ या पक्षांनी घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. समाजात दुर्लक्षित केली गेलेली पन्नास टक्के प्रतिभा, कर्तृत्व विचार वास्तवात आणलं.**

भारतात १९९३ मध्ये एक क्रांतिकारी पाऊल टाकले गेले. भारतीय लोकशाहीला आपल्या हातांनी तोलणाऱ्या भारतीय जनतेच्या निम्म्या प्रमाणात असणाऱ्या स्त्रियांना लोकशाही प्रक्रियेत भरीव वाटा मिळाला. त्यापूर्वी स्त्रियांचा लोकशाहीतील सहभाग केवळ मतदार तोही परावलंबी मतदार म्हणूनच राहिला होता. निर्णय निर्धारणाच्या प्रक्रियेपासून त्या शेकडो कोस दूर होत्या; परंतु १९९३ मध्ये ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती झाली आणि स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के वाटा मिळाला. जागतिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेविरोधात झालेली संमेलने आणि संहिता यांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान राजीव गांधींनी स्त्रियांना सत्तेत वाटा देण्याचा पहिला प्रयत्न केला. अर्थात लोकसभा विसर्जित झाल्यामुळे तो अपूर्ण राहिला. पुढे पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाल्यावर काँग्रेस सरकारने स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के वाटा देण्यासाठी घटनादुरुस्ती

केली. स्त्रियांचा सक्रिय राजकारणात प्रवेश झाला. २००५ मध्ये बहुतेक सर्व राज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्त्रियांचे प्रमाण पन्नास टक्क्यांपर्यंत नेले. या स्त्रियांच्या आरक्षण धोरणाला यावर्षी २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. मागे वळून पाहताना स्त्रियांच्या आरक्षणाची संकल्पना व प्रत्यक्ष वास्तव समजून घेणे औचित्याचे ठरेल.

पहिल्यांदाच घराचा उंबरठा ओलांडून गावचा, शहराचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा कारभार बघायला बाहेर पडलेल्या स्त्रिया बावरल्या, दडपणाखाली वागू



लागल्या, पतिराजांच्या माध्यमातून काम करणाऱ्या कठपुतळ्या म्हणून काम करू लागल्या. अनेक वर्षे पिंजऱ्यात डांबून ठेवलेल्या पक्षाला पिंजऱ्याचे दार उघडल्यावरसुद्धा थोडा वेळ उडता येत नाही, आपल्याला पंख आहेत हेच तो विसरतो आणि थोडा वेळ फक्त पंखांची फडफड करतो तशीच काहीशी अवस्था बहुतांश स्त्रियांची सुरुवातीच्या काळात झाली; पण त्यांच्या लक्षात येऊ लागले की, आपल्याला पंख आहेत आणि त्याच्या सहाय्याने आपण उंच भरारी मारू शकतो. स्त्रिया हळूहळू धिटपणे, विचारपूर्वक, आत्मविश्वासाने विरोधाला न जुमानता, कुटुंबीयांची कधी मर्जी सांभाळत तर कधी विद्रोह करत काम करू लागल्या. आपल्या गावाचा, शहराचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा विचार करू लागल्या. भूमिका मांडू लागल्या. नवनवीन संकल्पना मांडू लागल्या. अर्थात पुरुषसत्ताक समाजात निवडून आलेल्या सर्वच स्त्रिया अशा प्रकारे क्रियाशील झाल्या, त्या पूर्णतः स्वायत्तपणे करू लागल्या असे म्हणता येणार नाही. परंतु समाजाचा, त्यांच्या कुटुंबीयांचा दृष्टिकोन खचितच बदलला. विरोधाची धार कमी झाली. निरक्षरता, दारिद्र्य, कुटुंबांतर्गत आणि समाजातील पुरुषी वर्चस्व यांसारख्या अडथळ्यांना पार करत अनेक स्त्रिया आज सक्षमपणे काम करत आहेत. संधी मिळाल्यास स्त्रिया काय करू शकतात हे भारतातील तळागाळातील स्त्रियांनी दाखवून दिले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करताना स्त्रियांचे प्रश्न उदाहरणार्थ नळपाणी योजना, अस्वच्छता, शालेय शिक्षण, आरोग्य हे प्रश्न अग्रक्रमाने मांडतात. उत्तर प्रदेशातील गरचापा गावच्या पंचायत सदस्य चंद्रावती सिंग यांनी संपूर्ण गावात हातपंप बसवण्यासाठी प्रथमतः गावाचे सर्वेक्षण केले. योजना अशी राबविली की सर्व गावात पाणी पोहोचेल. नाथोबेगम या डेहराडून जिल्ह्यातील सरपंचांनी आपली स्वतःची जमीन शाळा सुरू करण्यासाठी दिली. मुखई ग्रामपंचायतीमधून निवडून आलेल्या मंगला आरोळकर या महिलेने गावातील विरोधाला न जुमानता पूर्ण जुगारबंदी केली. गावात पूर्ण दारूबंदी करण्यासाठी व स्त्रियांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. कोल्हापूर जिल्ह्यातील पार्वतीबाई माळी यांनी अगदी सुरुवातीच्या काळात दारूबंदीचा केलेला यशस्वी प्रयत्न सर्वश्रुत आहेच. सहारनपूर जिल्ह्यातील गाझीदीपूर या गावातील ग्रामपंचायत सदस्य कामिया यांनी गावच्या सरपंचांना विरोध करून दारू दुकान बंद करण्यासाठी स्त्रियांना संघटित केले आणि यश मिळवले. गडचिरोली, चंद्रपूर तसेच आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, ओरिसा यांसारख्या राज्यातही अशा प्रकारची कामे झाल्याचे आढळते. आंध्र प्रदेशातील कुर्नुळ जिल्ह्यातील कालवा या गावातील सरपंच फानिमा बी यांनी आपल्या गावातील अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला. फातिमा बी एक अशिक्षित स्त्री पण तिच्या कार्यकर्तृत्वाची दखल संयुक्त राष्ट्रसंघटनेने घेतली. तिला Race Against Porerty हा सन्माननीय पुरस्कार जाहीर केला.

स्त्रियांकडे सत्तेची सूत्रे आल्यानंतर त्यांनी पंचायतींना आपली मिळकत

कशी वाढवता येईल याकडे तर लक्ष दिलेच; शिवाय पंचायतींचा पैसा काटकसरीने कसा वापरता येईल याचा वस्तुपाठ घालून दिला. या संबंधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे : हरियाणातील कोसली गावच्या सरपंच ऊर्मिला यादव यांनी प्रथमतः पंचायतीच्या जागेवरील अतिक्रमण हटवले आणि त्या जागी दुकाने बांधून ती भाड्याने दिली. पंचायतीची मिळकत आपोआपच वाढली. डेहराडून जिल्ह्यातील नाळापानी गावात ४२ हजार रुपये खर्चून एक भिंत बांधण्यात आली होती; पण ती पडली. ज्युनिअर इंजिनिअरने ती पुन्हा बांधण्यासाठी ४५ हजार रुपये इतका खर्च सांगितला. ग्रामपंचायत सदस्य अलका चौहान यांनी गावातील लोकांना संघटित केले आणि अवघ्या ३३ हजार रुपयांत भिंत बांधून पैसे वाचवले. इतर विकासकामांसाठी ते वापरले. सुलतानपूर- चिलकानानगर ग्रामपंचायत कर्जात बुडालेली होती. सुरय्या बेगम तिथे सरपंच झाल्या. त्यांनी कर्जफेड तर केलीच, शिवाय पाच वर्षांच्या कार्यकाळात ८० लाखांची विकासकामेही केली. कर्नाटकातील एका संशोधनाने स्पष्ट केले आहे की, रस्त्यावर दिवे लावण्याच्या योजनेत स्त्रिया सरपंच असणाऱ्या गावांनी इतर गावांच्या तुलनेत जवळपास सहा टक्के खर्च कमी केला आहे. स्त्रिया सरपंच असणाऱ्या ग्रामपंचायती अधिक कार्यक्षम आहेत, हेच यावरून सिद्ध होते.

राज्यकारभारात स्त्रिया आल्या की, त्या अधिक जबाबदारीने वागतात. भ्रष्टाचारावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करतात अशीही अनेक उदाहरणे आपल्यापुढे आहेत. सांगली जिल्हा परिषद सदस्या छाया पाटील यांनी उघड केलेला तांदूळ घोटाळा त्याचे बोलके उदाहरण आहे. मध्य प्रदेशमधील रामटेक पंचायतीतील सरोजबाई यांनी एका भ्रष्ट अधिकाऱ्याला निलंबित केले तर पुष्पा राणा या अटक फार्मा ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्यास नकार दिला.

वर निर्देशित केलेली केवळ प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. यापेक्षा कितीतरी पटीने अधिक उदाहरणे अशी आहेत ज्याद्वारे हे सिद्ध होते की, गेल्या पंचवीस वर्षांत स्त्रियांनी आरक्षणाच्या माध्यमातून जी संधी मिळाली त्याचे सोने केले. स्त्रियाही विचार करून कार्यक्षमपणे कारभार करू शकतात हेच या उदाहरणांवरून स्पष्ट होते. स्त्रियांना आरक्षण देण्याचे धोरण जेव्हा स्वीकारण्यात आले तेव्हा त्याचे प्रमुख दोन उद्देश होते. पहिला लोकसंख्येच्या ५० टक्के असणाऱ्या स्त्रियांना लोकशाहीमध्ये न्याय द्यायचा, त्यांना निर्णय निर्धारण प्रक्रियेत समान वाटा द्यायचा तर दुसरा उद्देश म्हणजे स्त्रियांच्या ठायी असणारी बुद्धी, शिक्षण, कौशल्य यांचा योग्य पद्धतीने राष्ट्राच्या विकासासाठी वापर करायचा. गेल्या पंचवीस वर्षांत स्त्रियांनी ज्या प्रकारे कार्य केले आहे त्यावरून राखीव जागांच्या धोरणाला स्त्रियांनी न्याय दिला असेच म्हणावे लागेल.

***





– प्रवीण गायकवाड

# आरक्षण नसल्याने मराठा समाजाची हानी

**मराठा व कुणबी एकच आहेत हे वारंवार सिद्ध होऊनही मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवले आहे. मूठभर श्रीमंतांकडे बघून आरक्षण द्यायला विरोध केला जातो. सबब चार पिढ्यांची यात हानी झाली आहे.**




महाराष्ट्रातील मराठा समाज हा सर्वार्थाने मागासलेला आहे. हा शेतकरी समाज असून, तो कायमच विकासापासून वंचित राहिलेला आहे. शिक्षण, नोकरी आणि व्यवसाय यात पाठीमागे राहिला असून, त्याला बरोबरीने आणण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. आज काही लोक समाजातील काही श्रीमंत मराठा व्यक्तींकडे पाहून गरीब मराठा समाजाच्या आरक्षणाच्या विरोधात आहेत. सरकारही त्यांच्या बाजूने विचार करत नाही, हे दुर्दैवी आहे.

ओबीसीमध्ये समाविष्ट असणारा कुणबी हा खऱ्या अर्थाने मराठाच आहे. कुणबी व मराठा या जाती एकच असून, याचे मोठ्या प्रमाणावर पुरावे उपलब्ध आहेत. तेव्हा सरकारने मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करून त्यांना आरक्षण द्यायला हवे. हे आरक्षण देत असताना ५२ टक्क्यांच्या पुढे आरक्षण देता येत नाही, हा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल असला तरी तो संसदेतून रद्द करून आरक्षणाची मर्यादा वाढवली पाहिजे, अशी भूमिका मराठा आरक्षणावर बोलताना संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी 'द पीपल्स पोस्ट'शी बोलताना व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रात कुणबी मराठा या जातींचे आपापसांत एक लाखाच्या वर विवाह झाले असून, त्यासंबंधीचे पुरावे उपलब्ध आहेत. याशिवाय मराठे हे ओबीसीमध्ये येत आहेत, हे वेगवेगळ्या अभ्यासाअंती सिद्ध झालेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजदेखील कुणबी होते. ते कुणबी समाजातून पुढे आलेले राजे होते, हे ब्रिटिश अभ्यासकांनीदेखील नोंदवले आहे. या लेखनाचा इतिहास असून, जिथे शिवाजी महाराजच कुणबी होते तेव्हा बाकीचे मराठे कुणबी आहेत हे वेगळे सांगायला नको.

आज देशातील मराठा समाजाची परिस्थिती दयनीय असून, त्यांच्या शिक्षणाचे, नोकरीचे, उद्योग-व्यवसायाचे प्रश्न वाढले आहेत. मराठा समाजातील तरुणांची बेरोजगारी वाढलेली आहे, अशावेळी त्यांना आरक्षण मिळाले पाहिजे. त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक मागासलेपणाची नोंद सरकारने घेतली पाहिजे. त्यांना शासकीय सेवेत आणि इतर ठिकाणी आरक्षणाचा लाभ घेता आला पाहिजे. देशाचे पहिले कृषिमंत्री पंजाबराव देशमुख व त्यांच्या इतर दोन सहकाऱ्यांनी सुरुवातीच्या काळातच मराठा आरक्षणावर मत मांडले आहे. शेतकरी जातींना आरक्षण दिले पाहिजे असा विचार मांडला आहे. खरंतर त्यांच्या नजरेतून या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. आज मराठा समाज सर्वच क्षेत्रात मागासलेला आहे. देशातील जातिव्यवस्थेमुळे, वर्णव्यवस्थेमुळे तो मागासलेला राहिला असून, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरदेखील तो पाठीमागे आहे. म्हणून सरकारने त्याच्या हिताकडे लक्ष देऊन आरक्षण दिले पाहिजे. आरक्षण द्यायचे असेल तर घटनात्मकरीत्या ओबीसीचा आधार घेऊनच ते मिळवता येते. सरकारने कोणतीही दिशाभूल न करता मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करून आरक्षण दिले पाहिजे. ओबीसी म्हणून गेल्याशिवाय या आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात टिकणार नाही. तेव्हा सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यायला हवे. आज जे २७ टक्के आरक्षण ओबीसीला आहे, त्याला धक्का न लावता, त्याची मर्यादा वाढवून सरकारने संसदेत विशेष कायदा करून आरक्षणाची मर्यादा वाढवली पाहिजे. ज्याप्रकारे देशात सुरुवातीला कालेलकर आयोगाने २,३९९ जातींना आरक्षणासाठी योग्य म्हणून निवडले होते. त्यानंतर मंडल कमिशनने १,३४४ जातींची नव्याने निवड केली. ३,७४३ जातींना आरक्षणाचे लाभार्थी निवडले. मंडल कमिशनने १,३४४ जातींची ज्या आधारावर निवड केली तशीच आता मराठा समाजाची केली पाहिजे.

> **१ मे १९६० पूर्वी नागपूर विभाग मध्य प्रांतात, हैदराबाद प्रांतात मराठवाडा होता. खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात बॉम्बे स्टेट होते. १९६० नंतर स्थिती बदलली.**

राज्यघटनेतील ३४० व्या कलमात ओबीसींच्या आरक्षणासाठी आयोग नेमण्याची तरतूद केली. ३४१ वे कलम एसटीसाठी होते. या वर्गाच्या जाती निश्चित झाल्या होत्या. आरक्षण निश्चित झाले होते. ओबीसी आरक्षणासाठी आयोग स्थापन करण्यात यावा, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. त्यांनी सरकारवर दबाव आणला होता. घटनेत तरतूद असूनदेखील आयोग नेमण्यात येत नव्हता. ओबीसी आरक्षणासाठी आयोग नेमावा, तसेच हिंदू कोड बिल यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी १९५५ मध्ये पहिला कालेलकर आयोग नेमला. या आयोगाने दोन वर्षे अभ्यास करून ओबीसी प्रवर्गासाठी २,३९९ जाती निश्चित केल्या. कालेलकर आयोगाने शेती करणाऱ्या व गावाच्या आतील स्पृश्य जातीला आरक्षण द्यायचा निर्णय घेतला. मात्र, कालेलकर आयोग लागू झाला नाही. कारण, या आयोगानेच अशा प्रकारचे विशेष आरक्षण लागू केल्याने समाजात फूट पडू शकते, असे पत्र सरकारला दिले होते. त्यामुळे पंडित नेहरूंनी ओबीसी आरक्षण लागू केले नाही.

महाराष्ट्रात १९६० च्या दरम्यान १० टक्के ओबीसींना आरक्षण दिले. तमिळनाडूत तर एस.सी., एस.टी. व ओबीसी मिळून ६९ टक्के होते. १९६४ मध्ये आरक्षणामुळे गुणवत्तेवर अन्याय होतो म्हणून एक कोर्ट केस झाली. या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश गजेंद्र गडकर यांनी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वरती करू नये असा निकाल दिला होता. महाराष्ट्रात तर १० टक्केच आरक्षण होते. पुढे हे असेच चालू राहिले. या काळात काँग्रेस विरुद्ध जनता पार्टी असे चित्र होते.

आणीबाणीनंतर मोरारजी देसाई सत्तेत आले. त्यांनी कालेलकर आयोग कालबाह्य झाल्याचे कारण सांगून ओबीसींसाठी मंडल आयोगाची नेमणूक केली. मात्र, मंडल आयोगाने नव्याने काम न करता कालेलकर आयोगाचा आधार घेतला. त्यांनी ओबीसी प्रवर्गात १३०० जाती नव्याने समाविष्ट केल्या. त्यामुळे ओबीसीत ३७४३ जाती झाल्या.

१ मे १९६० पूर्वी नागपूर विभाग मध्य प्रांतात, हैदराबाद प्रांतात मराठवाडा होता. खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात बॉम्बे स्टेट होते. १९६० नंतर स्थिती बदलली. सर्वसाधारणपणे या दरम्यानच्या काळात बहुसंख्य लोकांच्या नोंदी कुणबीच आहेत. मंडलचा जो अहवाल आला त्यात मात्र नव्या जाती आल्या, मराठा जातीचा उल्लेखच नव्हता. मंडल कमिशनने जाती निश्चित झाल्या, त्यामध्ये कुणबी आहे. मात्र, मराठा जात नाही. कारण मराठा हा समूहवाचक, प्रदेशवाचक आहे. मराठा जात नाही. मराठा महाराष्ट्राला पर्यायी शब्द म्हणून येतो. जाती या व्यवसायानुसार निश्चित झाल्या आहेत.

मराठा व कुणबी या दोन्ही जाती एकच असल्याचे ऐतिहासिक दस्तऐवज, गॅझेट जिल्हानिहाय उपलब्ध आहेत. दरम्यान, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रबोधनाने विदर्भात ९०, खानदेशात ८० टक्क्यांपेक्षा जास्त लोक कुणबी दिसतात. सध्या ओबीसीचा लाभ कुणबीला होतो; मात्र मराठ्यांना होत नाही. म्हणून महाराष्ट्रात १९९७ मध्ये खत्री आयोग नेमला. या आयोगाने २००४ मध्ये दिलेल्या अहवालानुसार, तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी अध्यादेश काढून मराठा-कुणबी, कुणबी मराठा व लेवा पाटील या जातींचा समावेश ओबीसीत केला. मराठा व कुणबी या जातीचा उल्लेख एकत्र असल्याने मराठ्यांना देखील ओबीसीचे आरक्षण मिळाले पाहिजे. मात्र, मराठा वेगळा व कुणबी वेगळी अशा दोन जाती असल्याचे सांगून मराठ्यांना ओबीसीचा दाखला मिळत नाहीत. शासनाने मराठा-कुणबी व कुणबी-मराठा असा उल्लेख करण्यामागचा हेतू स्पष्ट करावा.

छत्रपती शाहू महाराज यांनी २६ जुलै १९०२ मध्ये ब्राह्मण, कायस्थ, शेन्वी पार्शी या त्या काळातील पुढारलेल्या जाती सोडून अन्य जातींना आरक्षण दिले. यामध्ये आताचे एस.सी., एस.टी., जैन व मुस्लिमांना जवळपास ५० टक्के आरक्षणाची तरतूद केली.

कालेलकर आयोगाने १९५३ मध्ये मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ द्यावा, असे सांगितले होते. मात्र, मंडल आयोगाने मराठा हा समूह म्हटल्याने जात आरक्षणातून त्याला वगळण्यात आले. मराठा आरक्षणाची प्रदीर्घ लढाई खऱ्या अर्थाने १९८१ नंतर सुरू झाली. कारण, मंडल आयोगाचा जो अहवाल आला तो तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वीकारला नाही. २२ मार्च १९८२ मध्ये बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री होते. त्यावेळी माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासह ११ विविध मागण्यांसाठी मुंबईत मोर्चा काढला. त्यावेळी एकही मागणी पूर्ण झाली नाही. अण्णासाहेब पाटील यांनी २३ मार्च १९८२ ला मध्यरात्री स्वत:ला गोळी झाडून आपल्या प्राणाची आहुती दिली.

सध्या ओबीसींना ५२ टक्के आरक्षण आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्या. गजेंद्र गडकर यांच्या आदेशाचा आधार ५० टक्के आरक्षण मर्यादेचा घेतला तर ओबीसींना २७ टक्केच आरक्षण मिळते. त्यामुळे देशस्तरावर ओबीसींना २५ टक्के आरक्षण कमी मिळते. देशात ३७४३ जाती ओबीसींमध्ये आहेत. महाराष्ट्रात ३७० ते ३८० जाती ओबीसीत आहेत. मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसीतून आरक्षण द्यायचे झाल्यास या ओबीसी जाती संघटित झाल्या आहेत. आघाडी सरकारच्या काळात नारायण राणे समितीने मराठा समाजाला शैक्षणिक व सामाजिक विशेष मागासवर्ग म्हणून १६ टक्के आरक्षणाचा निर्णय झाला. या आरक्षणाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, आजच्या परिस्थितीत मराठा समाजाला आरक्षण द्यायचे झाल्यास तर मागास आयोगाने मराठा समाज मागास असल्याचे सिद्ध करावे लागेल. मराठा समाज शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे सिद्ध झालेले आहे. कारण, इयत्ता दहावीतून शाळा सोडल्याचे प्रमाण मराठा समाजात मोठ्या प्रमाणावर आहे. उच्च शिक्षणासाठीही कमी जातात, हेही सिद्ध झालेले आहे. आता सामाजिक मागासपणा सिद्ध करण्यासाठी मंडल कमिशनने लावलेले १३ निकष आहेत. या १३ पैकी ११ निकष मराठा समाजाच्या बाबतीत पूर्ण आहेत. मंडल कमिशनच्या वेळी आरक्षणासाठी जे सर्वेक्षण जालना व बीड जिल्ह्यात झाले. त्या जिल्ह्यांत मराठा समाजाने सर्व निकष पूर्ण केलेले आहेत, तरीही मराठा समाजाला सरकार आरक्षण का देत नाही? ज्या छत्रपती शाहू महाराज या मराठा राजाने आरक्षणाची सुरुवात केली, त्याच प्रेरणेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेतून मागासलेल्या समाजाला पुढे नेण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली. मात्र, सध्या राजकीय हेतूने मराठा समाजाला जातीयवादी सरकार आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे काम करत आहे.

मराठा समाजात असंख्य प्रश्न आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५ सप्टेंबरला आयोगाचा पूर्ण अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. या अहवालात मराठा समाजाला आरक्षण देता येईल की नाही हे स्पष्ट होईल. कारण सामाजिक मागासलेपण सिद्ध करणे बंधनकारक आहे. मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाचे ५८ मूक मोर्चे पाहिलेले आहेत. त्याला तीन कोटी मराठा समाज शांततामय मार्गाने रस्त्यावर उतरला होता. मात्र, आता आंदोलन हिंसक झालेले होते. त्यामुळे न्याय द्यायचा असेल तर न्यायालयीन प्रक्रिया गतिमान करावी लागेल. फक्त वेळकाढूपणा चालल्याचे दिसून येत आहे. कारण, आयोग सरकारनेच नेमलेला आहे. न्याय उशिरा मिळणे म्हणजे न्याय न मिळाल्यासारखेच आहे. आतापर्यंत मराठा समाजातील चार पिढ्यांचे नुकसान आरक्षण न दिल्यामुळे झाले. घटनात्मक, कायदेशीर न्यायप्रक्रियेतून मराठा समाज हा ओबीसी सिद्ध होतो. तो कुणबी सिद्ध होते. मात्र, ५२ टक्के ओबीसींच्या विरोधात कोणत्याही सरकारला जाणे शक्य नाही म्हणून आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत वाढविणे गरजेचे असल्याचे आहे.

***





**– अण्णासाहेब डांगे,**
**माजी मंत्री**

# धनगर आरक्षणाचे राजकारण होतेय

धनगर समाजाला राज्यघटनेत अनुसूचित जमातीचे आरक्षण दिलेलेच आहे. आता फक्त त्याच्या अंमलबजावणीचा आग्रह आहे. विद्यमान सरकार, राज्यकर्ते आश्वासने देत आहेत; पण करत काहीच नाहीत. आरक्षणाचा प्रश्न तसाच ठेवून धनगर समाजाची गेल्या ६०-७० वर्षांपासून दिशाभूल केली जात आहे.

राज्यघटनेत मागासवर्गाचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अन्य मागासवर्गीय असे तीन भाग करून त्यांना निरनिराळ्या सवलती आरक्षित केल्या. या तीन प्रकारांत कोणती जात-जमात कोणत्या वर्गात समाविष्ट आहे हे दर्शविणारी तीन परिशिष्टे घटनेत जोडली आहेत. यातील परिशिष्ट नंबर दोन(अनुसूचित जमातीची यादी)मध्ये छत्तीस क्रमांकावर 'ओरान' आणि 'धनगड' या जातींचा उल्लेख आहे. यातील 'धनगड' म्हणजेच धनगर होय. भारताची घटना इंग्रजी व हिंदीत लिहिली आहे. भाषाशास्त्रानुसार जसे ताकारी यांचे ताकाडी, जाखरचे जाखड, गुरगावचे गुडगाव होते तसेच धनगरचे 'धनगड' झालेले आहे.

परंतु, धनगर व 'धनगड' नावाच्या वेगवेगळ्या जमाती आहेत. घटनेच्या परिशिष्ट दोनमध्ये छत्तीस क्रमांकावरचा उल्लेख 'धनगड' असा आहे, धनगर असा नाही, असे तर्कट करून तत्कालीन राज्यकर्त्यांनी धनगर समाजाचे आरक्षण नाकारले. अज्ञान, दारिद्र्य, उपेक्षेचे जीवन जगणाऱ्या धनगर समाजाच्या विकासाच्या मार्गात धोंड निर्माण केली. वास्तविक 'धनगर' आणि 'धनगड' हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत हे न समजण्याएवढे तत्कालीन राज्यकर्ते अज्ञानी होते का? 'धनगड' नावाची वेगळी जमात महाराष्ट्रात नसताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातील मागास जमातीच्या यादीत 'धनगड' जमातीचा समावेश केला तो कुणाचा आहे? तो धनगरांचाच व धनगरांसाठीच आहे. डॉ. बाबासाहेबांना महाराष्ट्राची सामाजिक स्थिती पूर्ण माहिती होती. त्यांनी जाणीवपूर्वक धनगर समाजाचे मागासलेपण लक्षात घेऊन ती जात सुधारून इतर प्रगत समाजाबरोबर आली पाहिजे, या जाणिवेनेच अनुसूचित जमातीच्या यादीत धनगरांचा समावेश केलेला असताना 'र' आणि 'ड' अशी खुसपट काढून धनगर समाजाच्या डोक्यात अन्यायाची कुऱ्हाड मारली आहे.

अन्य कुठल्याही घटकावर अन्याय झाला असता तर तो समाज पेटून उठला असता, आंदोलन केले असते; पण धनगर समाजाने १९५६ मध्ये आंदोलन केले नाही. याचे कारण आरक्षणाचा अर्थ, त्याचे फायदे इत्यादी बाबी समजण्याची त्याची कुवतच नव्हती. त्यामुळेच तर राज्यकर्त्यांना धनगरांची शिकार करण्याची संधी लाभली. धनगर समाजातील काहींना आपल्यावरील अन्यायाची अर्धवट जाणीव वीस वर्षांनंतर झाली. १९७५ ते ७७ च्या सुमारास तत्कालीन राज्यकर्त्यांमागे त्यांनी तगादा लावला. आरक्षणामुळे जाती, जमाती सुधारू लागल्या. आम्हाला आरक्षण नाही, आम्ही मागे राहू लागलो आहोत, इतरांबरोबर येण्यासाठी आमचा अनुसूचित जमातीत समावेश करा, अशी मागणी झाली. त्यावर निवडणुकीपूर्वी करू म्हणून सरकारने




धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे १९७७ मध्ये केली. निवडणूक झाल्यावर ती मागे घेतली किंवा केंद्र सरकारने ती परत पाठवली.

देशाच्या राजकारणात १९७७ मध्ये उलथापालथ झाली. अनेक वर्षे सत्तेवर असलेल्यांचे सरकार गेले. आवळ्याची मोट बांधलेले जनता पक्षाचे सरकार आले. नंतर धनगर समाजातील काहींना थोडीफार जाग आली. परंतु, अभ्यास न करता धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करा, ही चुकीची मागणी वारंवार होत गेली. सरकार ती फेटाळत गेले. १९९२ मध्ये आम्ही धनगर समाज महासंघ उभा करून समाजाच्या समस्या, प्रश्न याचा अभ्यास केला. तेव्हा लक्षात आले की, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी चुकीची आहे. समाजाचा अनुसूचित जमातीत नव्याने समावेश करायचा नसून, तो घटनेत अगोदरच केलेला आहे. त्याच्या अंमलबजावणीची मागणी करायला हवी.

आम्ही समाजात जागृती करीत होतो. परंतु, समाजात एकसंधपणा येत नव्हता. सगळे एका व्यासपीठावर येत नव्हते. २००४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या निमित्ताने निरनिराळ्या पक्षांनी जाहीरनामे प्रसिद्ध केले. धनगर समाजाला घटनेने आरक्षण दिले आहे ते आमचा पक्ष सत्तेवर आल्यावर लागू करील, असा मजकूर समाविष्ट करण्याचे आमच्या संघटनेने सूचित केले. त्याला थोडेफार यश आले. याचा परिणाम असा झाला की, धनगर समाजाचे नेते म्हणवून घेणारेही धनगर समाजाला घटनेने दिलेले आरक्षण त्वरित लागू करण्याची मागणी करू लागले.

लोकसभेच्या २०१४ मध्ये निवडणुका झाल्या. त्यात नरेंद्र मोदींना अभूतपूर्व यश मिळाले. साठ वर्षांनंतर केंद्रीय सत्तेत परिवर्तन होऊन ते देशाचे पंतप्रधान झाले. यामुळे सर्व पक्षांचे डोळे खाड्कन उघडले. आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने जनमत संग्रह करायला सर्वांनी सुरुवात केली. याचाच भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी १६ जून २०१४ रोजी मुंबईत राष्ट्रवादी भवनात धनगर समाजाचे सर्व आमदार व सर्व संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावून आरक्षण प्रश्नांवर प्रदीर्घ चर्चा केली. हीच बैठक दुसऱ्या दिवशी म्हणजे १७ जूनला पुढे चालवून संबंधित शासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर सर्वानुमते असे ठरले की, धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत आयोग नेमायचा. थोड्या दिवसांची मुदत देऊन 'धनगड' आणि 'धनगर' दोन्ही शब्द एकार्थी आहेत, असा निर्णय करून घेऊन ३१ जुलै २०१४ च्या आत धनगर समाजाला आरक्षण जाहीर करायला सरकारला भाग पाडायचे.

सगळ्या कार्यकर्त्यांत आनंदाचे वातावरण असतानाच दुधात मिठाचा खडा पडावा तसे झाले. काही राजकीय पुढाऱ्यांच्या प्रोत्साहनाने माळशिरस येथे काही कार्यकर्ते म्हणवणाऱ्यांची (जे आरक्षणांच्या लढ्यात फारसे कुठे पुढे आले नव्हते.) बैठक झाली. त्यात असा विषय मांडला गेला की, धनगर समाजाचे आरक्षण हे पवार आणि अजित पवार यांनीच रोखले आहे. त्यांच्या विरोधात मोर्चा न्यायचा. पंढरपूर ते बारामती असा मोर्चा काढण्याचा निर्णय झाला. वास्तविक, या मोर्चाची दाखल घ्यावी असे वरिष्ठ शासकीय केंद्र बारामतीत नसताना पवार, अजित पवारांच्या गावातच अशी भूमिका न घेता १५ जुलै २०१४ पासून पंढरपूर ते बारामती मोर्चा सुरू झाला. बारामतीत गेल्यावर बैठा सत्याग्रह करायची भूमिका नेत्यांनी घेतली. समाजाचे क्रांतिकारक पाऊल पडत आहे, आता आपला आरक्षणाचा प्रश्न सुटणार या भावनेने गावागावांतून समाजबांधव बारामतीकडे धावू लागले. परंतु, तेथे शरद पवार आणि अजित पवार त्यांच्या विरोधात मोर्चा काढून त्यांना अपशब्द वापरले. त्यांच्या विरोधात काही वेडपट धनगर पुढाऱ्यांनी भाषणे केली. त्यामुळे पवारसाहेब नाराज झाले व या प्रकरणातून बाहेर पडले. धनगर पुढाऱ्यांनी पवारांवर तोंडसुख घेणे एवढाच कार्यक्रम तेथे सुरू ठेवला. या प्रकारामुळे शरद पवार उद्विग्न होणे साहजिकच होते. त्यांनी या विषयातून अंगच काढून घेतले. ३१ जुलैच्या आत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा विचार मागे पडला. समाजाच्या तथाकथित नेत्यांनी गुणांची उधळण करून आपल्याच समाजाला असे अडचणीत टाकले. या बारामतीतील मोर्चाच्या समारोपास विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेले होते. त्यांनी आमचे सरकार आल्यास आठ दिवसांच्या आत धनगर समाजाला आरक्षण देऊ, असे आश्वासन दिले. मात्र, फडणवीसांचे सरकार येऊन तीन वर्षे झाली तरीही आरक्षणाचा प्रश्न सोडवलेला नाही. केवळ दिशाभूल करण्याच्या उद्देशाने, फसवण्याच्या हेतूने काहीही घटनात्मक दर्जा नसलेल्या टाटा कन्सल्टन्सीकडे प्रकरण सोपवून, नको तो उद्योग चालू केला आहे. धनगर समाजाला आरक्षण द्यायचे असते तर ११ डिसेंबर २०१७ पासून सुरू होणाऱ्या नागपूर अधिवेशनातच केंद्र शासनाकडे शिफारस केल्याचे जाहीर करून करावी लागेल. तरच केंद्र सरकारकडून त्याला मान्यता मिळून धनगर समाजाच्या पदरात आरक्षण पडेल. राज्य सरकार हा विषय जेवढा लांबणीवर टाकेल तेवढे केंद्रास निर्णय देणे अडचणीचे होणार आहे. धनगर आरक्षणाला विरोध करणारे काही घटक न्यायालयात जाऊन सरकारच्या निर्णयाला आव्हान देण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या सर्व अडचणींतून धनगर समाजाला आरक्षण मिळायचे असेल तर सरकारने आताच अत्यंत जलद पाऊल उचलण्याची गरज आहे. नाहीतर सरकारने धनगर समाजाला आरक्षण देण्याची केंद्र सरकारकडे शिफारस केली, मते उपटली आणि धनगर समाजाच्या पदरात मात्र काहीच पडले नाही असे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

***



– वाहरू सोनवणे,
नंदुरबार




# मूळ ओबीसींना आरक्षणाचा लाभ नाहीच

भारतातील आदिवासी समाज आज देशातील एकूणच विकासाच्या प्रक्रियेपासून मोठ्या प्रमाणात मागे राहिला आहे. देशातील सत्ताधारी व्यवस्थेपासून ते पुरातन काळातील इतिहासाकडे पाहिल्यास आदिवासी समाजावर कायमच मोठ्या प्रमाणात अन्याय झालेला आहे. ठराविक व्यवस्थेकडून तो जाणीवपूर्वक केला गेला आहे. कधी एकलव्याचा अंगठा कापून घेतला तर कधी इंग्रजांनी आदिवासींच्या हक्काचे जल, जमीन, जंगल कायदा करूनच हिसकावून घेतले आहे. स्वातंत्र्यानंतर सरकार विकासाच्या नावाखाली, रोड कॅरिडोरच्या नावाखाली आदिवासींना उद्ध्वस्त करत आहे. आहे ती जमीन लुबाडत आहे. त्यांच्या रोडचा कॅरिडोरचा रस्ता आदिवासींच्या जमिनी गिळूनच पुढे जात आहे. हे सारे वातावरण चिंताजनक आहे. ज्या काळात देशाच्या स्वातंत्र्याची लढाई लढली जात होती तेव्हा या लढाईत आदिवासी समाज मोठ्या ताकदीने इंग्रजांच्या विरोधात लढला. तो इंग्रजांच्या विरोधात लढला म्हणून इंग्रज ताकदीने विरोधात गेले. इंग्रजांबरोबरच तो देशातील शेटजी, भटजी, सावकार यांच्या विरोधात लढला म्हणून तो स्वातंत्र्यानंतर शिक्षण, नोकरी, व्यवसायापासून दूर केला गेला आहे. या संपूर्ण पृथ्वीवरच आदिवासी माणूस हा प्रथम निवासी आहे. ते जेव्हा जल, जमीन, जंगल यांच्या पूर्णपणे सान्निध्यात होते तेव्हा त्यांच्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर समानता होती, आपुलकी होती, भाईचारा होता. जशी जगाने विकास नावाची हाक देऊन संपत्तीची उत्पत्ती केली तशी स्वार्थी माणसे बनत गेली आहेत. जातिभेद, वर्णव्यवस्था, भांडवलशाही, स्वार्थ वाढला आहे. विषमतेचे मूळ ज्या संपत्तीत आहे ती एका वर्गाच्या ताब्यात आहे. ती समान स्वरूपात असायला हवी. आरक्षण सर्वांना समान दर्जा, वागणूक व संधी मिळावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेतून मिळवून दिले आहे. आदिवासी समाजाला खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेबांनी घटनात्मकरीत्या आरक्षण देऊन न्याय दिला आहे. मात्र दुर्दैवाने मूळ आदिवासी समाजाला घटनेने दिलेले आरक्षण, सरकारने आदिवासी समाजासाठी राबवलेली धोरणे, योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत

नाहीत. स्वातंत्र्यलढ्यापासून आदिवासी वेगवेगळ्या ठिकाणी डावलले गेले आहेत. ते आरक्षणाच्या लाभापासूनही डावलले गेले आहेत. सरकार नावाची यंत्रणा मानवकेंद्रित विकासाची धोरणे न राबवता व्यक्तिकेंद्रित, जातकेंद्रित आणि मत देणाऱ्यांच्या बाजूने सर्व विकास आराखडे आखत आहेत. त्यांच्या बाजूने योजना आखत आहेत. समूह केंद्रित विकास आणि त्याची अंमलबजावणी जाणीवपूर्वक केली जात नाही. यामुळे आदिवासी समाज आजही विकासापासून वंचित आहे. सरकार आदिवासी समाजाच्या मोठ्या घोषणा करते. मात्र, प्रत्यक्षात मूळ आदिवासींपर्यंत काहीच येत नाही. आरक्षण तर असून नसल्यासारखेच आहे. आरक्षण मिळते म्हणून अनेक प्रस्थापित जाती बोगस आदिवासींची प्रमाणपत्रे घेऊन आदिवासींच्या योजना लुबाडत आहेत. भारतीय राज्यघटनेत जे दिसते ते आदिवासींच्या हातात न त्याच्या बरोबरीने येते. मधले बोगस आदिवासी त्याचे फायदे लाटतात. अगदी घरकुले पळवण्यापासून रेशन दुकानावरचा शिधा पळविण्यापर्यंत, नोकरी पळवण्यापासून बँकांच्या सवलती पळवण्यापर्यंत यात काही नेते व जाती पुढे आहेत. ज्याच्या परंपरा, संस्कृती, लग्न, व्यवहार पूर्णपणे आदिवासी समाजापेक्षा वेगळे आहेत ते लोक आदिवासींचे फायदे घेऊन मोकळे आहेत. आदिवासी समाजाला पाहिजे त्या प्रमाणात सवलती मिळत नाहीत. त्यांच्यासाठी काही सवलती आहेत याची त्यांना बहुतेक वेळा कल्पनाच नसते. घटनेने त्यांना काही अधिकार दिले आहेत; मात्र त्याची त्यांना जाणीव नाही. अधिकारांची माहिती नाही. त्यामुळे त्यांच्या प्रबोधनावर जास्त काम करणे महत्त्वाचे आहे. त्यांना उच्च व दर्जेदार शिक्षण मिळणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेबांनी घटनेत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा आग्रह केला असला तरी त्याचा फायदा आमच्यापर्यंत येत नाही. त्यामुळे सरकारने शिक्षणावर अधिक भर द्यायला हवा. शिक्षणाशिवाय आदिवासी समाजाला पर्याय नाही. आज सरकार आदिवासींना दुय्यम वागणूक देत आहे म्हणून त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत नाही. आदिवासींच्या हक्काचा रोजगार पळवला आहे. घरासाठी लागणाऱ्या काठ्यादेखील सरकार घेऊ देत नाही. फळे, फुले यांच्यावर सरकारच ताबा घेऊन आहे. आदिवासी समाजाला मुळात सरकार आणि त्याची नीती धोरणे समजत नसल्याने, त्यांच्या वतीने कोणी आवाज उठवत नसल्याने पुढारी लोक त्यांच्या योजनांत प्रचंड मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करत आहेत.

सरकार त्यांच्यासाठीच्या राखीव निधीची पळवापळवी करत आहे. मतावर डोळा ठेवून घोषणा होते. मात्र, घोषणेनंतर त्याच आदिवासींच्या जमिनीतून रस्ता मंजूर झालेला असतो अशी परिस्थिती आहे. तरुणांच्या बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. शेतकरी, भूमिहीन मजूर, सुशिक्षित तरुण आज मोठ्या संख्येने बेकार आहेत. त्यांचे जीवन अंधःकारमय आहे. जमीन नसल्याने त्यांचे जीवन जगण्याचे साधन हिसकावले आहे. कागदावर योजना आरक्षण लाटण्यासाठी आदिवासी झालेले लोक आमचे नेते मिरवत असून, ते समाजापेक्षा आपल्या राजकीय पक्षाला अधिक बांधिल आहेत. ते उच्चपदस्थ आणि उच्च जातीयांसाठी अधिक प्रामाणिक आहेत. त्यामुळे ते आदिवासींच्या बाजूने एक भूमिका घेऊन काम करत नाहीत. त्यामुळे या समाजाच्या प्रश्नांचे स्वरूप रोजच वाढत आहे. तरुणांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत आहे. सर्वांत जास्त कुपोषण आदिवासी बालकांत आहे. ज्याच्या जंगलातील फळे मालकीची होती



तेच आता सरकार परके असल्यासारखे वागवते म्हणून जंगलाबाहेर आहे. आमचीच जमीन बळकावून आम्हाला जमीन देण्याचे आश्वासन देत आहे. या सर्व परिस्थितीत डॉ. बाबासाहेबांनी 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा जो मूलमंत्र दिला आहे त्याचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. शिक्षण म्हणजे केवळ डिग्री मिळवणे नव्हे तर समाजाच्या प्रश्नांना समजून घेणे, स्वत:च्या फायद्यासाठी संघटित न होता समाजाच्या फायद्यासाठी संघटित होणे व गरिबांच्या प्रश्नासाठी, समतेसाठी संघर्ष करणे महत्त्वाचे आहे. आज ते होताना दिसत नाही. आज सरकार विचारांची उंची वाढवण्यावर विश्वास ठेवत नाही तर पुतळ्यांची उंची वाढवण्यावर भर देत आहे. ज्या गुजरातमध्ये सरदार वल्लभभाई पटेलांचा पुतळा उभारला गेला, त्या पुतळ्यासाठी सात आदिवासींची गावे उद्ध्वस्त केली आहेत. त्या सर्वांना बेघर केले आहे. त्यांच्या रोजगाराचे, जगण्याचे साधन लुबाडले आहे. त्याचा विचार मात्र कोणीही केलेला नाही. अशावेळी सर्वांचाच विचार होणे महत्त्वाचे आहे. आदिवासी समाजाला आरक्षण किती मिळाले? त्यांना किती त्याचा लाभ मिळाला? त्यांच्यासाठी सरकारने कोणती नीती राबवली? कोणते धोरण आखले आणि वास्तवात त्याचा काय फायदा झाला याची उत्तरे सरकारी यंत्रणा त्यांच्या सोयीने देत असते. पण वस्तुस्थिती विचारात घेतली तर स्पष्टपणे जाणवते की, मूळ आदिवासी आजही विकासापासून, सरकारच्या योजनेपासून, आर्थिक लाभापासून, शिक्षणापासून वंचित आहे. त्यांना त्यांचा मूळ हक्क मिळवण्यासाठी स्वतंत्र कायदे व त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यांच्या हक्काचे आरक्षण व सामाजिक, सांस्कृतिक संघटन मिळणे महत्त्वाचे आहे. बोगस आदिवासी बाहेर काढणे, पुढारी बाजूला सारणे गरजेचे आहे तरच घटनेतील आदिवासींचे हक्क त्यांना मिळतील; अन्यथा ते कायम दबावात, भीतीच्या वातावरणात व अज्ञानी रूढी-परंपरा यात अडकून राहतील.

***

# फोटो ओळखा स्पर्धेस वाचकांचा उदंड प्रतिसाद

लंडन येथे १२ नोव्हेंबर १९३० ते २९ जानेवारी १९३१ दरम्यान पार पडलेल्या गोलमेज परिषदेतील एक अत्यंत दुर्मिळ अशा व्यंगचित्रावर आधारित 'द पीपल्स पोस्ट'ने घेतलेल्या पोस्टने घेतलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'फोटो ओळखा' स्पर्धेस वाचकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. राज्यभरातील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यातील पहिल्या पाच स्पर्धकांची विजेते म्हणून निवड करण्यात आली आहे.

फोटो ओळखा स्पर्धेत गोलमेज परिषदेतील राउंडटेबलदरम्यानचे व्यंगचित्र प्रसिद्ध करण्यात आले होते. या व्यंगचित्रात प्रत्येक सहभागी प्रतिनिधीला एक क्रमांक देण्यात आला होता. त्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रमांक कोणता हे वाचकांना ओळखायचे होते. विश्वजित मच्छिंद्र खांडेकर (बुलडाणा), प्रकाश वानखेडे (नागपूर), दीप्ती बनसोड (चंद्रपूर), अनिकेत लोणारे (भंडारा), अविनाश उचित (नाशिक) या पहिल्या पाच स्पर्धकांनी सर्वांत प्रथम आणि अचूक उत्तर दिले. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७७ क्रमांक होता हे उत्तर बरोबर आहे.)

स्पर्धेचे संयोजक म्हणून नागसेन बागडे यांनी जबाबदारी पार पाडली. दरम्यान, सर्व विजेत्या स्पर्धकांना बक्षिसांची रक्कम पाठविली जात आहे.

**- संपादक**

**विजेत्यांचे अभिनंदन**


अविनाश उचित
नाशिक


दिप्ती बनसोड
चंद्रपूर


विश्वजित खांडेकर
बुलढाणा


अनिकेत लोनारे
भंडारा


प्रसिद्ध केलेल्या या व्यंगचित्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रमांक ७७ आहे



# मराठीतील उत्तुंग प्रतिभाशिखर

मराठी साहित्यप्रांतात प्रतिभेची अनेक छोटी-मोठी शिखरे आहेत; परंतु यशवंत मनोहर नावाचे शिखर आपल्या बुद्धिवैभवाने, भाषासौंदर्याने व प्रतिभासामर्थ्याने अधिक उत्तुंग, आकर्षक व लक्षवेधी ठरले आहे. हे प्रतिभाशिखर केवळ उत्तुंगच नाही तर त्यावर विचारसौंदर्याची मोहक फुले फुलली आहेत आणि या फुलांतून माणुसकीचा सुगंध अखंड दरवळत असल्यामुळे हे प्रतिभाशिखर अधिकच पृथगात्म, चित्तवेधक व लक्षणीय ठरणारे आहे. या प्रतिभाशिखराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हे जितके उत्तुंग आहे तितकेच व्यापकही आहे. या व्याप्तीत मनुष्य जीवनाचे सर्वांगीण सौंदर्य सामावलेले आहे. समग्र मानवी जीवनाच्या हितकारकतेला आपल्यात सामावून घेण्याचे सामर्थ्य या प्रतिभाशिखरात एकवटले आहे. म्हणूनच डॉ. यशवंत मनोहर हे नाव मराठी साहित्याच्या नभांगणात ध्रुवताऱ्यासारखे अढळ आहे. यशवंत मनोहर १९७७ मध्ये 'उत्थानगुंफा' घेऊन मराठी साहित्यप्रांतात दाखल झाले. त्यांचे हे दाखल होणेच मराठी साहित्यात दखलपात्र ठरले. त्यांच्या 'उत्थानगुंफे'तील विद्रोही विजांनी, विचारातील वादळांनी, शब्दांतील ज्वालांनी आणि आशयातील गडगडाटाने मराठी साहित्यातील अवघे प्रतिभामंडळ चकित झाले. 'उत्थानगुंफे'तील आंतर्बाह्य झपाटून टाकणारी कविता वाचून अनेक मान्यवरांनी 'ज्वालांना स्वत:चे स्वतंत्र आकृतिबंध असतात हे मान्य केले'. बाबूराव बागूलांनी 'ही कविता अंगावर अग्नीचे अलंकारल्याली आहे. तिच्या हातात वादळ आणि वणवे आहेत' अशी या कवितेची प्रखरता वर्णन केली. प्रा. नरहर कुरुंदकरांनी या कवितेसंबंधी 'हे अग्निनृत्यही मोठे स्तिमित करणारे आहे' असा या कवितेसंबंधी विस्मयचकित भाव व्यक्त केला. तर रा. ग. जाधव यांनी 'या कवितेमुळे उत्कंठित मनही काहीसे हादरले' अशी प्रस्थापित मराठी साहित्याची या कवितेसंबंधीची प्रातिनिधिक प्रतिक्रिया नोंदविली. एकूणच यशवंत मनोहर यांचे मराठी साहित्यप्रांतात दाखल होणे वादळी ठरले. असे हे मराठी साहित्यावकाशात घोंगवणारे वादळ आजही या व्यवस्थेतील विषमतेची, शोषणाची, अमानुषतेची व अविवेकाची निर्दयपणे मोडतोड करत, माणसातील माणुसकी जागवत समाजमनावर धडका देत आहे. कारण या प्रज्ञेचे, या प्रतिभेचे तळागाळातील माणसाशी अतूट - अभंग असे नाते आहे. तळागाळातील शोषित, पीडित व उपेक्षित माणसाच्या रक्षणासाठी ही प्रतिभा आपला जीव जाळते आहे. आकांत करते आहे. ही प्रतिभा मानवमुक्तीच्या लढ्यात सेनापतीची भूमिका घेऊन लढते आहे. या प्रतिभेचे लढणे एकांगी नाही. एकाचवेळी ही प्रतिभा कविता, कादंबरी, पत्रलेखन, ललितगद्य, समीक्षालेखन, प्रवासवर्णन, वैचारिक निबंधलेखन, भाषण या सर्व आघाड्यांवर विजयी पताका फडकावित, आपल्या पृथगात्मतेच्या पाऊलखुणा उमटवित वादळी आवेगाने पुढे गेली आहे. याचे कारण या प्रतिभेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञेशी-प्रज्ञासूर्याशी जन्मदत्त नाते आहे. या प्रतिभेच्या अंगी असलेले समष्टीभान आणि तळागाळातील शोषित, पीडितांविषयीची जाणही डॉ. बाबासाहेबांच्या क्रांतदर्शी तत्त्वज्ञानाचे अनुसरणच आहे.

कवी-कलावंतांची अथवा विचारवंतांची जीवनदृष्टी संकुचित व चाकोरीबद्ध असली की,

त्याच्या कलाभिव्यक्तीला तसेच विचाराभिव्यक्तीला मर्यादा पडतात. एकच एक भावना किंवा एकच एक विचार त्याच त्या कलाप्रकारातून अथवा विचार सूत्रातून अभिव्यक्त होत राहतो. परंतु जीवनदृष्टी जर उदात्त, व्यापक, निकोप व प्रवाही असेल तर ती भावना अथवा विचार अभिव्यक्तीच्या वेगवेगळ्या वाटा धुंडाळते. जसे प्रवाही नदीवर बंधारे घालून, कालवे काढून, धरणे बांधून हवे तसे पाणी खेळवता येते आणि दूरवर हिरवळ फुलवता येते. परंतु विहिरीच्या बाबतीत हे सर्व संभवत नाही. याच न्यायाने आपण वाङ्मयविश्वाचा विचार केला तर हे अधिक स्पष्टपणे लक्षात येईल. यशवंत मनोहर यांच्या जीवनदृष्टीचा व वाङ्मयसृष्टीचा पाया आंबेडकरवाद आहे. त्यामुळेच त्यांची जीवनविषयक भूमिका उदात्त, व्यापक, निकोप व प्रवाही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा इहवादी व समतावादी विचार आणि बुद्धाचे जडवादी व मानवतावादी तत्त्वज्ञान हे यशवंत मनोहर यांच्या जीवनविषयक भूमिकेचे तत्त्वाधिष्ठान आहे. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कलावंताच्या व विचारवंताच्या मनात दाटून आलेले भाव, विचारांचे कल्लोळ अभिव्यक्तीच्या वेगवेगळ्या वाटा धुंडाळत निरनिराळ्या वाङ्मयप्रकारातून व्यक्त झाले आहेत. यशवंत मनोहर हे मुळात कवी आहेत हे त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहातून 'उत्थानगुंफा'मधून (१९७७) सिद्ध झाले. त्यांचे आजतागायत एकूण अकरा कवितासंग्रह प्रकाशित झालेत. त्यांचा हा काव्यप्रवास आपण बारकाईने अभ्यासला तर त्यांची काव्यप्रतिभा उत्तरोत्तर अधिक व्यापक, अधिक प्रगल्भ, गंभीर व संयत होत गेलेली आपणास दिसते. कपटी चांडाळ ते आहेत. ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले, ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रूप विकास सिद्ध झाला त्यांचा मी जळजळीत निषेध करतो. ज्यांनी इथल्या सूर्याला, दगडांनाही ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले, संचित निश्चिंत केले त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो. कवीचे 'उत्थानगुंफा'मधून हरामखोर परंपरांवर विध्वंसाचा नांगर धरणे स्वाभाविक आणि अपरिहार्यच आहे. कारण हिंदू धर्मव्यवस्थेने इथला माणूस नागवला आहे. वर्णव्यवस्थेने पिचला आहे आणि जातिव्यवस्थेने इथल्या माणसाला अतोनात छळले आहे. येथील धर्मव्यवस्थेने व वर्णव्यवस्थेने बहुसंख्य लोकांना शूद्र व तुच्छ ठरवून येथील शूद्रातिशूद्रांचे व स्त्रियांचे अमानुष पद्धतीने शोषण, उत्पीडन केलेले आहे. कपट-कारस्थानी धर्मशास्त्राचा हवाला देऊन आणि देवा-धर्माची भीती दाखवून या विषमतावादी धर्मव्यवस्थेने त्यांना गुलाम केले आहे. म्हणून या गुलामगिरीविरुद्ध व दास्यत्वाविरुद्ध कवीने - 'माझा नारा इन्किलाब मी आभाळ मुठीत घेणार आहे. मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे'. असा मानवद्रोही व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारला आहे. ही कविता काव्यक्षेत्रात दाखल होताच तिने केवळ मराठी कवितेलाच नव्हे तर अखिल भारतीय कवितेला सनातन-पुरातन व्यवस्था विध्वंसाची दीक्षा दिली आहे. ही या कवितेची व कवीची उत्तुंगता भारतीय साहित्यात अद्वितीय आहे, हे येथे लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. यशवंत मनोहर यांचे 'उत्थानगुंफा'नंतरही अव्याहतपणे परंतु उल्लेखनीय स्वरूपाचे काव्यलेखन सुरू आहे. नंतरच्या काव्यलेखनातील शैलीचा आवेग आणि आवेश बदलला असला तरी आशयाच्यादृष्टीने ही कविता अधिक गहन-गंभीर आणि विचाराच्या पातळीवर अधिक संयत व खंबीर झालेली आहे हे आपल्या लक्षात येते. 'जीवनायन'मधून तर संयततेमध्येही किती सामर्थ्य असू शकते याचा प्रत्यय येतो. 'जागतील स्मशाने, उजेडाची रसद तिथे नीट नेली पाहिजे; चूल विझली नाही अजून, वस्तीने धीर धरला पाहिजे'.

ही 'जीवनायन'मधील ओशासकता प्रतिकूलतेतही परिवर्तनवादी चळवळीला दिशादर्शक ठरणारी आहे'.

**"हे असेच उरणार नाही,**
**नवे जगणे जागा घेईल**
**दाही दिशा गंभीर आहेत**
**नवीन जमीन रुजू होईल"**

हे आशादायी चित्र मनाने खचलेल्या माणसाला लढण्यास बळ देणारे आहे. नुकताच मौज प्रकाशनगृहाने प्रकाशित केलेला यशवंत मनोहर यांचा 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' (२०१८) हा कवितासंग्रह तर देशाच्या विदारक वर्तमानस्थितीवर सडेतोड शब्दात निर्भीडपणे प्रहार करणारा आहे. मनाच्या स्वच्छंदी, मुक्त आकाशातच कविता जन्माला येते. किंबहुना स्वच्छंदतेचे व मुक्ततेचे दुसरे नावच कविता असते. परंतु आजच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय, वातावरणामुळे या मुक्त व स्वच्छंदी आकाशात दहशतीचे ढग दाटून येत आहेत. कवितेभोवती भीतीचे व दडपणाचे पहारे उभे केले जात आहेत. सृजनाचा आवाज दडपून टाकण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणून कवी - 'कवितेभोवती इतके हिंस्त्र दिवस कधीच जमा झाले नव्हते'. असे भयावह वर्तमान अधोरेखित करतो. तरीही कवी या दमनग्रस्त व्यवस्थेपुढे झुकत नाही. सत्तेच्या दबावापुढे वाकत नाही.

"सेक्युलॅरिझमला म्हणतो आम्ही भारतराष्ट्र! आणि संविधानाला मानतो आम्ही 'भारताचे लोक' निर्मिणारा राष्ट्रग्रंथ" ही संविधाननिष्ठाच कवीला जीवनविषयक बळ पुरविते आणि कवीच्या मनात विश्वबंधुत्वाचा भाव जागविते.

**'मी सेक्युलर भाऊ तुमचा**
**मी सेक्युलर स्वप्न जगाचे**
**दुनियेला वाटत उडतो**
**हे सेक्युलर काव्य युगाचे'**

भारतीय संविधानातील 'सेक्युलर' हा तत्त्वविचारच भारतातील सर्व नागरिकांना निर्मळ, नितळ व नीतिमान माणूस बनवू शकतो आणि या सेक्युलर तत्त्वाच्या माध्यमातून जगाशी विश्वबंधुत्वाचे नाते जोडू शकतो. 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' या कवितासंग्रहाच्या निमित्ताने आणखी काही महत्त्वपूर्ण व अर्थपूर्ण बाबी येथे लक्षात घेणे आवश्यक आहेत. देशाच्या केंद्रस्थानी धर्माभिमानी लोक सत्ताधारी असताना, लोकसंसदेचे संकेत झुगारून धर्मसंसदेचे गोडवे गाणाऱ्या, संविधानविरोधी व सेक्युलॅरिझमविरोधी वातावरण निर्मिणाऱ्या, सरंजामशाही व भांडवलशाहीला बळकटी देणाऱ्या सत्ताकाळात 'तुरुंग तोडणाऱ्या उठावाची कविता' २०१८ संग्रहरूपात प्रकाशित होणे ही अतिशय महत्त्वपूर्ण बाब आहे.

**शब्दांकन - प्रा. डॉ. मनोहर नाईक**

***



# महाराष्ट्रातील विषमतेचे विश्लेषण करणारा ग्रंथ

– डॉ. गौतम कांबळे


महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रांतील सर्व प्रकारच्या विषमता व ती दूर करण्याविषयीची सुचविलेली नवी धोरणे, हे या ग्रंथाचे मौलिक महत्त्व व योगदानसुद्धा आहे.

विकसित गणल्या गेलेल्या महाराष्ट्रातसुद्धा विषमता व गरिबी आहे. यामध्ये काही अधिक गरीब व काही कमी गरीब आहेत. समाजातील एकंदरीत विषमतेबद्दल लेखक भाष्य करतात, जे अत्यंत बोलके आहे. उदा. २०१३ मध्ये १० टक्के श्रीमंत कुटुंबांकडे ६८ टक्के संपत्ती होती, तर तळातील १० टक्के कुटुंबांकडे मात्र केवळ एक टक्काच संपत्ती होती. त्यामुळे गरिबाभिमुख धोरणाची गरज म्हणून लेखकांनी संपत्तीच्या पुनर्वाटपाची केलेली शिफारस ही क्रांतिकारक वाटत असली तरी ती रास्त व अत्यावश्यक आहे. विषमतेचे मोजमाप करताना लेखकांनी प्रतिव्यक्ती उत्पन्न, शिक्षणातील प्रवेश दर, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वीज, शिक्षण इत्यादी बाबी विचारात घेतल्या. त्यातील चिंताजनक विषमता सूक्ष्म आकडेवारीच्या आधारे स्पष्टपणे दाखवून दिली.

प्रादेशिक विषमता उत्पन्न, गरिबी, कुपोषण, शिक्षण व नागरी सुविधा या सगळ्या क्षेत्रात २०११-१२ मध्ये कोकण व पश्चिम महाराष्ट्रात सर्वांत कमी गरिबी म्हणजे ९ टक्के होती. ती खानदेश व विदर्भात सर्वाधिक म्हणजे २७ ते २९ टक्के दिसते. याच्या खालोखाल गरिबी मराठवाड्यात २२ टक्के आहे.

ग्रामीण भागात कोकणात ती सर्वाधिक ३५ टक्के तर खानदेशात ३३ टक्के व विदर्भात ३१ टक्के प्रमाण होते. सर्वांत कमी गरिबी पश्चिम महाराष्ट्रात म्हणजे १० टक्के होती. शहरी भागाचा विचार करता सर्वांत कमी गरिबी कोकणात असून, ती केवळ २ टक्के, त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असा चढता क्रम लागतो. लेखकांनी मांडलेल्या या वस्तुस्थितीमुळे तुलनेने विदर्भ कसा मागे आहे व निर्णायक उपाय म्हणून वेगळ्या विदर्भाच्या मागणीची भूमिका व आधार अधिक मजबूत होत जातात. हा ग्रंथ वाचून विभागीय विषमता संपुष्टात आणण्यासाठी विदर्भ वेगळा करणे हे देशाच्या विकासप्रक्रियेतील एक निर्णायक प्रारूप म्हणून उभे राहू शकते.

राज्यातील गरिबी व विषमता ही सांपत्तिक व जातीय भेदभाव यांचा साकल्याने व शृंखलेने झालेला




**या ग्रंथामधून तीन गोष्टी माहीत होतात.**

**१) महाराष्ट्रातील मानवी विकासामधली विषमता, ज्यामध्ये प्रामुख्याने उत्पन्न, गरिबी, कुपोषण, शिक्षण व नागरी सुविधा यांमधील विषमता ही महाराष्ट्राच्या पातळीवर पहिल्यांदा निदर्शनास आणून दिली.**

**२) समूहातील विषमता, जाती-जातीतील विषमता, धर्म-धर्मातील विषमता, स्त्री-पुरुषामधील विषमता, अल्पसंख्याक तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती हे दुर्लक्षित घटक विषमतेच्या विश्लेषणाचे भाग पहिल्यांदा प्रकाशात आणले गेलेत.**

**३) विभागीय विषमता यामध्ये उत्पन्न, गरिबी, कुपोषण, शिक्षण व नागरी सुविधा यांच्या विशेष संदर्भात महाराष्ट्रातील विषमता शोधून ती मांडली गेली.**

परिणाम आहे. जसे कच्चा माल खरेदी, तयार माल विक्री, रोजगार मिळणे, वेतन ठरविणे, सरकारी योजनांचा लाभ इत्यादींमध्ये अनुसूचित जातींना पदोपदी भेदभावास सामोरे जावे लागते. तसेच उच्चवर्णीयांपेक्षा शेतीचा लहान आकार व लहान अकुशल उद्योग यामुळे ते उत्पन्नाबाबतही मागे आहेत. याशिवाय, नियमित उत्पन्नाच्या रोजगाराची व दर्जेदार शिक्षणाची अनुपलब्धता, गळतीचे वाढीव प्रमाण यांच्यासोबत निरंतर आहेत. या सगळ्यांचा एकत्रित परिणाम गरिबी व विषमता वाढण्यावर होतो हे आकडेवारी व अहवालांचे सूक्ष्म विश्लेषण करून लेखकांनी स्पष्ट केले.

समूहाचा विचार करता अनुसूचित जमाती सर्वांत गरीब (५४), त्यानंतर अनुसूचित जाती (२० टक्के), त्यानंतर इतर मागास प्रवर्ग (१४ टक्के) आणि उच्चवर्णीय (९ टक्के). म्हणजेच विषमता चौफेर आहे. सर्वाधिक गरीब समूहामध्ये अनुसूचित जाती-जमाती-बौद्ध महिला हे समाजगट प्राधान्याने येतात.

धार्मिक समूहाचा विचार करता महाराष्ट्रातील बौद्ध सर्वाधिक गरीब असून, त्यांचे गरिबीचे प्रमाण सुमारे २७ टक्के आहे. त्यानंतर मुस्लिम (१९.१ टक्के) व त्यानंतर हिंदू (१६.९) अशी स्थिती आहे. विशेषत: या सगळ्या जातीय व धार्मिक समूहांमध्ये सर्वाधिक मागासलेल्या स्त्रिया आहेत. लेखकांनी खरेच धक्कादायक निष्कर्ष प्रकाशात आणले आहेत.

विषमतेचे हे सर्व चौफेर स्वरूप मांडल्यानंतर हा ग्रंथ नवी धोरणेसुद्धा देतो, हे याचे वेगळे वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यात (१) राज्याच्या पातळीवर धोरणे (२) विभागीय पातळीवरील धोरणे (३) जातीय व धार्मिक समूहांच्या पातळीवरील विशेष धोरणे. या ग्रंथात लेखकांनी दिलेली सामाईक (सर्वांसाठी) व समूह पातळीवरील ध्येयधोरणे केवळ महाराष्ट्र राज्यासाठीच नाही, तर देशपातळीवरील कल्याणकारी तत्त्वाला भक्कम आधार व दिलासा देणारी आहेत.

महाराष्ट्र राज्याचा ५८ वर्षांचा विकास होऊनही विषमतेचा प्रश्न भीषण आहे. पण तो म्हणावा तेवढा ऐरणीवर अजूनही नाही हे वास्तव हा ग्रंथ समोर आणतो. उदा. २०१५ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिव्यक्ती उत्पन्न देशात पहिले मात्र गरिबीच्या बाबत अकरावे स्थान होते. कुपोषित मुलांच्या बाबत तेरावे, उच्चशिक्षणातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी प्रवेशाच्या बाबतीत सतरावे, असे का? हा प्रश्न निश्चितच अस्वस्थ करणारा आहे. याचा अर्थ असा की, महाराष्ट्रातील आर्थिक विकासामुळे होणारी वाढ ही गरिबांमध्ये कमी व श्रीमंतांकडे अधिक जावी... जात आहे, असे शासकीय धोरण आहे. म्हणून या धोरणाचा पुनर्विचार करून शासनाचे धोरण हे गरिबी दूर करणारे व विशेषत: मागास-गरीब समाजघटकांची गरिबी दूर करणारे (गरिबाभिमुख) असावे हाच या ग्रंथाचा उद्देश व सार आहे. हा ग्रंथ पुरोगामी महाराष्ट्राचे वास्तविक चित्र रेखाटणारा असून, तो सरकारला धोरण ठरविण्यास उपयुक्त आहे. तसेच, तो सर्वसामान्य व बुद्धिवंतांच्याही संग्रही व जाणिवेत असावा असा मौलिक दस्तावेज आहे, असे म्हणता येईल.

सुखदेव थोरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांना उच्चशिक्षण आणि सामाजिक सेवा या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल वर्ष २००८ मध्ये भारत सरकारच्या पद्मश्री आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मदर टेरेसा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल फाउंडेशन, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी डॉ. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार (२०११) व दिल्ली सरकारचा प्रतिष्ठित आंबेडकररत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त सुखदेव थोरात यांना बारा भारतीय व एक आंतरराष्ट्रीय विद्यापीठाने डी.लिट, डी.एस.सी., डी. एस. (डॉक्टर ऑफ एज्युकेशन) व एल.एल.डी. या मानद पदव्या देऊन सन्मानित केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे विषय मुख्यत: शेतीविकास, संस्थात्मक अर्थशास्त्र आणि विकासाचे अर्थशास्त्र हे आहेत. त्यांनी गरिबी, सामाजिक घटक आणि असमानता, जातिव्यवस्थेचे अर्थशास्त्र, जातिभेदांचे अर्थशास्त्र, श्रमिक बाजारातील भेदभाव, अनुसूचित जाती-जमाती आणि मानवाधिकार, शहरी झोपडपट्टीसारख्या वगळलेल्या गटांच्या आर्थिक समस्या इत्यादींचा उल्लेखनीय अभ्यास केलेला आहे. त्यांची एकोणीस पुस्तके प्रकाशित आहेत. तसेच ग्रामीण दारिद्र्य, शेती, दुर्लक्षित गट, जातिव्यवस्था, दलित, जमाती, डी-नोटिफाईड जमाती व अल्पसंख्याकांशी संबंधित मुद्दे, सामाजिक समस्या आणि जातिगत भेदभाव अशा विविध विषयांवर केलेल्या संशोधनकार्याचे शंभरपेक्षा अधिक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झालेले आहेत. ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज्, नवी दिल्लीचे संस्थापक संचालक व अध्यक्ष आहेत.

सुखदेव थोरात यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केलेले आहे. त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली (२००६-२०११) आणि भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (२०११-२०१७) या नामांकित संस्थांचे अध्यक्ष म्हणूनसुद्धा कार्य केलेले आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली, के. आर. नारायणन चेअर फॉर ह्यूमन राईट्स अँड सोशल जस्टिस, नवी दिल्ली आणि महात्मा गांधी विद्यापीठ, त्रिवेंद्रम येथे ते एमिरीटस प्रोफेसर (Emeritused professor) आहेत व सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे प्रतिष्ठित प्राध्यापक (Distinguish Professor) पदावर कार्यरत आहेत.

नितीन तागडे यांनी इन्स्टिट्यूट फॉर सोसिअल अँड इकॉनॉमिक चेंज, बेंगळुरू येथून २०१२ मध्ये पीएच.डी पदवी प्राप्त केल्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज्, नवी दिल्ली येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्य केले आहे. विकासाचे अर्थशास्त्र, विषमता आणि भेदभावाचे अर्थशास्त्र हे त्यांच्या अभ्यासाचे विषय असून, त्यांचे अन्नसुरक्षा, दारिद्र्य, विषमता, रोजगार आणि भू-धोरण इत्यादी मुद्द्यांवर शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झालेले आहेत. सध्या ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहेत.

**'महाराष्ट्रातील विषमता आणि गरिबी,**
**सांपत्तिक असमानता व जातीय भेदभावाचा प्रभाव'**
**सुगावा प्रकाशन, पुणे**
**लेखक - सुखदेव थोरात, नितीन तागडे**
**पृष्ठे - १३२, मूल्य - १३० रुपये**

# मी टू-फोर-एट-टेन-फोरटीन

अमेरिकेतील तराना बुर्के या महिलेच्या कल्पनेत २००६ मध्ये आलेली आणि एलिसा मिलानो हिने गेल्या महिन्यात गाजवलेली 'मी टू' म्हणजे 'मीसुद्धा' ही मोहीम भारतात वादळासारखी पसरली. अगदी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरली. पत्रकार आणि सिनेसृष्टीत मी-मी म्हणणाऱ्या स्वयंघोषित आणि समाजघोषित पुरुषांचे या मोहिमेने बुरखे फाडले. निदान या बुरख्याला आपले नख तरी धाडसाने सांगितले. मीसुद्धा लैंगिक छळाची किंवा तशा प्रकारच्या वर्तनाची शिकार आहे हे स्पष्टपणे मोबाईलच्या छोट्या पडद्यावर तरी सांगितले. काही जणींच्या तक्रारी पोलिस बुकात गेल्या तर काहींच्या फक्त वर्तमानपत्रात म्हणजे माध्यमात झळकल्या. काहींच्या तक्रारी सर्वसामान्य माणसाच्या ओठावर चर्चेचा विषय झाल्या. एलिसाने चित्रपट निर्माता हार्वेनं बलात्कार केल्याची अतिशय गंभीर तक्रार केली होती.

भारतात तनुश्री दत्ताने दोन दशकापूर्वी आपल्यावर झालेला लैंगिक अत्याचार सर्वप्रथम उघड केला. त्यानंतर मूनमून, स्वरा भास्कर, रिचा चड्ढा, कोंकणा सेन शर्मा, कंगणा रनावत, राधिका आपटे, ईशिता दत्ता, मलिका दुवा, सुचित्रा कृष्णमूर्ती, पार्वती, चिन्मयी, साजिता, रीमा आदी अनेकांनी पुढे येऊन 'मी टू' मोहिमेत भाग घेतला. अजूनही काही येतील; कारण आपल्यावर अन्याय झालाय हे सांगण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. स्वतःच्या पायावर आपली लेखणी गहाण टाकणाऱ्या एम. जे. अकबर या मंत्र्याची एक विकेटही पडली आहे.

'मी टू'च्या प्रवाहात एक मोठा मासा तडफडून गेला. हे वादळ घोंघावायला लागलं तेव्हा पुरुषप्रधान व्यवस्थेनं पहिला प्रश्न उपस्थित करून तक्रारकर्त्या महिलांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. हा प्रश्न होता, खरंच लैंगिक छळ झाला असेल तर त्या-त्या वेळी आवाज का उठवला नाही? दहा-पंधरा वर्षे कशाची वाट बघितली? व्यवहार म्हणून हा प्रश्न ठीक आहे; पण भारतीय महिलेला स्वतःवरील अन्याय सांगण्यासाठीच किमान स्वातंत्र्य दिलं आहे का? या प्रश्नाचं उत्तर ही व्यवस्था देत नाही. सासरी झालेल्या छळाचा माहेरी उल्लेख करू नये. जीव द्यावा पण आवाज उठवू नये; कारण माहेरची अप्रतिष्ठा होते आणि एकदा का लग्न झालं की माहेर तुटतं असं या महिलांच्या डीएनएमध्ये भरवण्यात आलंय. मुकाटपणे सहन करतात त्या. याच न्यायानं 'मी टू'मधील महिलांनी चूप रहायचं होतं का ?




आपल्यावर अन्याय झाला होता याचा उच्चार करायचा नाही का? असे अनेक प्रश्न तयार होतात. सांस्कृतिक, नैतिक, धार्मिक चिकटपट्ट्या चिकटवून किती दिवस महिलांचे शब्द गोठवणार आणि का, हा प्रश्न येतोच की. कुणी आपल्या कोणत्याही अधिकाराचा गैरवापर करू नये असं सर्वांनाच सांगणं एकवेळ ठीक आहे; पण आत्मसन्मानासाठी, अन्यायाविरुद्ध जागे झालेल्या महिलांसाठी अशी स्त्री-पुरुष भेदीची कविता कोणी करू नये.

हे वादळ ज्या दिवशी भारतात घोंघावलं त्याच्या एक दिवस आगे-मागे नाशिकच्या अरे हो तीर्थक्षेत्र असलेल्या नाशिकमध्ये गोदाकाठी शंभरेक पुरुष एकत्र येऊन आपापल्या जिवंत पत्नीच्या नावानं पिंडदान करत होते. म्हणजे त्या मरण पावल्या हे पिंड साक्षी ठेवून एकतर्फी सांगत होते. या साऱ्यांना आत्मा अमर असतो. आपला

पूर्वज कावळा होऊन येतो हे थोतांड यांना माहीत नसावं किंवा त्यांनी पत्नी मेलीच पाहिजे या हव्यासापोटी त्याकडे दुर्लक्ष केलं असावं. काही असो यांनी पिंड घातलंच. अर्थात जिवंतपणी असा पिंड घालता येत नाही. तो धर्मद्रोह, अध्यात्मद्रोह होतो असं सांगत काही महिलांनी तक्रार केली. हा विषय येथे नोंदवायचे कारण म्हणजे एकाच दिवशी या दोन गोष्टी घडत होत्या. छळवाद करणाऱ्या पत्नी घटस्फोट देत नाहीत हे एक कारण एकीकडं आणि दुसरीकडे पुरुष लैंगिक छळ करतात. आपली वाचा बंद करतात. आता आम्ही बोलणारच हा विश्वास दुसरीकडे. आपला देश, समाज कोणत्या पेचातून चालला आहे आणि हे वाद कोणत्या स्टेशनात थांबणार आहेत हे सांगता येत नाही. झगमगाटाच्या दुनियेत वावरणाऱ्यांनी तोंड उघडलं; पण अंधाऱ्या जगात तोंड बंद करून वावरणाऱ्या महिलांनी काय करायचं? ना त्यांना 'मी टू' ठाऊक आहे, ना माध्यमांना गतिमान करणारी उपकरणे आहेत. ती जर त्यांना मिळाली तर 'मी टू'मधलं मी निघून जाईल आणि तिथं 'वुई' म्हणजे 'आम्ही' येईल.

## मजबूरी का नाम भक्ती


राजकारणात कधी कोणता शब्द वापरावा लागेल याचं भाकीत कुणालाच करता येत नाही. मूलतत्त्ववाद आणि कडव्या धर्मवादाने भरून पावलेल्या किंवा उजव्यांनी तसं घडवलेल्या वातावरणात आता मतांचा म्हणजे सत्तेचा मार्ग परमेश्वरावरील भक्तीतून जातो असा नवा सिद्धांत तयार झालाय. माणसाचा ऱ्हास करत धर्मस्थळांचा विकास करत निघालेल्या राजकारणात कोण किती भक्त आहे यावर त्याचं राष्ट्रप्रेम तोललं जातं. अगदी सामान्य माणसाच्या हातातही हा 'ना इन्साफ का तराजू' देण्यात मूलतत्त्ववादी यशस्वी होत आहेत. याचा परिणाम एका मोठ्या राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष राहुल गांधी यांच्यावर न झाल्यास नवल म्हणावं लागेल. जर देशाचे माजी राष्ट्रपती संघाच्या शाखेत जाऊन राष्ट्रवाद्यांसमोर इंग्रजीत भाषण देत असतील तर राहुल गांधी कोण लागून गेले. कर्नाटकात विधानसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वीपासून त्यांनी देवदर्शनाची मोहीम चालू केली आणि उजव्यांना सांगितलं की, आम्ही नास्तिक नाही आहोत. श्रद्धावान आहोत, भक्त आहोत. आता हे सिद्ध करायचं तर देवदर्शन प्रत्यक्षात घ्यायला हवं. राहुल गांधी तरुण असल्यामुळे त्यांनी धावतपळत का होईना; पण आतापर्यंत दीड-दोन डझन धार्मिक स्थळांना जाऊन देवदर्शन घेतलं. मांडी घालून, हात जोडून भक्ती केली. आपल्याकडे देवस्थानं खूप आहेत आणि निवडणुका तर तोंडावर आल्या आहेत. काही करून अनेक देवस्थानांना भेट देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे; कारण उजव्यांनी तेहतीस कोटी देवांचं रूपांतर मतपेट्यांत करून टाकलंय. धर्मस्थळाचं रूपांतर राजकारणात केलंय. जनतेच्या श्रद्धांचं रूपांतर राजकीय डावपेचात केलंय. आता काँग्रेसनं काय करायचं? त्यांनाही ठाऊक आहे की क्रिकेट खेळायचं असंल तर कबड्डीचे नियम पाठ करून चालत नाही, तर क्रिकेटचे नियमच पाठ करावे लागतात. राहुल गांधींनी एक खास कोच ठेवून असे नियम पाठ करायला सुरुवात केलीय. आता यांना मागं टाकायचं म्हणून की काय डाव्यांनी काली कलकत्तेवाली वास करणाऱ्या बंगालमध्ये गेल्या काही वर्षांपासून म्हणजे दीर्घकाळाची सत्ता गेल्यापासून डोक्यावरची लाल टोपी आणि हातातला विळा हातोडा बाजूला ठेवून दुर्गादेवीची पूजा करायला सुरुवात केलीय. ''हम कॉम्रेड है, नास्तिक है'' म्हणणाऱ्यांवर मतासाठी का होईना मोठ्या आवाजात आरती म्हणायची वेळ आलीय. मोठा आवाज एवढ्याचसाठी की,



तो देवीलाही ऐकू गेला पाहिजे. शंख वाजवणाऱ्या उजव्यांनाही गेला पाहिजे. मुळात राहुल गांधी किंवा नेहरूंपर्यंतची त्यांची परंपरा कधी नास्तिक नव्हती. कॉंग्रेस कधी धर्मविरोधी, देवविरोधी नव्हती. स्वतःला धर्माचे ठेकेदार बनवण्यासाठी आणि आपल्याप्रमाणे इतरांनी जानवी घालू नयेत; कारण त्यांना असा दोरा गुंडाळायचा हक्क नाही असं म्हणणं उजव्यांनीच गांधी घराणे आणि कॉंग्रेसला अधार्मिक बनवण्याचा प्रयत्न केला होता. आता राहुल आणि कॉंग्रेस परत एकदा निष्ठेनं आपल्या परंपरेकडे जाताहेत तर उजवे त्यांना ढोंगी म्हणताहेत. उजव्यांनी केली तर भक्ती आणि इतरांनी केली तर ढोंग असा हा नवा न्याय आहे. राजकारण कुणाच्या मुठीत राहणार, यावरून हा न्याय तयार झाला आहे. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याला व्यापक हिंदुत्व म्हणेल हा भाग वेगळा. तूर्त तरी 'मजबूरी का नाम भक्ती' एवढंच पुरेसं आहे.

## सावधान! नवा अवतार येतोय

'वाघाला दिसला अवतार' असं म्हणण्याची वेळ आता आली आहे. कारण धर्म आणि संस्कृती संपन्न असलेल्या भाजपच्या महाराष्ट्र तुकड्याचे एक प्रवक्ते (ज्याला काहीच देता येत नाही त्यांना हे पद देतात आणि त्याला बोलघेवडा बनवतात.) अवधूत वाघ यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विष्णूचा अवतार दिसला आहे. अवतार ही कल्पनाच मजेशीर आहे की, कोण कुणालाही कुणाचाही कृष्णाचा अवतार म्हणून घोषित करतो. त्यासाठी कसलीही पात्रता, कसलाही दाखला, आधारकार्ड, पॅनकार्ड वगैरे लागत नाही. संस्कृतीचे काही मूठभर ठेकेदार असतात ते बुद्धालाही विष्णूचा अवतार बनवतात. आता वाघ हेच करत आहेत. त्यांनी सांगितलं की, पंतप्रधान मोदींमध्ये विष्णूचा अकरावा अवतार पाहतात आणि अवतारी पुरुषाचा सर्वांना अभिमान आहे असे सांगतात. आता एक गोष्ट स्पष्ट आहे की, आपल्याकडे ओबीसी सहसा अवतार बनत नाही. मग मोदींच्या वाट्याला हा अवतार कुणी आणि कसा दिला? विष्णूचे चोवीस अवतार आहेत. खरे तर मुख्य दहा आहेत. अंशावतार मिसळल्यास ही संख्या चोवीसवरून तिसावर जाते. चोविसावा अवतार अजून व्हायचा आहे आणि तो उत्तर प्रदेशात मुरादाबाद जिल्ह्यात शंभल भवाच्या गावात एका तपस्वी ब्राह्मणाच्या घरात होणार आहे असं काही जण सांगतात, तर काहींच्या मते होऊन गेला आहे असेही काही जण मानतात. यापूर्वीच दक्षिणेकडच्या एकाने गडबड करून स्वतःलाच चोविसावा अवतार जाहीर केला आहे असं म्हणतात. कदाचित यावरून समुद्राच्या तळाशी किंवा आकाशात धर्मयुद्ध होईल आणि पुराणकथा या युद्धामुळे समृद्ध होतील. मुद्दा हा की विष्णूचा अकरावा पूर्ण अवतार कसा असेल? म्हणजे ते मोदीच असतील; पण ते कसे असतील यासाठीचा नवा फार्म्युला, नवतंत्रज्ञान किंवा कल्पनाज्ञान नागपुरातून मिळवावं लागणार आहे. हिंदुत्व विशाल करण्याची चलाखी ज्यांच्याकडे आहे ते देतीलही; पण मोदींना हे मान्य असणार आहे का? आतापर्यंत जे



चोवीस किंवा तीस अवतार झाले ते फारच जबरदस्त होते आणि त्यांना निवडणुका लढवाव्या लागल्या नव्हत्या. श्री समकादि मुनी, वराह अवतार, नारद अवतार, नर-नारायण, कपिल मुनी, दत्तात्रेय, यज्ञ, ऋषभदेव, आदिराज प्रभू, मत्स्य अवतार, कूर्म अवतार, धन्वंतरी, मोहिनी अवतार, नरसिंह अवतार, वामन अवतार, ह्यग्रीव (घोड्याचे मुख), श्रीहरी अवतार, परशुराम अवतार, महर्षी वेदव्यास, हंस अवतार, श्रीराम अवतार, श्रीकृष्ण अवतार, बुद्ध अवतार हे होते तेवीस अवतार. अजूनही यादी वाढवता येते. अवतारांसाठी शेवटचा आकडा निश्चित नाहीय. अवतार धारण करताना विष्णूने प्रत्येक वेळी एक जबाबदारी घेतली होती. ती पूर्ण करण्यासाठी अवतार होता. मोदी निवडून येऊन पंतप्रधान झाले आणि अवतारासारखेच त्यांच्या नावाचा शॉर्टकट करण्यात आला 'नमो'. मग कुठं तरी एका दुष्काळी गावात त्यांचं मंदिरही उभं राहत होतं. आता त्याच्या पुढं एक पाऊल म्हणजे अवतार! अवतारानंतर मोदींचं नेमकं काय होईल, कशा पद्धतीनं त्यांचं अवतारात रूपांतर होईल आणि त्यांचा ऑनलाईन व ऑफलाईन अजेंडा काय असंल हेही वाघांनी जाहीर करावं. वाघ कसा काय जाहीर करतील असा प्रश्न विचारू नये. सर्वप्रथम मेंदूचं छिद्र बुजवावं. पंक्चर काढून घ्यावं. वाघसाहेब ह्या सोडून कशाला विनाकारण लफड्यात पडताय? त्याऐवजी नागपुरात नितीन गडकऱ्यांकडे किंवा ते भेटलेच नाहीत तर भागवतांकडे अर्जाची झोळी करून जा. पडेलच पदरात काही तरी... प्रवक्तेपदाची मुदत तरी वाढेल. बोले तो पंक्चरवाला परफेक्ट होता है.

***

# आम्ही आदिवासी बाया

आम्ही खान्देशातल्या आदिवासी बाया
ही भिल्ल, पावरा, कोकणा
आम्ही मुंबई नजीकच्या ठाणे, नाशिकच्या आदिवासी बाया
ही कातकरी, वारली
आम्ही मेळघाटच्या आदिवासी बाया
ही कोरकू , पारधी
आम्ही वऱ्हाडातल्या आदिवासी बाया
ही कोलाम, परधान, आंध, गोंड
आम्ही झाडीतल्या आदिवासी बाया
ही माडीया, गोंड, हलबी..
आम्ही साऱ्या आदिवासी
आपल्या बहिणी अरुणाचलपासून ओडिशा-कालाहंडी झारखंड-बिहार,
छत्तीसगड, आंध्र, थेट केरळपर्यंत
राहतात गं बाई!
जगातही आहेच आपल्या सहदुःखी आदिवासी बहिणी
आपल्याला मिळत नाही पिण्यासाठी शुद्ध पाणी
कुठे आहे आयरनमिश्रित
कुठे आहे अतिरिक्त फ्लोराईड
वऱ्हाडात तर खार पाणपट्टाच
रोगांना आमंत्रण देणारं पाणी
आणि हे पाणी किती किती दूरवरून आणावं लागतं
डोंगरदऱ्या उतरत उतरत
डोक्यावर कळसा घेऊन वळसा घालत आणावं लागतं पाणी
झिजवावं लागतं शरीर, आटवावं लागतं रक्त
सोडावं लागतं मजुरीवर पाणी
कधी चिलेपिले सोबत घेऊन आणावं लागतं पाणी
ते बघ आमच्याच शिवारात पडणारं पाणी
आम्हाला सोडून मुंबईच्या पंचतारांकित वस्त्या, मध्यमवर्गीय, झोपडपट्टीवाले
अधिकृत-अनधिकृत महानगरीवाले सर्वांनाच मिळतं पाणी
आम्ही मात्र पाण्याच्या टँकरसाठी ताटकळत उभे
हे बघ इकडे गडचिरोली/चंद्रपूरकडील
आयरन - फ्लोराईड पाण्याने पंगू झाले आहे
आणि सरकारने त्या पाण्यासाठी जमिनीला पाडली भोकं
भोकं पाडून पाण्यासारखा पैसा कमावता येतो
हे बघ इकडे कोळशाच्या ओपन माईन्सने
पाण्याची पातळी खोल जाऊन बोअर आणि विहिरींनी तळ गाठला
शेतीच काय पाऊस अवकाळी पडून-न पडून पिकं कशी मरू लागली,
तसा आत्महत्येचा पाऊस पडू लागला शेतकऱ्याच्या दारात मागे एकदा बातमी
होती मुंबईपासून काही अंतरावरचे आदिवासी गावं पाण्याविना तहानलेले
खान्देशातील आदिवासी ऊस तोडणीसाठी सुरतेकडे विस्थापित
इकडे यवतमाळ-पांढरकवड्यात कुमारी मातेचे प्रश्न दंडकारण्यात तर
कित्येक दशकापासून पाण्यासारखं रक्त वाहतं
तर आदिवासी बायांनो पाणी कसं असतं कळलं का?
आपण राहतो डोंगरदऱ्यात, जंगलात पावसाचं पाणी पडतं-वाहतं
तुम्ही पाहिलं कधी जांभळ्या रंगाचं पाणी?
कुणी सांगेल आपल्या बायांच्या दुःखाचा रंग?
अंत नाही आपल्या दुःखाला
कधीकाळी सावकार, ठेकेदार, जमीनदार, अधिकारी-कर्मचारी यांनी
लुटण्याचा घेतला होता ठेका
आता कुठं मुक्त व्हायला लागलो आपण
तर कोणी एक कवी म्हणे,
पाणी कसं असतं सांगत आपल्या स्तनासारखं जांभळं असतं म्हणाला
आणि समर्थकांनी म्हणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे ढोल बडविले
विनंतीही केली म्हणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं रक्षण करण्यासाठी : मुख्यमंत्र्यांकडे
कातून कातून त्यांचे समीक्षक समर्थनाचं 'कीर्तन' गात होते
की होते घालत 'गोंधळ' कळलंच नाही
कवींचं संघटन करू, सॉलिडॅरिटी करू कवी श्रेष्ठांनी अशी हाक दिली
पाण्याच्या रंगाविषयी, काही विचारू पाहतो/बोलू पाहतो
आम्ही आदिवासी बाया
आम्हाला झटकले जाते सांस्कृतिक निरक्षरतेच्या नावावर अव्हेरले जाते
झुंडशाहीच्या आरोपाखातर...
आमच्या जांभूळबनातील पाणीसुद्धा जांभळं नसतं!
''कुणी सांगितल्यात त्यांची ओळख करून देताना
इतक्या प्रचंड खोट्या गोष्टी? कुणी?
निश्चितच तो आमच्या जमातीतला
खातापिता माणूस असावा
सत्याला धुक्यात लपेटणारा
एक निर्लज्ज सौदागर
नक्कीच तो शब्दांनी दगाबाजी करणारा
कुणी कवी असेल, अपंग डोक्याचा!''
हे आपल्या निर्मला पुतुलनं म्हटलं, तेच खरं गं बाई।
बायांनो, आपण एक ठराव करू या
आणि देशभरच्या बायांना/आदिवासी बायांनाही
लिहू या निषेधासाठी
करूया अधोरेखित
आपलंही अभिव्यक्ती स्वातंत्र्य!

**– प्रभू राजगडकर**

# कोण काय बोलतं...



मध्य प्रदेशात आमचीच सत्ता येणार, काँग्रेसने दिवास्वप्न पाहू नये. त्यांना स्वप्न पाहण्याचा पूर्ण अधिकार आहे, मात्र ते डोळे उघडे ठेवून स्वप्न पाहत आहेत.

– अमित शहा, अध्यक्ष, भाजप



माझ्याकडे केवळ चारच दिवसांसाठी राफेल कराराची फाईल द्या, मी त्यांना जन्मभरासाठी तुरुंगात पाठवेन.

– अरविंद केजरीवाल, मुख्यमंत्री, दिल्ली



नाना पाटेकर कधी कधी मूर्खपणा करतो, तो उद्धट आहे, विचित्रही वागतो. पण तो तसे प्रकार काही करणार नाही.

– राज ठाकरे, मनसेप्रमुख

ज्या माणसावर खुनाचा आरोप आहे आणि ज्याच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आलं आहे अशा माणसाने राम मंदिराबाबत केलेल्या वक्तव्यावर काय प्रतिक्रिया द्यायची. तो नीच माणूस आहे.

–सुब्रमण्यम स्वामी



मला प्रचाराला बोलावणारे ९५ टक्के लोक हिंदू होते. मात्र गेल्या चार वर्षांत हा आकडा खाली घसरला असून, ९५ वरून २० टक्क्यांवर आला आहे.

– गुलाब नबी आझाद, काँग्रेस नेते



आरएसएस आणि त्यांच्या सरकारला अयोध्येत राम मंदिर बांधण्यापासून कोण अडवत आहे. त्यांनी अयोध्येत राम मंदिर बांधून दाखवावं.

– असदुद्दीन ओवेसी, एमआयएम

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :

कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. -------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : --------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : --------------------------------------------------पत्ता : ------------------------------

----------------------------------------------शहर : --------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : -------------------------

मो. नं. : -----------------------इ-मेल : ----------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

# Hi Tech I.T. Park

Building = Ground + 2 Podium Parking + 5 Floors

Total Area = 26665 sq. ft.

Area Each Floor = 4612 sq.ft.

Area on Ground Floor = 4043 sq. ft.



45, D.E., Off T.J. Road, Next to Lodha Aria,Near Dosti Flamingos, Sewri (W)